ISSN 2320-0197

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची
संशोधन पत्रिका

# अर्थमीमांसा

भारतीय सौर शके १९४०

(जुलै-डिसेंबर २०१८/ खंड ११, अंक २)

❑ प्रमुख संपादक ❑

दि.व्यं.जहागिरदार

❑ सल्लागार मंडळ ❑

श्रीनिवास खांदेवाले
प्रमोद लाखे
प्रशांत हरमकर
जनार्दन काकडे

❑ संपादकीय पत्रव्यवहार ❑

दि. व्यं. जहागिरदार
''व्यंकटेश'', १२, गुलमोहर कॉलनी,
कॅम्प, अमरावती – ४४४ ६०२
दूरध्वनी (०७२१)–२६६१८५१

## अनुक्रमणिका

- विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या : एक दृष्टिक्षेप
  - जे.एम.काकडे ............................... १
- डेव्हीड रिकार्डो यांच्या "The Principles of Political Economy and Taxation"
  - विनायक श्रीधर देशपांडे...................... ११
- महात्मा गांधींचे आर्थिक विचार-एक विश्लेषण
  - दि.व्यं.जहागिरदार .......................... १६
- महात्मा गांधींची स्त्री सक्षमीकरणातील भूमिका
  - वर्षा गंगणे.................................. २२
- लघु व कुटिर उद्योगातील रोजगार विषयक राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचे विचार
  - प्राची देशपांडे आणि मृणालिनी तापस...... २९
- महाराष्ट्रातील जलयुक्त शिवार अभियान –एक दृष्टिक्षेप
  - करमसिंग राजपूत............................ ३६
- Existential Crises and 21st Century Issues before WTO
  - Anjali Kulkarni....................... ४२
- आर्थिक वृद्धी, तंत्रज्ञानात्मक बदल आणि हवामान बदल यासाठी २०१८ चे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक
  - प्रशांत हरमकर .............................. ४८
- शिक्षण आणि स्वास्थ्य संदर्भातील भारत सरकारची अर्थसंकल्पीय धोरणे
  - सोनल जनबंधू............................... ५८
- The Role Of Maharashtra Rajya Itar Magas Vargiya Vitta Ani Vikas Mahamandal Schemes for the Economic Development Of Women In The Amravati City
  - Prashant Katole.................. ६८

### ग्रंथ परिचय

- 'भारतीय कृषीक्षेत्र : दशा आणि दिशा'
  - गजानन भारती........................ ७९
- 'फळ उत्पादनाचे अर्थशास्त्र'
  - प्रतिभा काळमेघ...................... ८१
- ४२ व्या वार्षिक अधिवेशनाचा अहवाल ....... ८६

## विदर्भ अर्थशास्त्र परिषद कार्यकारिणी (२०१८-१९)

- कार्याध्यक्षा
  डॉ. अंजली कुळकर्णी
- अध्यक्ष
  डॉ. आर.बी.भांडवलकर
- उपाध्यक्ष
  डॉ. मनिष का. कायरकर
- सचिव
  डॉ.राजेश चव्हाण (अमरावती विभाग परिक्षेत्र)
  डॉ. विठ्ठल मा. घिनमिने (नागपूर विभाग परिक्षेत्र)
- प्रमुख संपादक - 'अर्थमीमांसा'
  डॉ. दि.व्यं. जहागिरदार
- जिल्हानिहाय प्रतिनिधी :
  डॉ. पुष्पा ज. उदासी (नागपूर शहर)
  डॉ. सुनिल कृ.शिंदे (नागपूर ग्रामीण)
  डॉ.विशाल वा. मालेकार (चंद्रपूर)
  प्रा. एस.बी.भुरे (भंडारा)
  डॉ.महेंद्र पां. गावंडे (वर्धा)
  डॉ. संजय ज. कोठारी (अमरावती )
  डॉ. डि.के.राठोड (अकोला )
  प्रा. दिलीप पा.महाजन (बुलढाणा)
  प्रा.माधुरी पं. राखुंडे (यवतमाळ)
  डॉ.मधुकर श्री.ताकतोडे (वाशिम)



- अक्षर जुळवणी व मुद्रक :
  कॉम्प्यूटर-नेटवर्क (नरेंद्र पांढरीकर)
  अमरावती. मो. ९८५०२८३२४६
  email : narendrapandharikar@gmail.com


आजीव सदस्यता शुल्क : रू. १०००/- आहे, ही रक्कम सचिव डॉ. राजेश चव्हाण, प्रभारी प्राचार्य, कढी महाविद्यालय, परतवाडा यांचेकडे ''विदर्भ अर्थशास्त्र परिषद'' या नावाने ड्राफ्टने पाठवावी.

**: स्वागत मूल्य :**

१) परिषद सदस्य - १५० रू.
२) शैक्षणिक संस्था - २०० रू.

# संपादकीय .....

'अर्थमीमांसा' या संशोधन पत्रिकेचा खंड ११, अंक २ (जुलै-डिसेंबर २०१८) सादर करतांना विशेष आनंद होत आहे. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या कार्याध्यक्षा, अध्यक्ष, माजी अध्यक्ष आणि परिषदेच्या सर्व सदस्यांचे सहकार्य तसेच सल्लागार मंडळाच्या मार्गदर्शनाचा हा अंक सिद्ध करण्यात नेहमीच महत्वाचा वाटा असतो. या पूर्वीच्या अंकाप्रमाणे हा अंक देखील सर्वांच्या पसंतीस उतरेल असा विश्वास आहे.

४२ व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. जनार्दन काकडे यांनी केलेल्या अध्यक्षीय भाषणाचा गोषवारा येथे दिला आहे. त्यांनी आपल्या भाषणात भारतीय कृषीच्या समस्यांचा आढावा घेतांना विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या या महत्त्वाच्या प्रश्नावर प्रकाश टाकला आहे. परिषदेने नागपूर येथे झालेल्या ३७ व्या वार्षिक अधिवेशनापासून अर्थशास्त्रातील अभिजात ग्रंथाचा परिचय करून देणारे व्याख्यान आयोजित करण्याचा अभिनंदनीय उपक्रम सुरू केला आहे. त्याचे अंतर्गत डॉ. व्ही.एस.देशपांडे यांनी The Principles of Political Economy and Taxation ह्या रिकार्डोच्या अत्यंत महत्त्वाच्या ग्रंथाचा परिचय करून देणारे भाषण रामटेक येथे झालेल्या ४१ व्या वार्षिक अधिवेशनात दिले होते. ते भाषण सारांश रूपात येथे प्रसिद्ध केले आहे.

सध्या महात्मा गांधींच्या जयंतीचे १५० वे वर्षे भारतातच नाही तर जगभर साजरे केले जात आहे. त्या अनुषंगाने तीन लेख येथे प्रसिद्ध करतांना आनंद वाटतो. डॉ. दि.व्यं.जहागिरदार यांनी गांधींचे आर्थिक विचार स्पष्ट करून त्यांच्या विचारांची यथार्थता आपल्या लेखात थोडक्यात स्पष्ट केली आहे. डॉ. वर्षा गंगणे यांनी महात्मा गांधीचे विचार व स्त्री सक्षमीकरण ह्या लेखाद्वारे महात्मा गांधींनी स्त्री सक्षमीकरणासाठी केलेल्या भरीव कार्याची चिकीत्सा केली आहे. महात्मा गांधींनी लघु व ग्रामीण उद्योगांच्या विकासाला आपल्या विचारांद्वारा व आंदोलनाद्वारे प्राधान्य दिले. डॉ. प्राची देशपांडे व डॉ. मृणालिनी तापस यांनी याच विषयावर निबंध करून लघु व ग्रामीण उद्योगांच्या विकासाचा शास्त्रीय दृष्टीने आढावा घेतला आहे.

डॉ. करमसिंग रजपूत यांनी महाराष्ट्रातील शेततळे या महत्त्वाच्या विषयावर आकडेवारीच्या सहाय्याने लेख लिहून सध्या चर्चेत असलेल्या विषयावर प्रकाश टाकला आहे. गेल्या काही वर्षांपासून WTO चे कार्य जवळपास थांबल्या सारखे भासत आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. अंजली कुळकर्णी यांनी WTO च्या अस्तित्वाच्या संकटावर विवेचन करून WTO पुढील वादप्रश्नांची (Issues)

योग्य प्रकारे चर्चा केली आहे. इ.स. २०१८ चे अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक विल्यम नॉर्डसऊस आणि पॉल रोमर यांना विभागून दिल्या गेले. त्यांच्या योगदानाचा सविस्तर परामर्श डॉ. प्रशांत हरमकर यांनी करून दिला आहे. डॉ. सोनल जनबंधू यांनी शिक्षण आणि आरोग्य संदर्भातील केंद्र शासनाच्या धोरणाचे भरपूर आकडेवारीच्या द्वारा विवेचन केले आहे. जवळपास १० वर्षाच्या काळातील केंद्राच्या अर्थसंकल्पांचा त्यांनी यासाठी वापर केला आहे. डॉ. प्रशांत काटोले यांनी अमरावती शहरातील अन्य मागासवर्गातील स्त्री सक्षमीकरणातील महामंडळाच्या उपक्रमाची चर्चा केली आहे.

या लेखांसोबत २ पुस्तकांचाही परिचय दिला आहे. डॉ. वर्षा गंगणे यांच्या 'भारतीय कृषी क्षेत्र : दशा आणि दिशा' या पुस्तकाचा परिचय प्रा. गजानन भारती यांनी तर डॉ. वनिता चोरे यांच्या 'फळ उत्पादनाचे अर्थशास्त्र' या त्यांच्या पीएच.डी. प्रबंधावर आधारलेल्या पुस्तकाचा परिचय डॉ. प्रतिभा काळमेघ यांनी करून दिला आहे. अखेरीस विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४२ व्या वार्षिक अधिवेशनाचा वृत्तांत दिला आहे.

लेखकांनी अर्थमीमांसेसाठी वर्षात केव्हाही लेख पाठवावेत हे लेख स्वतः काळजीपूर्वक तपासून पाठवावेत. या वर्षी ICSSR कडून आर्थिक मदत मिळाली नाही. अर्थमीमांसेला जाहिराती मिळवून देण्यासाठी व विविध महाविद्यालयांना अर्थमीमांसेचे अंक विकता यावेत म्हणून सभासदांनी सहकार्य करावे. याकडे परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांनी लक्ष देण्याची गरज आहे. हा अंक सिद्ध करतांना डॉ. प्रशांत हरमकर यांचे विशेष सहकार्य प्राप्त झाले. सर्व लेखकांचे आभार तसेच कॉम्प्यूटर नेटवर्कचे नरेंद्र पांढरीकर यांनी अंक सुबकपणे छापून तयार केला त्याबद्दल त्यांचे आभार.

दिनांक : १० डिसेंबर २०१८

स्थळ : अमरावती.

**(दि.व्यं.जहागिरदार)**

प्रमुख संपादक - 'अर्थमीमांसा'

ISSN 2320-0197

# विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या : एक दृष्टिक्षेप

**(विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे ४२ वे वार्षिक अधिवेशन गो.सी.टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदूरबाजार, जि.अमरावती येथे दि. २७ व २८ जानेवारी २०१८ दरम्यान संपन्न झाले. अध्यक्ष डॉ.जे.एम.काकडे यांच्या अध्यक्षीय भाषणाचा हा गोषवारा आहे.)**

**जे.एम.काकडे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तुकूम, जि. चंद्रपूर.

**प्रास्ताविक :**

गेल्या अनेक वर्षापासून विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या हा नेहमीच चिंतेचा विषय राहीला आहे. अनेक समित्या सरकारने नेमल्या पण पाहिजे त्या प्रमाणात त्यांना यश आले नाही. सध्याचे सरकार या मुद्यावर प्रयत्न करीत आहे. परंतु शेतकरी आत्महत्त्या मात्र थांबलेल्या नाहीत. विदर्भातील शेतकरी मेहनती आहे. तरीही शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या होतच आहेत. लागोपाठ दुष्काळाची परिस्थिती, नापिकी आणि कर्जबाजारीपणा या दृष्टचक्रात गेल्या ५ वर्षात विदर्भातील ७ हजार १२७ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले आहे. गेल्या काही वर्षात शेतकरी सातत्त्याने हवामानातील बदलांचा सामना करीत आहेत. एखाद्या वर्षात अतिवृष्टी कहर करते तर चुकून एखाद्या वर्षी समाधानकारक पाऊस झालाच तर अवकाळी पाऊस आणि गारपीट यामुळे नुकसान होते. हवामान बदलामुळे पाऊस हंगामातच पडेल याचीही खात्री देता येत नाही. त्यामुळे पूर्णत: मान्सूनवर अवलंबून असलेला खरीप हंगाम अपेक्षीत उत्पन्न मिळवून देत नाही. अपूऱ्या पावसामुळे रब्बी हंगामातही पिके हाती मिगेनाशी झाली आहेत. त्यामुळे शेतकरी हंगामात लागवडीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करु शकत नाही. गेल्या काही वर्षात हे संकट अधिकच वाढत असल्यामुळे विदर्भातील शेतकरी आर्थिक दृष्ट्या मोडून पडल्याचे चित्र दिसत आहे.

नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांनी आत्महत्या करु नयेत म्हणून राज्य सरकारने कर्जमाफी देऊ केली, असली तरी राज्यातील शेतकरी आत्महत्येचे सत्र थांबलेले नाही. दरदिवशी सरासरी सुमारे आठ याप्रमाणे गेल्या १२ महिन्यात २८८० शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले आहे. राज्य सरकारने जुलै महिन्यातच कर्जमाफीची घोषणा केली मात्र त्यानंतर ऑगस्ट, सप्टेंबर ते ऑक्टोबर या काळात ७८८ शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या आहेत. गेल्या पाच वर्षात झालेल्या ७ हजारांवर आत्महत्यांपैकी ५ हजार ७२२ आत्महत्त्या ह्या पश्चिम विदर्भातील पाच जिल्ह्यासह नागपूर विभागातील वर्धा जिल्ह्यात झाल्या आहेत. विदर्भातील अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम आणि पूर्व विदर्भातील वर्धा हे सहा जिल्हे शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हे मानले गेले. या जिल्ह्यासाठी केंद्र सरकारने ३ हजार ७८५ कोटीचे तर राज्य सरकारने १ हजार ७५ कोटीचे पॅकेच दिले होते. परंतु आत्महत्या आलेख अजूनही वाढत आहे. सरकारी आकडेवारी नुसार या सहा

जिल्ह्यांमध्ये गेल्या १५ वर्षात ११ हजार ७६८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. चालु वर्षात ऑगस्ट अखेरपर्यंत विदर्भातील १ हजार ३४ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले असून त्यातील ८२८ आत्महत्त्या एकट्या अमरावती विभागातील आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखणे हे एक मोठे आव्हान आणि चिंतेचा विषय बनला आहे.

आपल्या देशातील अनेक आर्थिक प्रश्नांपैकी शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा एक महत्वाचा प्रश्न आहे. स्थुलमानाने शेतीच्या प्रश्नाला दोन बाजू आहेत असे म्हणता येईल. पहिली बाजू अशी की उपलब्ध शेतीपासून जास्तीत जास्त उत्पादन मिळविण्याच्या दृष्टीने ज्या गोष्टी आवश्यक आहेत. त्यांचे संयोजन करणे : उदाहरणार्थ, ओलीताच्या सोयी, खतांचा पूरवठा, सुधारीत बी-बियाणे, यांत्रिकीकरण, उत्तम शेती व्यवस्थापन इत्यादी. शेती समस्येची दूसरी बाजू म्हणजे शेतमालाचे समर्थन मूल्य ठरविणे, शेतमाल आयात-निर्यात धोरण ठरविणे आणि कृषी पतपुरवठ्याचे धोरण ठरविणे.

वरील दोन्ही बाजू परस्परापासून वेगळ्या नाहीत. एका बाजूच्या प्रश्नाचा परिणाम दुसऱ्या बाजूच्या प्रश्नावर होत असतो. हजारो वर्षापासून भारत हा कृषीप्रधान अर्थव्यवस्था असलेला देश म्हणून ओळखला जातो. एतिहासिक काळापासून ज्या प्रदेशात शेतीसाठी योग्य परिस्थिती आहे, अशा प्रदेशातच मानवाने वस्ती करण्यास सुरुवात केली. म्हणून भारतासारख्या जागतिक पुरातन अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राला महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. आदीमानवाच्या भटक्या युगातून माणसाचं नागरिकरण आणि सामाजिकीकरण झालं. याचं कारण त्याला स्थैर्य देणारी शेतीच आहे. महत्वाचं म्हणजे शेतीचा शोध स्त्रीच्या सर्जक विचारशक्तीतून लागला. शेती मनुष्याच्या शरिरास जगवते. जगातील माणसं शेतीवाडीतून तयार झालेल्या अन्नधान्यामुळेच जगतात. एवढंच नाहीतर पशु-पक्षी, किडे-मुंग्या, सगळेच सजीव प्राणी शेतकऱ्याने पिकविलेल्या अन्नधान्यावरच जगतात. पण आजच्या काळात शेतकऱ्याच्या जगण्याचेच प्रश्न निर्माण झालले आहेत. जो बळीराजा होता त्याच्या खळ्यावरून सगळ्यांना दान दिलं जायचं, तेथील पेरणी-कापणी-मळणीमुळेच भरदार कणसं, शेंगा, बोंड, पानसरवा पुरवण्यापर्यंत सर्वांना पुरुन उरायचं. त्यालाच आता भीक मागण्याची आणि आत्महत्त्या करण्याची वेळ आली आहे. शेतकऱ्यांच्या श्रमाला आणि घामाला दाम उरलेलं नाही. कधी-काळी मातीला बांध घालून त्याने शेती तयार केली. आज त्याच्या मनाचाच बांध फुटून उभ्या आयुष्याचा खंगळा होतो आहे. त्याच्याप्रती संवेदना व्यक्त करणं हे आपलं सर्वांचच कार्य आहे. व्यापारी, नोकरशाही यांच्या तुलनेत शेतीचा दर्जा कनिष्ठ झाला आहे. कृषी व्यवस्थेचा रोग आता एवढा विकोपाला गेला की तो आता औषध उपचाराने बरा होणार नाही. त्यासाठी शासकीय पातळीवर काही वर्षे केवळ शेतकरी केंद्रबिंदू करुन योजना राबविण्याची गरज आहे. कुठल्याही अर्थव्यवस्थेमध्ये शेती, उद्योग व सेवा असे विभाग पडतात. शेतीची आपल्याकडे काय परिस्थिती आहे हे बघितलं तर परिस्थितीचं गांभीर्य लक्षात येईल. भारतात शेतीवर अवलंबून असलेल्या कुटूंबापैकी ७०% कुटूंबाकडे मिळनू फक्त १५% जमीन आहे आणि फक्त १६% श्रीमंताकडे ७०% जमीन आहे. भारतीय शेतीचे वाटप तर विषम आहेच याशिवाय हरितक्रांतीपासून खतं व रसायने यांच्या अतोनात

वापरामुळे एकेकाळी सुपिक असलेली जमीन नापीक होत आहे. त्याचबरोबर खते, बि-बियाणे यांच्या किंमती दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे शेतमालाचा खर्च वाढत जातो. त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होऊन देशोधडीला लागलेला आहे. भारतात यापूर्वी राष्ट्रीयकृत बँका शेतकऱ्यांना कर्ज देत होत्या परंतु आता उदारीकरनानंतर बँकांनी अधिकच्या नफ्याला महत्व दिल्यामुळे लहान व मध्यम शेतकऱ्यांना कर्ज देण्याचे बंद करून श्रीमंताच्या मुलांना विदेशी शिक्षण घेण्यासाठी तसेच चैनीच्या वस्तू खरेदी करण्यासाठी कर्जे देण्यास सुरुवात केली. त्यामुळे गरीब व मध्यम शेतकऱ्यांना सावकारांकडून प्रचंड व्याजदराने कर्ज घ्यावे लागते आणि त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होतो. ती कर्जे फेडता न आल्यामुळे आत्महत्यासारखे टोकाचे पाऊल शेतकरी उचलू लागला. चालु वर्षात ऑगस्ट अखेरपर्यंत विदर्भात ९१७ शेतकऱ्यांनी मृत्युला कवटाळले असून त्यातील ६९२ आत्महत्या या अमरावती विभागातील आहेत. आजवर अनेक समीत्यांचे अहवाल सादर झाले. परंतु शिफारशी आणि उपाययोजनांची योग्य अंमलबजावणी होत नाही. सरकारच्या योजना तात्पुरत्या मलमपट्ट्या ठरत असल्याची सार्वत्रिक भावना आहे. बळीराजा चेतना अभियानाच्या माध्यमातून सामाजिक सहाय्य व्यवस्थेचे पुनरुज्जीवन, समुपदेशनाची व्यवस्था करण्यात आली. परंतु या उपक्रमांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहचत नाही. गेल्या अनेक वर्षामध्ये सरकारने शेतकऱ्यांना उत्पादन वाढीसाठी प्रोत्साहीत केले. परंतु शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने पाहिजे तसे प्रयत्न झालेच नाहीत. उत्पन्न दुप्पट कसे करता येईल याचा अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारने महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. के. पी. विश्वनाथ यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. तसेच देश पातळीवर निती आयोगाचे रमेशचंद, कृषी अनुसंधान परिषदेचे महासंचालक डॉ. महापात्रा हे सर्व राज्यांच्या समित्यांना मार्गदर्शन करीत आहेत. परंतु एका रात्रीत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होईल अशी जादुची कांडी नाही हे मान्य केले पाहिजे.छोटी धरणे, जलसंधारणेचे काम, शेतमालाला दिल्या जाणाऱ्या आधारभुत किंमती हेच कृषी विकासाचे गमक आहे. शेतकऱ्यांसमोर उत्पन्न दुप्पट करतांना अनेक अडचणी आहेत. खरी समस्या ही महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तामिलनाडू, कर्नाटक या राज्यांसमोर आहे. प्रतिकुल हवामान, जलसंधारणाच्या अपुऱ्या सुविधा त्याला कारणीभूत आहेत.

शेतमालाची उत्पादकता वाढविणे हा सुरुवातीला धोरणाचा एक भाग होता पण आता वाढती उत्पादकता हीच एक समस्या बनली. शेतकरी आपला शेतमाल बाजार समितीत विक्रीस आणतो. लीलाव झाल्यानंतर तो काट्यावर मोजला जातो. यानंतर बैलगाडी किंवा इतर वाहनांतून खरेदीदाराकडे म्हणजेच व्यापाऱ्याकडे सुपूर्द होतो. मोजमाप झालेला माल बंडीतून उचलून नेण्याची जबाबदारी ही नियमानुसार खरेदीदारावरच असते. राज्यातील बाजार समिती उपविधीतील नियमानुसार शेतमाल उतरवून घेण्यासाठी द्यावी लागणारी मजूरी ही खरेदीदाराने देणे क्रमप्राप्त आहे. परंतु या नियमाचा भंग होत आहे. कापूस खाली करण्याची प्रति क्विंटल १० ते १५ रुपये मजुरी कंत्राटी कामगार शेतकऱ्यांकडून घेतात. यात शेतकऱ्यांचेच मोठे नुकसान होते. याची मात्र दखल घेतली जात नाही. शेतकऱ्यांना हा फटका बसू नये म्हणून बाजार समितीचे काम नियमानुसार व्हावे व शेतकऱ्यांना गैरव्यवहाराची

झळ बसू नये म्हणून दक्षता घेणे अपेक्षित आहे. कर्जबाजारीपणामुळे अकाली पावसाने, गारपीटीने तसेच बोंडअळीच्या प्रादुर्भावाने विदर्भातील कापूस उत्पादक शेतकरी संकटात सापडलेला आहे. वरोरा व भद्रावती तालुक्यातील काही विशिष्ट कापसाच्या वाणांवर बोंड अळीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झालेला आहे. विदर्भात बहुसंख्य भागात बोंड अळीने कापसाचे पिक उद्‌ध्वस्त केले आहे. शेतातील पऱ्हाटीची झाडे उपडून फेकत असल्याचे विदारक चित्र आहे. संत्र्यांची मोठ्या प्रमाणावर फळगळती झालेली आहे. त्यामुळे संत्री उत्पादक शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. सोयाबीनची खरेदी विविध अटी टाकून केली जात आहे. त्यावर शेतकऱ्यांना प्रचंड मन:स्ताप होत आहे. कर्जमाफीतील निकषांमुळे आपल्याला किती लाभ मिळणार हे स्पष्ट न झाल्याने विदर्भातील शेतकरी नाईलाजाने आत्महत्त्या करीत आहे. यात भंडारा व चंद्रपूर जिल्ह्यातील प्रत्येक एका शेतकऱ्याचा समावेश आहे. भंडारा जिल्ह्याच्या पवनी तालुक्यातील गोसे खुर्द धरणालगत असलेल्या आकोट येथील अल्पभुधारक शेतकरी टिकाराम दोडकू भुरे (४५) यांनी स्वत:च्या घरीच विष प्राशन करुन आत्महत्त्या केल्याची घटना उघडकीस आली. भुरे कुटूंबातील आठ महिन्यातील ही दुसरी घटना आहे.

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जात असला तरी भारतातील सरकारी धोरणे मात्र कृषीप्रधान नाहीत हे मात्र लक्षात येते. त्यामुळेच महात्मा ज्योतिराव फुले यांनी ‘शेतकऱ्यांचा आसूड’ आणि ‘गुलामगिरी’ या ग्रंथात शेतकऱ्यांच्या व्यथा तात्कालीन सरकार समोर मांडल्या होत्या. त्याचबरोबर भारताचे पहिले कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांनी देखील शेतीची परिस्थिती ओळखून शेतीचा विकास करण्यासाठी सरकारने लक्ष दिले पाहिजे या दृष्टीने प्रयत्न केलेत. परंतु अजुनही शेतकऱ्यांचे प्रश्न पूर्णपणे सुटलेले नाहीत. उलट शेतकरी दिवसेंदिवस पिचला जात आहे, त्याचे प्रश्न वाढत आहेत. शेतकऱ्याला घ्यावे लागणारे कर्ज केवळ उत्पादनासाठीच नसते. उद्योगामध्ये कर्ज घेण्याचा एकमेव उद्देश उत्पादनाची क्रिया सुरळीत चालवणे हा असतो. शेतीमध्ये मात्र उत्पादनाच्या एकूण स्वरुपामुळे ते चालू असतांना गरजा कशा पूर्ण करायच्या हा प्रश्न निर्माण होतो व त्यामुळे उपभोगासाठी सुद्धा कर्ज घ्यावे लागते. शेतीची नांगरणी करण्यासाठी नांगर व बैल भाड्याने घेणे, बियाणे खरेदी करणे, मजुरांची मजुरी देणे, इत्यादी खर्च कामासाठी कर्ज घेणे आवश्यक ठरते. अन्यथा उत्पादन करणे शक्य नसल्याने वर्षभर कसे जगावे हा प्रश्न निर्माण होतो. शिवाय जे काही उत्पादन केले जाते त्यात अनिश्चितता असते. आज उत्तम पिक दिसत असले तरी ते एखाद्या पावसाने किंवा इतर कारणाने हातात येईलच याची शाश्वती नसते. आणि म्हणून शेतकऱ्याला उत्पादन व उपभोग या दोन्ही करीता कर्ज घ्यावे लागते. शेतकरी कर्जाकरिता बँकेत येरझारा मारण्यात आपले दिवस खर्ची घालवत आहेत. कर्जमाफी झाल्याचे प्रमाणपत्र काही शेतकऱ्यांना देण्यात आले आणि पुन्हा ते प्रमाणपत्र परतही घेण्यात आले. बरेच दिवस उलटून गेले तरी देखील ना कर्ज माफ झाले ना नवीन कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. कर्जमाफीतला शेतकरी बँकेसाठी अजूनही कर्जदारच आहे. नवीन कर्ज घ्यायचे असल्याने तो दररोज कर्जमाफीची रक्कम बँकेत जमा झाली की नाही हे पाहण्यासाठी तो बँकेत

येतो. बँकेचे अधिकारी पैसे जमा झाले नाहीत असे सांगतात. त्यामुळे शेतकऱ्यांना आल्या पावली परतावे लागते. अशाप्रकारे शेतकऱ्यांची कर्जासाठी फसवणूक होते. नापीकी आणि कर्जबाजारीपणा आणि भावमंदीच्या फेऱ्यात अडकलेल्या विदर्भाच्या सहा जिल्ह्यातील ६१२ शेतकऱ्यांनी आत्महत्या के ल्याचे समोर आले आहे. यातील २३० प्रकरणे मदतीसाठी पात्र ठरली असून २३९ प्रकरणे ही अपात्र दाखविण्यात आली आहेत. तर १४३ प्रकरणे ही चौकशीसाठी प्रलंबीत आहेत. २०१५ मध्ये १३४८ शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ आली २०१६ मध्ये काही प्रमाणात आत्महत्यांमध्ये घट झाली असली तरी त्यावर्षी ऑक्टोंबर महिन्यापर्यंत ८७८ शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या झाल्या. यावर्षी पहिल्या दहा महिन्यातच ६०० पेक्षा अधिक शेतकरी आत्महत्त्या झाल्या आहेत. अवकाळी पाऊस गारपीट, यामुळे बँकेचे कर्ज फेडणे अशक्य होते. यावर्षी तर कर्जमाफीचा घोळ अजूनही संपलेला नाही. शेतकरी आर्थिकदृष्ट्या मोडून पडल्याचे चित्र बघायला मिळत आहे. आणि आत्महत्यांचे चक्र पुन्हा वाढण्याचा धोकाही व्यक्त होत आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या एकूण आत्महत्यापैकी २६% आत्महत्या मराठा जातीतील शेतकऱ्यांच्या असल्याची माहिती उघडकीस आली आहे. त्यापैकी दुष्काळग्रस्त मराठवाड्यातील मराठा जातीतील शेतकऱ्यांचे प्रमाण लक्षणीय असून ते ५३% असल्याची गंभीर बाबही पुढे आली आहे. उर्वरीत शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये कुणबी, दलित, बंजारा जातीतील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण मराठा जातीच्या आत्महत्त्याच्या खालोखाल आहे. २०१४-२०१६ या काळात आत्महत्त्या केलेल्या विदर्भ आणि मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यातील आत्महत्त्या केलेल्या शेतकऱ्यांच्या माहीतीवरुन हा अभ्यास करण्यात आला. या दोन वर्षाच्या काळात ३ हजार ८८१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. त्यापैकी ४७% आत्महत्या मराठवाड्यात झाल्या असून, विदर्भातील आत्महत्त्या केलेल्या शेतकऱ्यांचे प्रमाण हे ५२% आहे. यापैकी मराठा जातीतील आत्महत्येचे प्रमाण हे २६% असून कुणबी जातीचे प्रमाण १६% दलित १०% व बंजारा जातीतील प्रमाण हे ९% आहे. विदर्भातील कुणबी जातीच्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण हे सर्वाधीक असून त्यांचे प्रमाण हे ३०% आहे. विदर्भात मराठा जातीचे प्रमाण हे नगन्य असून येथे कुणबी मराठा किंवा कुणबी अशीच जात लावली जात असल्याने येथे मराठ्यांचे प्रमाण दिसत नाही. परंतु मराठा व कुणबी शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येचे प्रमान एकत्र धरल्यास ते ४६% होत असल्याचे नमुद करण्यात आले आहे. महत्वाच्या निरीक्षणानुसार जमीन नसलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येचे प्रमाण हे ५% असून ९५% आत्महत्या ह्या मालकीची जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांनी केल्या आहेत. आत्महत्त्या केलेल्या मराठा शेतकऱ्यांपैकी ४७% आत्महत्त्या ह्या जमीन नापीक असणाऱ्यांनी केल्या. तर ३८% आत्महत्त्या ह्या कमी प्रमाणात जमीन असणाऱ्यांनी केल्या. आणि १०% आत्महत्या ह्या मध्यम शेती असणाऱ्या शेतकऱ्यांच्या आहेत.

भारतातील शेतीच्या अर्थकारणात विविध पिकांमध्ये कापूस पिक हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. संपूर्ण देशात कापूस लागवडीच्या बाबतीत महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक लागतो. त्यातही महाराष्ट्र राज्याचा अभ्यास केल्यास विदर्भ हा कापूस

ISSN 2320-0197

पिकासाठी आघाडीवर आहे. संपूर्ण भारतात सुमारे १२५ लाख हेक्टर जमिनीवर कापसाची लागवड होत असून जागतिक कापूस लागवडीच्या सुमारे ३५% एवढे आहे. शेती तोट्यात येत असल्याने शेती व्यवसायातून बाहेर पडणाऱ्यांमध्येही मराठा जातीचे प्रमाण हे जास्त असून, मराठवाड्यात ते ६२% आहे. मराठवाड्यातील आत्महत्या केलेल्या मराठा जातीतील ५३% कुटूंबामध्ये कोणीही कमविणारे नाही. त्यापैकी ३४% कुटूंबांनी शेती करणे थांबविले असून २५% कुटुंबांनी आपल्या मुलांचे शिक्षण बंद केल्याचे निदर्शनास आले आहे.

यामध्ये मराठा जातीची जी अवस्था आहे, तीच अवस्था विदर्भातील कुणबी जातीची आहे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या ३४% कुटूंबांनी शेती सोडून दिली आहे. ३९% कुटूंबामध्ये कोणीही कमवणारे नाही त्यामुळे १५% आत्महत्याग्रस्त कुटूंबाच्या मुलांना शाळा सोडावी लागेल असा निष्कर्ष आहे. पुण्यातील गोखले इंस्टिट्युट ऑफ पॉलीटिक्स एन्ड इकॉनॉमीक्स या संस्थेने विदर्भ आणि मराठवाड्यातील आत्महत्या केलेल्या तीन हजार शेतकऱ्यांच्या कुटूंबाची घरोघरी जाऊन भेट घेतली. त्यातून ही माहिती समोर आली आहे.

**सारणी क्र. १**

| वर्षे | महाराष्ट्र | आंध्रप्रदेश | कर्नाटक | मध्यप्रदेश व छत्तीसगड | पाच प्रमुख कापूस उत्पादक राज्यातील एकूण शेतकरी आत्महत्त्या | संपूर्ण देशातील शेतकरी आत्महत्त्या | पाच प्रमुख कापूस उत्पादक राज्यातील शेतकरी आत्महत्त्येचे देशातील एकूण शेतकरी आत्महदत्येचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९९५ | १०८३ | ११९६ | २४९० | १२३९ | ६००८ | १०,७२० | ५६.०४ % |
| १९९६ | १९८१ | १७०६ | २०११ | १८०९ | ७५०७ | १३,७२९ | ५४.६८ % |
| १९९७ | १९१७ | १०९७ | १८३२ | २३९० | ७२३६ | १३,६२२ | ५३.१२ % |
| १९९८ | २४०९ | १२१३ | १८८३ | २२७८ | ८३८३ | १६,०१५ | ५२.३४ % |
| १९९९ | २४२३ | १९७४ | २३७९ | २६५४ | ९४३० | १६,०८२ | ५८.६४ % |
| २००० | ३०२२ | १५२५ | २६३० | २६६० | ९२३७ | १६,६०३ | ५९.२५ % |
| २००१ | ३५३६ | १५०९ | २५०५ | २८२४ | १०३७४ | १६,४१५ | ६३.२० % |
| २००२ | ३६९५ | १८९६ | २३४० | २५७८ | १०५०९ | १७,९७१ | ५८.४८ % |
| २००३ | ३८३६ | १८०० | २६७८ | २५११ | १०८२५ | १७,१६४ | ६३.०७ % |
| २००४ | ४१४७ | २६६६ | १९६३ | ३०३३ | ११८०९ | १८,२४१ | ६४.७४ % |
| २००५ | ३९२६ | २४९० | १८८३ | २६६० | १०९५९ | १७,१३१ | ६३.९७ % |
| २००६ | ४४५३ | २६०७ | १७२० | २८५८ | ११६३८ | १७,०६० | ६८.२२ % |
| २००७ | ४२३८ | १७९७ | २१३५ | २८५६ | ११०२६ | १६,६३२ | ६६.२९ % |
| २००८ | ३८०२ | २१०५ | १७३७ | ३१५२ | १०७९६ | १६,१९६ | ६६.६६ % |
| २००९ | २८७२ | २४१४ | २२८२ | ३१९७ | १०७६५ | १७,३६८ | ६१.९८ % |
| २०१० | ३१४१ | २५२५ | २५८५ | २३६३ | १०६१४ | १५,९६४ | ६६.४९ % |
| २०११ | ३३३७ | २२०६ | २१०० | १३२६ | ८९६९ | १४,०२७ | ६३.९४ % |
| **एकूण** | **५३८१८** | **३३३२६** | **३७१५३** | **४२३८८** | **१६६६८५** | **२,७०,९४०** | **६१.५२ %** |

Source National Crime Records Bureau (NCRB) Report

भारतातील प्रमुख कापूस उत्पादक राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या आत्महत्या (कालावधी

सारणी क्र. १

| वर्षे | महाराष्ट्र | आंध्रप्रदेश | कर्नाटक | मध्यप्रदेश व छत्तीसगड | पाच प्रमुख कापूस उत्पादक राज्यातील एकूण शेतकरी आत्महत्त्या | संपूर्ण देशातील शेतकरी आत्महत्त्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १९९५ | १०८३ | ११९६ | २४९० | १२३९ | ६००८ | १०,७२० |
| १९९६ | १९८१ | १७०६ | २०११ | १८०९ | ७५०७ | १३,७२९ |
| १९९७ | १९१७ | १०९७ | १८३२ | २३९० | ७२३६ | १३,६२२ |
| १९९८ | २४०९ | १२१३ | १८८३ | २२७८ | ८३८३ | १६,०१५ |
| १९९९ | २४२३ | १९७४ | २३७९ | २६५४ | ९४३० | १६,०८२ |
| २००० | ३०२२ | १५२५ | २६३० | २६६० | ९२३७ | १६,६०३ |
| २००१ | ३५३६ | १५०९ | २५०५ | २८२४ | १०३७४ | १६,४१५ |
| २००२ | ३६९५ | १८९६ | २३४० | २५७८ | १०५०९ | १७,९७१ |
| २००३ | ३८३६ | १८०० | २६७८ | २५११ | १०८२५ | १७,१६४ |
| २००४ | ४१४७ | २६६६ | १९६३ | ३०३३ | ११८०९ | १८,२४१ |
| २००५ | ३९२६ | २४९० | १८८३ | २६६० | १०९५९ | १७,१३१ |
| २००६ | ४४५३ | २६०७ | १७२० | २८५८ | ११६३८ | १७,०६० |
| २००७ | ४२३८ | १७९७ | २१३५ | २८५६ | ११०२६ | १६,६३२ |
| २००८ | ३८०२ | २१०५ | १७३७ | ३१५२ | १०७९६ | १६,१९६ |
| २००९ | २८७२ | २४१४ | २२८२ | ३१९७ | १०७६५ | १७,३६८ |
| २०१० | ३१४१ | २५२५ | २५८५ | २३६३ | १०६१४ | १५,९६४ |
| २०११ | ३३३७ | २२०६ | २१०० | १३२६ | ८९६९ | १४,०२७ |
| **एकूण** | **५३८१८** | **३३३२६** | **३७१५३** | **४२३८८** | **१६६६८५** | **२,७०,९४०** |

वरील तक्त्यावरुन लक्षात येते की १९९५ ते २०११ या कालावधीत संपूर्ण भारतात एकूण २,७०,९४० शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या असून त्यापैकी १६६६८५ शेतकरी आत्महत्त्या ह्या केवळ प्रमुख कापूस उत्पादक राज्यातील असून त्यातही सर्वात जास्त शेतकरी आत्महत्त्या ह्या महाराष्ट्रात झालेल्या दिसून येतात. परंतु महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्येपैकी सर्वात अधिक आत्महत्या ह्या

कापसाचे माहेरघर असलेल्या विदर्भात झालेल्या आहेत. ते खालील तक्त्यावरून लक्षात येईल.

**तक्ता क्र. २**

| वर्षे | विदर्भातील शेतकरी आत्महत्त्या |
|---|---|
| २००१ | ५२ |
| २००२ | १०४ |
| २००३ | १४८ |
| २००४ | ४४७ |
| २००५ | ४५५ |
| २००६ | १४४९ |
| २००७ | १२४७ |
| २००८ | ११४८ |
| २००९ | १००५ |
| २०१० | ११७७ |
| २०११ | ९९९ |
| २०१२ | ९५० |
| २०१३ | ८०५ |
| २०१४ | ९६३ |
| २०१५ | १५३६ |
| **एकूण** | **१२४८५** |

राज्य सरकारने कर्जमाफी जाहीर केल्यानंतर राज्यात ८०५ शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या झालेल्या आहेत. त्यातील निम्म्याहून अधिक आत्महत्त्या या शेतकरी आत्महत्याग्रस्त म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाना, वाशिम व वर्धा या सहा जिल्ह्यांमध्ये आहेत. गेल्यावर्षी दिवसाला सरासरी ६ शेतकरी आत्महत्त्या करीत होते. हेच प्रमाण आता ८ वर गेलेले आहे. गेल्या १७ वर्षात शेतकरी आत्महत्त्याग्रस्त सहा जिल्ह्यामध्ये १४ हजार ५४० शेतकरी आत्महत्त्या झालेल्या आहेत. सर्वात अधिक म्हणजे ३ हजार १४० शेतकरी आत्महत्त्या या केवळ यवतमाळ जिल्ह्यातल्या आहेत या सहा जिल्ह्यामध्ये २०१५ मध्ये १ हजार ३४८ शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या असून २०१६ मध्ये १ हजार २३५ शेतकऱ्यांनी तर २०१७ मध्ये ३० नोव्हेंबर पर्यंत १ हजार ३०० शेतकऱ्यांनी त्यांची जीवनयात्रा संपविली आहे.

**आत्महत्त्येची कारणे :**

कर्जमाफीची लांबलेली प्रक्रिया, नवीन कर्ज मिळवण्यात अडचणी, सोयाबीनचे हातातून गेलेले पिक, भावातील घसरण, कपाशीवर बोंड अळींचा प्रादूर्भाव याचा विपरीत परिणाम शेती अर्थकारमावर पडला असून कर्जमाफीच्या घोषनेनंतर पाच महिन्यात विदर्भातील ६ जिल्ह्याचे शेतकरी आत्महत्त्याचा आकडा ४४८ वर पोहचला आहे. शेतकरी आत्महत्त्यासाठी कर्जबाजारीपणा हे एक प्रमुख कारण मानले गेले आहे. कर्जाच्या वाढत्या बोझ्यामुळे आत्महत्त्या करणाऱ्यांचे प्रमाण २९% आहे. आणि नापीकीमुळे आत्महत्त्या करणाऱ्यांचे प्रमाण ९% असल्याचे महसूल विभागाच्या पाहणीत दिसून आले आहे. सततची नापीकी, आर्थिक उत्पन्नात घट, ताणतणाव, आजारपण, अपघात, मुलींच्या किंवा बहिणीच्या विवाहाची काळजी, घरगुती कारणे, व्यसनाधीनता आणि आरोग्याच्या तक्रारी अशी बरेच कारणे शेतकरी आत्महत्त्यामागे असल्याचे म्हटले जाते.

परंतु कर्जबाजारीपणा हे एक सामाजिक कारण असल्याचे दिसून येते. नैसर्गिक आपत्ती आणि रोगराईमध्ये उद्भवणारी नापीकी, वाढता उत्पादन खर्च, शेतमालाच्या चांगल्या दराचा अभाव, परिणामत: बँका व सावकाराकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करु न शकल्यामुळे आलेला कर्जबाजारीपणा तसेच संबंधीताकडून मागे लागलेला परतफेडीचा तगादा यातच मानसिकदृष्ट्या खचलेला शेतकरी आत्महत्त्या करण्यास प्रवृत्त होतो. शेतकऱ्यांना कर्ज

देण्यासाठी बँका तयार नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना सावकाराशिवाय पर्याय उरत नाही. ज्या दृष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी शेतकरी आजवर धडपडत होता. त्याच सावकारी पाशात अनेक शेतकरी ढकलले गेले. बरेच शेतकरी हे कृषी साहित्य विक्रेत्यांकडून उधारीवरच खरेदी करतात. त्यामुळे त्यांना व्याज जरी द्यावे लागत नसले तरी पण मोठ्या प्रमाणावर किंमत आकारली जाते. दर्जाहीन बियाणे आणि किटकनाशके त्यांच्या माथी मारले जाते. यावर्षी तर अनियमित पावसाने विदर्भातील सोयाबिनला फार मोठा हादरा दिला आणि कपाशिवर बोंडअळीने आक्रमण केले. सरकारने कर्ज माफीची घोषणा केल्यानंतर त्याचा सर्वात अधिक परिणाम हा कृषी पुरवठ्यावर झाला. पीक कर्ज हे शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी पूरक ठरत असते. ही व्यवस्था शेतकऱ्यांना सावकाराच्या दरात जाण्यापासून रोखत असते. परंतु यावर्षी कर्जमाफीचा घोळ निस्तारता न आल्यामुळे त्याचा सर्वात अधिक फटका विदर्भातील शेतकऱ्यांना बसला. शेतकरी आत्महत्यांसाठी पुढील घटक जबाबदार आहेत.

१) वाढता उत्पादन खर्च
२) वाढता कर्जबाजारीपणा
३) नैसर्गिक आपत्ती
४) वाढती महागाई
५) घरगुती कलह
६) उत्पादन खर्चावर आधारीत भाव न मिळणे.
७) शेतीला जलसिंचनाच्या सोयीचा अभाव.
८) चुकीची धोरण
९) जोडधंद्याचा अभाव
१०) सामाजिक चालीरितीवरील अनावश्यक खर्च.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या रोखण्यासाठी उपाययोजना :**

देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी अजूनही ६५% पेक्षा अधिक लोकसंख्या शेतीवर अवलंबून असल्याने अर्थव्यवस्थेत शेतीला महत्वाचे स्थान आहे. अर्थव्यवस्थेतील शेतीचे महत्व विचारात घेऊन पंचवार्षिक योजना काळात शेती विकासाचे अनेक कार्यक्रम राबविले असले तरी लागोपाठ दुष्काळाची परिस्थिती नापिकी व कर्जबाजारीपणा या दृष्टचक्रात गेल्या पाच वर्षामध्ये विदर्भातील ७१२७ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले आहे. आपण दोन वेळेला पोटभर जेवतो आणि ते अन्न पिकविणारा मात्र आत्महत्त्या करतो हा विरोधाभास थांबविण्यासाठी पुढील उपाय योजल्यास काही प्रमाणात आत्महत्त्येचे दर कमी होऊ शकेल.

**१) शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव दिला पाहिजे :**
विविध प्रकारचे अन्नधान्य पिकविण्यासाठी शेतकऱ्यांना बराच खर्च करावा लागतो परंतु शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचा योग्य भाव मिळत नाही त्यामुळे खर्च अधिक आणि उत्पन्न कमी अशी स्थिती निर्माण होऊन त्यांची आर्थिक स्थिती खालावते. उदा. कापसाला प्रति क्विंटल उत्पादन खर्च हा ५००० रु. च्या वर आहे. परंतु शासनाकडून कापसाला फक्त ४०५० रु. हमीभाव देण्यात येतो. त्यामुळे खर्च अधिक झाल्यामुळे आणि उत्पन्न कमी मिळाल्यामुळे तो आपले कर्ज फेडू शकत नाही म्हणून शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव दिला गेला पाहिजे.

**२) कर्ज सुविधा :** शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती

कमकुवत असल्याने शेतकरी स्वत:च्या उत्पन्नातून आणि बचतीतून शेतीविकासाच्या योजना राबवू शकत नाही. शेतकऱ्यांना स्वस्त व पुरेशा प्रमाणात कर्जपुरवठा व्हावा म्हणून पंचवार्षिक योजनाकाळात कर्जे पुरवठ्यास महत्व देण्यात आलेले असले तरी शेतीसाठी पर्याप्त आणि कमी दराने शासकीय संस्थाकडून कर्जपुरवठा होत नाही. त्यामुळे त्यांना खाजगी सावकारांकडेच कर्जासाठी जावे लागते. त्यामुळे सावकाराच्या अधिकच्या व्याजदरामुळे तो कर्जबाजारी होतो. म्हणून शेतकऱ्यांची सावकारांच्या कर्जातून सुटका करण्यासाठी शासनाने नाबार्ड व इतर राष्ट्रीयीकृत बँकेच्या सहाय्याने शेतकऱ्यांना ३% ते ४% या व्याज दराने कर्जपुरवाठा केला पाहिजे.

**३) पाणी पुरवठ्याच्या विविध योजना आणि वीजपुरवठा :**

शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी लागवडीखाली असलेल्या क्षेत्रापैकी जास्तीत जास्त क्षेत्र सिंचनाखाली आणले पाहिजे. सिंचनाखालचे क्षेत्र वाढावे म्हणून सरकारने पंचवार्षिक योजनाकाळात अनेक कार्यक्रम राबविले असले तरी विदर्भात ८९% तर यवतमाळचे ९५% शेती ही कोरडवाहू असल्याचे दिसून येते. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीत दोन-तिन वेळा पिक घेता येत नाही. म्हणून सरकारने लहान मोठे पाटबंधारे प्रकल्प, पाणी अडवा पाणी जिरवा, नदी व नाल्यावर बंधारे बांधणे यासारखे अनेक कार्यक्रम राबविले पाहिजे. उपलब्ध पाण्याचा जास्तीत जास्त वापर करुन व पाणी पुरवठ्याचे व्यवस्थापन करुन सिंचनाखालील क्षेत्रात वाढ केली पाहिजे. शिवाय शेतीसाठी पुरेसा वीजपुरवठा देखिल केला पाहिजे. जेणेकरून शेतकऱ्याला अनेकदा पिक घेता येईल आणि आपली स्थिती सुधारता येईल.

**४) पिक विमा योजना :**

अनेक वेळा अतिवृष्टी महापूर, चक्रीवादळ, गारपीट आणि अवेळी पडणाऱ्या पावसामुळे हाती आलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. शिवाय अशा प्रकारच्या नैसर्गिक संकटामुळे शेतकऱ्यांची उत्पादन वाढविण्याची प्रेरणा देखिल नाहीशी होते. अशा नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी म्हणून सरकारने पिक विमा योजना सुरु केली असली तरी त्याचा फायदा शेतकऱ्यांना फारसा झालेला नाही म्हणून ही योजना अधिक प्रभावीपणे राबविले पाहीजे.

**५) शेतीसाठी स्वतंत्र अर्थसंकल्प असावा :**

भारत देश हा शेतीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. परंतु शेतीकरीता अनुकुल धोरणे मात्र राबविले जात नाही. परिणामत: शेतकरी संकटात सापडला दिसून येतो. शेतकऱ्यांची स्थीती जर सुधारायची असेल तर खऱ्या अर्थाने शेतीकरिता स्वतंत्र असे अंदाजपत्रक तयार केले पाहिजे आणि त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी केली पाहिजे.

**६) शेतीविषयक संशोधन :**

वेगवेगळ्या भागात निसर्गत:च भिन्नता असल्याने विविध प्रकारची पिके घेतली जातात. शेतीची प्रत, हवामान, पर्जन्यमान

इत्यादी बाबी विचारात घेऊन कोणत्या भागात कोणती पिके घेणे सोईचे होईल हे कृषी विषयक संशोधन देशातील कृषी विद्यापीठे, कृषी संशोधक संस्था, शेती संशोधन परिषद, राज्य कृषी संशोधन केंद्रे इत्यादीकडून केले गेले पाहिजे. असे संशोधीत केलेले बि-बियाणे शेतकऱ्यांपर्यंत पोहचविल्यास शेतीची उत्पादकता वाढू शकते.

वरील उपाययोजना सोबतच शेतमाल विक्री व्यवस्थेत सुधारणा, पीक कर्ज योजना, संकरीत बि-बियाणांचा वापर, रासायनिक खतांचा व किटकनाशकांचा स्वस्त दराने पर्याप्त पुरवठा, शेतीपुरक जोडधंदे, शेतीवर आधारीत उद्योगाला स्थापना आणि विदेशात आयात होणाऱ्या शेतमालावर अधीक कराची आकारणी करणे इत्यादी उपाय योजले गेले. तर निश्चितच शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बळकट होईल आणि त्यांना चांगले जीवन जगता येईल. परिणामत: आत्महत्त्या आपोआपच कमी होईल असा विश्वास वाटतो.

◆◆◆

---

## स्व. प्रा.ढाले स्मृति प्रित्यर्थ एकदिवसीय राज्यस्तरीयय चर्चासत्राचा अहवाल

स्व. प्रा.ढाले स्मृति प्रित्यर्थ एकदिवसीय राज्यस्तरीयय चर्चासत्राचा अहवाल सादर करताना आनंद होत आहे की. कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर येथे विदर्भ अर्थशास्त्र परिषद व अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. प्रा. ढाले स्मृति प्रित्यर्थ एक दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र शुक्रवार दि. १० ऑगस्ट २०१८ ला महाविद्यालयाच्या सभागृहात सकाळी ठीक ११.०० वाजता संपन्न झाले. विदर्भ अर्थशास्त्राच्या कार्याध्यक्षा डॉ. अंजली कुळकर्णी यांच्या शुभहस्ते चर्चासत्राचे उद्‌घाटन झाले. चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. एन.एच.खत्री होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून सी.पी.ॲन्ड बेरार कॉलेज नागपूर येथील वाणिज्य शाखेच्या प्राध्यापिका डॉ. मेधा कानेटकर यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्या म्हणाल्या की, ग्रीन बँकींग हे अशी संकल्पना आहे की, ज्याद्वारे शाश्वत विकासाला मुहूर्त रूप देऊ शकते आणि लोकांचे भावी जीवन सुदृढ होऊ शकते म्हणून बँकांनी उद्योगांना कर्ज देतांना आवश्यक अटी व भरीव नियमांचे पालन करणाऱ्यांना वित्त पुरवठा करावा की ज्यामुळे पर्यावरणास हानी होणार नाही आणि प्रदूषण होणार नाही. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. आर.बी.भांडवलकर, डॉ. आर.आर.चव्हाण, डॉ. घिनमिने, मा.ललिता पुराणिक, संस्थेचे सहसचिव ॲड. जांभुळे साहेब, प्रा.डॉ.एस.बी.मोहीतकर, डॉ. ठावरी, डॉ.कायरकर, डॉ.विद्या बांगळे इत्यादी मान्यवर मंचावर उपस्थित होते. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे सचिव डॉ. चव्हाण यांनी चर्चासत्राची रूपरेषा स्पष्ट केली. डॉ. भांडवलकर यांनी स्व. प्रा.ढाले यांचे व्यक्तमत्व विशद केले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. खत्री सर अध्यक्षीय भाषणात म्हणाले की शिक्षणामुळे नवनिर्मिती होते. नवे विचार जन्माला येतात आणि आपण अधिक परिपूर्ण होत जातो म्हणून हे चर्चासत्र उपयुक्त ठरेल. हे चर्चासत्र ग्रीन बँकींग आधुनिक अर्थव्यवस्थेतील महत्त्वपूर्ण घटक या विषयावर संपन्न झाले. कार्यक्रमाचे आयोजन अर्थशास्त्र विभागाच्या वतीने करण्यात आले. संचालन अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. जे.एम.काकडे यांनी केले तर मान्यवरांचे आभार डॉ. प्रविण तेलखडे यांनी मानले. कार्यक्रमामध्ये डॉ. मालेकर, डॉ. महातळे, डॉ. बिडवाई, डॉ. विमनकर, डॉ. तितरे, डॉ. ठावरी, डॉ. कायरकर, प्रा. गुडधे, प्रा. लभाने, प्रा. रवि शेंडे इत्यादी प्राध्यापकांनी सक्रिय सहभाग घेतला. एकंदरीत हे चर्चासत्र चांगल्या प्रकारे संपन्न झाले.

# डेव्हीड रिकार्डो यांचे-The Principles of Political Economy and Taxation

(विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४१ व्या वार्षिक अधिवेशनात दि. ५ मार्च २०१७ रोजी झालेल्या 'आर्थिक ग्रंथातील विचार विश्व' या मालिकेतील व्याख्यानाचा सारांश)

**विनायक श्रीधर देशपांडे**
विभाग प्रमुख, व्यवसाय प्रबंधन विभाग,
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

डेव्हीड रिकार्डो यांच्या "The Principles of Political Economy and Taxation" या ग्रंथाला २०० वर्षे पूर्ण झालीत. त्या निमित्ताने डेव्हीड रिकार्डो यांच्या योगदानाबद्दल विवेचन, आर्थिक विषयांशी संबंधित प्रकाशित झालेल्या पहिल्या तीन ग्रंथापैकी रिकार्डो यांचा हा एक मूलभूत ग्रंथ. ॲडम स्मिथ आणि माल्थस यांच्या लिखाणानंतर प्रसिद्ध झालेला अभिमत संप्रदायाच्या वर्गातील रिकार्डो यांचा हा ग्रंथ. शास्त्रशुद्ध पद्धतीने आर्थिक प्रश्नांची उकल कशी करण्यात यावी याचे उत्तम उदाहरण म्हणजे डेव्हीड रिकार्डो यांचा ग्रंथ होय. निगमन पद्धतीचा यथायोग्य वापर या ग्रंथात आढळतो. गणितीय तंत्राचा वापर करून आर्थिक विश्लेषण कशा पद्धतीने करता येईल या बाबतची दिशा देण्याचे कार्य डेव्हीड रिकार्डो यांनी या ग्रंथाच्या माध्यमाने केले यात शंका नाही.

डेव्हीड रिकार्डो यांचा जन्म १७७२ साली लंडनच्या एका सधन कुटुंबात झाला. रोखे दलाल म्हणून त्यांनी आपली कारकीर्द सुरू केली. तरूण वयातच त्यांनी या कामापासून स्वत:ला दूर केले. ॲडम स्मिथ यांच्या 'वेल्थ ऑफ नेशन्स' या ग्रंथाने रिकार्डो यांना भारावून टाकले. थॉमस माल्थस यांच्या लोकसंख्या सिद्धांताचा देखील रिकार्डो यांच्या लिखाणावर प्रभाव पडला. परंतु माल्थस यांची सर्वच मने रिकार्डो यांना पटत होती असे नव्हे. रिकार्डो यांच्या लिखाणाचा भर उत्पन्न वितरणावर अधिक होता. रिकार्डो काही प्रमाणात माल्थस यांच्या लिखाणावर टिका करीत असत. परंतु या टिकेतून विधायक असेच योगदान रिकार्डो यांच्या मार्फत झाले. गव्हाच्या आयातीवर लादण्यात येणाऱ्या करावर रिकार्डो यांनी आक्षेप घेतला. रशिया सारख्या राष्ट्रांकडून होणाऱ्या गव्हाच्या आयातीवर या कराचा परिणाम झाला. कॉर्न लॉज १८०४ साली इंग्लंडमध्ये अंमलात आला. किंमतीचे निर्धारण, वेतन, खंड आणि नफा या माध्यमाने होत असल्याने जमिनीवरील खंडात वाढ झाल्यास उत्पन्न वितरणावर याचा परिणाम कसा होतो याचा विचार रिकार्डो यांनी केला. व्यापारावरील निर्बंध, संरक्षक प्रशुल्क हटविल्यास कृत्रिमरित्या जमिनीच्या खंडात होणाऱ्या वाढीवर आळा बसविता येईल असे रिकार्डो यांचे मत होते इंग्लंडमधील राजकीय घडामोडी आणि धोरणात्मक बदल घडून येणात रिकार्डोचे सैद्धांतिक विवेचन उपयुक्त ठरले. जमीन हा उत्पादनाचा स्थायी घट तर श्रम आणि भांडवल हे घटक लवचिक आहेत. जमिनीची कमतरता नेहमीच जाणवत राहील आणि त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नातील लक्षणीय हिस्सा जमीन

धारकांकडे जास्त प्रमाणात जाईल असा युक्तीवाद रिकार्डो यांचा होता.

रिकार्डो यांनी ॲडम स्मिथच्या लिखाणाकडे आस्थापूर्वक लक्ष दिले. रिकार्डो यांच्या पोलिटिकल इकॉनॉमी या ग्रंथात ॲडम स्मिथ यांच्या वेल्थ ऑफ नेशन्स या पुस्तकावरील टीकात्मक भाष्य असल्याचे जाणवते. ॲडम स्मिथने मूल्य या संज्ञेचे दोन अर्थ दर्शविले. काही परिस्थितीत मूल्य एखाद्या वस्तुची उपयोगिता परिवर्तीत करते तर काही वस्तुंच्या बाबतीत बाळगण्यात येणाऱ्या इतर वस्तूंच्या बाबत व्यक्तिची क्रयशक्ती दर्शविते. उपयोगिता किंवा उपयोगात येणाऱ्या वस्तुला विनिमय मूल्य राहीलच असे नाही. उदाहरणार्थ पिणाच्या पाण्याला विनिमय मूल्य राहणार नाही. परंतु सोन्यासारख्या वस्तुंना उपयोग मूल्य कमी राहील मात्र याचे विनिमय मूल्य पाण्याच्या तुलनेत खुप जास्त राहील. सोन्याचा व्यापार देखील मोठ्या प्रमाणात करता येऊ शकेल. रिकार्डो यांनी स्मिथ यांच्या या विधानावर कडाडून टीका केली. पाणी हे मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असल्याने त्याचे उपयोग मूल्याशी संबंध राहणार नाही. सोन्याच्या उत्पादनासाठी श्रमाला लागणारे मूल्य मोठ्या प्रमाणावर असल्याने सोन्याचे मूल्य जास्त असणे स्वाभाविक आहे असा युक्तीवाद रिकार्डो यांनी केला. मूल्य निधान (State of Value) सोन्याच्या बाबतीत जास्तच राहील. त्यामुळे अशा वस्तुंचे मूल्य जास्तच राहणार असे रिकार्डो यांचे मत होते. गुंतवणूकीचा स्तर सरतेशेवटी किंमतीच्या निर्धारणात महत्त्वपूर्ण ठरतो असे रिकार्डो यांचे म्हणणे होते. घटते सीमांत प्रत्याय नुसार भांडवलाच्या अधिकाधिक गुंतवणूकी सोबत त्यापासून मिळणारे सीमांतिक प्रत्याय घटत जात असल्याने व्यवसाय वर्धनक्षम (viable) करावयाचा असल्याने गुंतवणूकीत सातत्याने वाढकरावी लागेल. नवे उद्योग, नवी औद्योगिक रचना अधिकचे उत्पादन आणि उत्पादकता देऊ शकेल. नवप्रवर्तन आणि उत्पादनाचे नव तंत्र उत्पादनात सुधार घडविण्यासाठी कसे आवश्यक आहे याचा ऊहापोह रिकार्डो यांनी केला. डेव्हीड रिकार्डो हे स्मिथ प्रमाणे मुक्त व्यापार, मुक्त बाजाराचे समर्थक, श्रमिकांचे मूल्य आणि घटता सीमांत प्रत्याय सिद्धांत या दोहोंचा अर्थशास्त्रीय सिद्धांताच्या विकासावर लक्षणीय परिणाम झाला यात शंका नाही.

रिकार्डोच्या काळातील भांडवलशाहीच्या कल्पनांचा आज विचार केल्यास असे निर्देशनास येते की त्या फारच पुरोगामी होत्या. डेव्हीड रिकार्डो आणि इतर अर्थशास्त्रज्ञांनी सुमारे १८२० साली मांडलेले अर्थशास्त्रीय नवे विचार, तसे धक्कादायकच होते. लोकांना जगण्याचा अधिकार आहे या पारंपरिक विचारणीला त्यांच्या लिखाणात थारा नव्हता. गुलामगिरी, सरंजामशाहीमध्ये देखील सामान्य लोकांना एक स्वत:चे विश्व होते. त्यात त्यांना जगण्याचा अधिकार होता. फार सुस्थितीत ते होते असे नव्हे. गलिच्छ वस्तीत कदाचीत ते राहत असतील परंतु किमान तेवढा अधिकार त्यांना होता. बाजाराच्या माध्यमातून प्राप्त होणाऱ्या वस्तु व्यतिरिक्त लोकांना अधिकार नाही असे नवे शास्त्रीय विचार डेव्हीड रिकार्डो यांच्या माध्यमाने यावयास लागले. श्रमिक बाजारात श्रमिकांना स्वत:चे अस्तित्व टिकविणे अवघड झाल्यास त्यांनी स्थलांतरण करावे आणि ही प्रक्रिया त्या काळात फारशी अशक्य नव्हती. मुक्त बाजाराच्या तत्वप्रणालीचे मुलभूत तत्त्व श्रमिकांचे मोकळेपणाने स्थलांतर हे होते. रिकार्डो

यांचा प्रसिद्ध तौलनिक परिव्यय सिद्धांत श्रमिकांचे मुक्त स्थलांतर या गृहितावरच आधारित होता. अचल भांडवल आणि चल श्रमिक यावर आधारित रिकार्डो यांनी सैद्धांतिक मांडणी केली. आजच्या काळात मात्र विरूद्ध स्थिती असल्याचे जागवते 'भांडवल गमनशील आणि श्रमिक स्थिर'. आर्थिक सिद्धांत गृहितांवर आधारित असतात. परंतु ही गृहिते काल्पनिक नव्हती. रिकार्डोंच्या काळातील गृहिते वास्तवाला धरून होती. भांडवल हे मुख्यत्वे करून जमिनीच्या स्वरूपात असल्याने ते स्थिर स्वरूपाचे होते.

**क्रमवर्धी की क्रमक्षयी कराधान**

**(Progressive or Regressive Taxation):**

जमीनधारकांना अधिकाधिक श्रीमंत होता यावे अशी कर पद्धती त्या काळात ब्रिटन मध्ये कार्यरत होती असे रिकार्डो यांचे मत होते. गरीबांचे शोषण या कराद्वारे होत असे. तेव्हाच्या लोकशाहीवादी सरकारांनी क्रमवर्धी कराधान (progressive taxation) या कर पद्धतीचा वापर केला होता. अपार्टमेंटस मध्ये राहणारे भाडेकरू घर मालकांना भाडे आणि शासनाला कर देत असत. सर्वात जास्त उत्पन्न प्राप्त करणाऱ्यांनी त्यांच्या संपूर्ण आयुष्यात जवळपास १.२५ मिलियन डॉलर्स दिले असतील. ज्या लोकांनी आपली घरे भाड्याने दिलीत ते निम्न उत्पन्न वर्गात येत होते. कमी उत्पन्न गटातील लोक आपल्या आयुष्यात साधारणपणे दोन लाख पन्नास हजार पाऊंड कर देत होते. या वरून ही कर रचना उचितच होती असे म्हणता येईल. रिकार्डो यांच्या तत्वानुसार क्रमवर्धी कराधान पद्धतीचा त्या काळात इंग्लंडमध्ये विरूद्ध परिणाम झाला. मोठ्या घरांमध्ये राहणारे श्रीमंत लोक तक्रार करू लागले की त्यांना कराचा बोझा जास्त सोसावा लागतो. परंतु शासन बहुतांश कराची रक्कम कर दात्यांना अप्रत्यक्षपणे परतच करते. आधारभूत संरचनेच्या जसे शाळा, दवाखाने यांच्या विकासाकरिता खर्च करून उत्पादकतेत वाढ करण्याचा प्रयत्न शासनामार्फत करण्यात येतो. निर्माण झालेल्या आधारभूत संरचनेमुळे जमिनीच्या किंमती वाढीस लागतात. संपत्ती बाजारात अकल्पित लाभ किंवा भांडवली लाभ प्राप्त होण्यास सुरूवात होते. या भांडवली लाभाचे वाटप समप्रमाणात होत नाही. जमीनधारक/घर मालक या भांडवली लाभाचे लाभधारक असतात. कर देणाऱ्या भाडेकऱ्यांना असा लाभ मिळत नाही. कमी उत्पन्न असणारे कर दाते श्रीमंतांना अर्थसहाय्य करतात असा निष्कर्ष रिकार्डो यांचा होता. 'Every increase in house value for the top earners offsets any tax they contribute. During boom times it's been possible to clawback a lifetime's taxes in just three years. Meanwhile the lowest earners and those who rent pay more overall'.

**जमिनीचे मूल्य आणि उत्पादकता :**

परिपूर्ण बाजार सिद्धांत जमिनीच्या मूल्याबाबत स्पष्टीकरण करण्यास असमर्थ आहे असे डेव्हीड रिकार्डो यांनी १८१७ साली लिहिलेल्या 'दि प्रिन्सिपल्स ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी ॲन्ड टॅक्सेशन' या ग्रंथात नमूद केले. अर्थव्यवस्थेत जमीन हा अत्यंत महत्त्वपूर्ण आणि मौल्यवान घटक आहे असे रिकार्डो मानत असत. वास्तविक संपदा मूल्यातील (Real Estate Property value) प्रबळ घटक जमिनीचे मूल्य आहे असे लक्षात घेऊन रिकार्डो यांनी खंड सिद्धांताची मांडनी केली. निकृष्ट

जमीन जेव्हा विनामूल्य उपलब्ध असते तेव्हा जमिनीच्या दुसऱ्या तुकड्याला खंड प्राप्त होतो. जमिनीच्या उत्पादकतेत वाढ न होता देखील जमिनीच्या खंडात वाढ होऊ शकते. उत्पादकता, खंड, जमिनीपासून मिळणारा परतावा या तीन घटकांमध्ये आंतरसंबंध असतो. सीमांत उत्पादकतेच्या आधारे जमिनीच्या खंडाबाबतचे मूल्य निर्धारित होते. उपर्जित खंडाची संकल्पना (Accured Rent) रिकार्डो यांनी मांडली. जमिनीसाठी होणारी मागणी ही पराश्रित (Derived) मागणी असते आणि ही मागणी अन्नधान्याच्या किंमतीवर अवलंबून असते संपूर्ण समाजासाठी जमिनीचा पुरवठा स्थायी स्वरूपाचा असतो. अन्नधान्याच्या किंमतीत वाढ झाल्यास अन्नधान्याचे उत्पादन वाढविणे अधिक लाभदायक ठरते. त्यामुळे अन्नधान्य पिकवेल अशा जमिनीची मागणी वाढून त्याच्या वापरासाठी अधिकची किंमत मोजावी लागते.

**समारोप :**

योग्य वेळी योग्य कल्पना सुचणे हे रिकार्डो यांचे वैशिष्टय मानावे लागेल. विश्लेषणासाठी राज्य आधार असल्याने तुलनात्मक लाभ ही संकल्पना राज्याशीच संबंधित आहे. देशाच्या सीमा ओलांडण्याची प्रक्रिया वस्तुंच्याच माध्यमाने होउ शकेल. व्यापार व्यय अल्प असल्यास व्यापाराला चालना मिळते. जागतिकीकरणात तुलनात्मक व्ययाचा समुपयोग वस्तुंची देवाण घेवाण करुन करणे यावरच शेवटी भर आहे. रिकार्डोच्या सिद्धांताची प्रचिती आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या संदर्भात अनेक वर्षापर्यंत आली. जुनी जागतिकीकरणाची प्रक्रिया ज्याला रिकार्डो प्रणीत जागतिकीकरण म्हणता येईल यात चढ उतार देखील झाले. परंतु व्यापार व्ययात घट होउन वस्तुंची देवाण घेवाण या प्रक्रियेला चालना मिळतच राहीली. जागतिकीकरणात बदल झाला आणि या घटनेला नवा आयाम १९९० नंतर प्राप्त झाला. रिकार्डो यांच्या सिद्धांतात मूल्यांतर पणन (Arbitrage) वस्तुंच्याच संदर्भात दर्शविण्यात आले. भावी काळासाठी हे तत्व मार्गदर्शकच ठरले. सद्याचे विशिष्ट ज्ञान आणि भावी काळातील श्रमदलाच्या संदर्भात मूल्यांतर पणन संकल्पनेचा अवलंब करण्यास मदतच झाली. वस्तुंच्या हालचालीला लागणारा व्यय, कल्पकतेच्या आविष्काराची देवाण घेवाण करण्यासाठी लागणारा खर्च आणि लोकांचे येणे जाणे यावरील खर्च या तीन प्रकारच्या व्ययामुळे जागतिकीकरणाच्या मूल्यांतर पणनाला खीळ बसल्यागत झाले. साधारण १८२० च्या सुमारास वाफेच्या इंजिनामुळे वस्तुंच्या देवाण घेवाणीला लागणाऱ्या खर्चावर आळा बसला. व्यापार परिमाणात वाढ झाली आणि तुलनात्मक व्यय लाभदायक ठरुन रिकार्डो यांचा सिद्धांत व्यावहारिक झाला वस्तुंवर आधारित मूल्यांतर पणन जागतिकीकरणाची प्रक्रिया जोर पकडू लागली. वस्तुंच्या देवाण घेवाणा साठी लागणारा खर्च हा विचारांचे किंवा व्यक्तींच्या आदान प्रदान करण्यासाठी लागणाऱ्या खर्चापेक्षा कमी होता. जुन्या जागतिकीकरणात उत्पादन आणि सेवन या दोन बाबी भिन्न झाल्या. वस्तुंच्या आदान प्रदान खर्चात लक्षणीय घट झाल्याने एकाच ठिकाणी घडून येणारी उत्पादन आणि सेवनाची प्रक्रिया भिन्न होऊन आंतरराष्ट्रीय व्यापाराला चालना मिळाली. उत्पादनासाठी समूह निर्माण होऊ लागले व्यापाराने जोर पकडण्यास सुरुवात केली आणि रिकार्डोचा सिद्धांत प्रत्यक्षात साकार झाला. नव नवे तंत्रज्ञान

विकसित होण्यास सुरुवात झाली माहिती तंत्रज्ञानाने विचारांचे आदान प्रदान करण्याची सोय स्वस्त दरात उपलब्ध झाल्याने जागतिकीकरणाचा दुसरा टप्पा प्रारंभ झाला. जग बदलण्याची सुरुवात १९९० च्या काळात झपाट्याने सुरु झाली. तंत्रज्ञानाच्या सिमा या उद्योगाशी/पेढीशी निगडीत झाल्या आणि राष्ट्राच्या सिमा ही संकल्पना धुसर होत गेली. उदा. अमेरिकन गाडी उत्पादन तंत्रज्ञान अमेरिकन राष्ट्राचे नसून एका उद्योजकाचे आहे. उदयोन्मुख अर्थव्यस्थांना जागतिकीकरणामुळे विकास साधण्यास मदत झाली लोकांच्या वेतनात देखील वाढ झाली परंतु प्रगत राष्ट्रातील वेतन दर घटले अशी ओरड देखील सुरु झाली. नव्या जागतिकीकरणात आकस्मिकपणा, व्यक्ती केंद्रीतता, अनिश्चितता, अनियंत्रितपणा या बाबी वाढीस लागल्या. पद्धतिज्ञानाच्या देवाण घेवाणावर नियंत्रण आणणे अवघड झाल्याने वस्तुंच्याच आदान प्रदानावर बंधने आणण्यास सुरुवात झाली. गेल्या दोन दशकात ज्या रितीने वस्तु व्यापार वाढीस लागला त्याच पद्धतीने माहिती तंत्रज्ञानाच्या विकासामुळे येत्या ५ ते १० वर्षात सेवा क्षेत्राचा विकास जलद गतीने होणार आहे. मूल्यांतर पणन हे वस्तुंच्या संदर्भातील उत्पादन खर्चापर्यंतच मर्यादित न राहता विशिष्ट ज्ञानाच्या संदर्भात देखील रिकार्डो यांच्या तौलनिक परिव्यय सिद्धांतांचा विचार बदलत्या परिस्थितीत करावा लागेल.

◆◆◆

---

अमरावती येथील श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य आणि अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.आर.एम्.जोशी यांचे दि. १९ जानेवारी २०१९ रोजी वयाच्या ९६ व्या वर्षी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. १९७६-७७ मध्ये जे.एम्.पटेल कॉलेज, भंडारा येथे झालेल्या विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ७ व्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. त्यांच्या निधनाने अर्थशास्त्राच्या कुशल प्राध्यापकास आपण मुकलो आहोत. परिषदेच्या वतीने त्यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

# महात्मा गांधींचे आर्थिक विचार – एक विश्लेषण

**दि.व्यं.जहागिरदार**
संचालक,
कौटिल्य ज्ञान प्रबोधिनी, अमरावती.

**प्रस्तावना :**

दरवर्षी २ ऑक्टोबर रोजी साऱ्या जगात महात्मा गांधी जयंती साजरी होते. पण, गेल्या २ ऑक्टोबर २०१८ रोजी झालेल्या गांधी जयंतीस विशेष महत्त्व आहे. कारण, २ ऑक्टोबर २०१८ ते २ ऑक्टोबर २०१९ हे महात्मा गांधींचे १५० वे जन्म वर्ष म्हणून सर्व दूर साजरे होत आहे. महात्मा गांधी हे सत्य, अहिंसा आणि मानवतेचे पुजारी होते. भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे ते प्रमुख नेते होते. शस्त्रांचा वापर न करता देशाला स्वातंत्र्य मिळवून देणारे ते जगातले पहिले महापुरूष होते. (अर्थात भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात क्रांतिकारकांनी दिलेल्या सशस्त्र प्रतिकारासही महत्त्व आहेच !) महात्मा गांधींचे विचार आणि त्यांचे आचरण यांच्यात असणाऱ्या सारखेपणामुळे ते सर्व जगाला वंदनीय वाटले. त्यांच्या विचारांमधून व कृतीतून जगातील लाखो लोकांनी स्फूर्ति घेतली. दक्षिण आफ्रिकेत वास्तव्य असतांना गोऱ्यांच्या साम्राज्यशाही विरूद्ध त्यांनी प्रखर आंदोलन करून जगाचे लक्ष आपल्याकडे आकर्षित केले. आंदोलनाचा नवा मार्ग त्यांनी चोखाळला. भारतात इ.स. १९१५ मध्ये परतल्यानंतर त्यांनी तत्कालीन राजकारणात भाग घ्यायला सुरूवात केली. लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर १९२० नंतर त्यांच्याकडे नेतृत्व आपोआपच चालून आले. मिठाचा सत्याग्रह आणि भारत छोडो (१९४२) द्वारा त्यांनी ब्रिटिश साम्राज्याला दिलेला निर्वाणीचा इशारा या प्रमुख घटना भारतीय स्वातंत्र्य लढ्यास कलाटणी देणाऱ्या ठरल्यात. इ.स. १९२० ते १९४८ या काळात महात्मा गांधी हे भारतीय जनमानसाचे अनाभिषिक्त सम्राट ठरले !

महात्मा गांधी आणि महाराष्ट्र यांचा संबंध विशेष होता असे दिसते. त्यांचे राजकीय गुरू गोपालकृष्ण गोखले होते. त्यांना नामदार गोखले हे गंगेप्रमाणे पवित्र वाटले. मी गोखलेंचा वसा पुढे चालवीत आहे असे त्यांनी अनेक भाषणांमधून जनतेस सांगितले. महात्मा गांधींचे प्रिय शिष्य आचार्य विनोबा भावे ज्यांनी आयुष्यभर गांधीवादी विचारांचे पालन केले तेही महाराष्ट्रातले. महात्मा गांधींना महाराष्ट्र म्हणजे असंख्य कार्यकर्त्यांचे मोहोळ वाटत असे. भारतातील विशेषत: महाराष्ट्रातील असंख्य कार्यकर्ते महात्मा गांधींच्या विचारांशी जोडले गेलेत. साबरमतीचा आश्रम सोडल्यानंतर १९३६ ते १९४२ या काळात महात्मा गांधी सेवाग्रामच्या आश्रमात होते. अनेक अभ्यासकांचे असे मत आहे की, ज्या तत्त्वांचा प्रत्यक्ष आचरणातून त्यांनी प्रचार केला त्या तत्त्वांचे मूळ हे भारतीय संस्कृतीत आहे. त्यांच्या

जीवनावर, विचारांवर आणि त्यांनी सुरू केलेल्या आंदोलनांवर अक्षरशः हजारो पुस्तके विविध भाषांमधून प्रसिद्ध झाली आहेत. भारत सरकारच्या प्रकाशन विभागाने The collected works of Mahatma Gandhi हा ग्रंथ ९० खंडांमध्ये प्रसिद्ध केला आहे. थोर गांधीवादी श्री.डी.जी.तेंडूलकर यांनी गांधींचे चरित्र आठ खंडांमध्ये लिहिले आहे. आजही त्यांच्या कार्यावर व विचारांच्या प्रासंगिकतेवर अनेक पुस्तके व लेख लिहले जात आहेत. भारतातील सर्व गावांमधील व शहरांमधील एक तरी रस्त्यास महात्मा गांधीचे नाव दिले आहे. त्यांच्या नावे विद्यापीठे स्थापन झाली असून अनेक विद्यापीठांमधून त्यांच्या विचारांचा अभ्यास करणारी महात्मा गांधी अध्यासने निर्माण केली आहेत. हे ही लक्षात घेतले पाहिजे की गांधीच्या विचारांना विरोध करणारेही अनेक आहेत.

महात्मा गांधी हे पारंपरिक अर्थाने अर्थशास्त्रज्ञ नसले तरी मानवी जीवनाच्या सर्व व्यवहारांवर उदा. राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, नैतिक इ. वर भाष्य करणारे एक महान विचारवंत वा तत्त्वज्ञ होते. हे विविध व्यवहार परस्परांशी निगडीत आहे असे त्यांचे मत होते आणि हे सर्व व्यवहार सत्य आणि अहिंसेच्या कसोटीवर उतरले पाहिजे असे त्यांना वाटते होते. त्यामुळे अभ्यासक त्यांना मानवी जीवनाचे भाष्यकार मानतात. अत्यंत उच्च विचार आणि साधी राहणी यामुळे जगभरातील विद्वान, संशोधक, राजकारणी, शिक्षणतज्ज्ञ तसेच सर्वसामान्य स्त्री-पुरूष महात्मा गांधी या महापुरूषाला वंदनीय वाटतात.

**महात्मा गांधींचे आर्थिक विचार विश्व :**

महात्मा गांधींचे विचार हे अंतिमतः मानवाच्या उत्थापनासाठी होते, या व्यापक दृष्टीमुळे त्यांचे आर्थिक विचार पारंपरिक पद्धतीचे नसून मानवाचा एकसंध विचार करणारे होते. त्यांच्या सर्वच विचारांप्रमाणे आर्थिक विचार देखील सत्य आणि अहिंसा या दोन तत्त्वांवर आधारलेले होते. महात्मा गांधींचे प्रमुख आर्थिक विचार पुढील प्रमाणे सांगता येतील.

(अ) महात्मा गांधींचा तत्कालीन यंत्रयुगावर विश्वास नव्हता. यंत्रांच्या वापरामुळे मानव यंत्रांचा गुलाम बनतो अशी त्यांची धारणा होती. त्यांच्या अधिकाधिक उपयोगामुळे मानवाचे जे नैसर्गिक असे आनंदी जीवन असते ते यांत्रिक व अंतिमतः दुःखमय बनते. यामुळे त्यांनी यंत्रांना व त्यांच्या वापरास विरोध दर्शविला.

यंत्रांच्या सहाय्याने ज्या वस्तूंचे उत्पादन होते अशा वस्तूंच्या वापरास विरोध करण्यासाठी व खेड्यातील निरक्षरांना विशेषतः स्त्रियांनाही स्वाभिमानी जीवन जगता यावे म्हणून त्यांनी सूत कताईचा उपक्रम हाती घेतला. टकळी व पेळू (कापडाचा रुई काढलेला लांब गोलाकार तुकडा) यांच्या सहाय्याने सूत तयार केले तर आपोआपच सूत उत्पादनासाठी यंत्राचा वापर टाळता येतो. हे करणामागे ग्रामीण क्षेत्रात लाखो लोकांना रोजगार प्राप्त करून देणे हा प्रमुख उद्देश होता. पुढे तर सूत कातण्यासाठी त्यांनी चरख्याचा उपयोग सुरू केला. चरखा हे एक यंत्रच आहे. गांधीचा विरोध हा यंत्रामुळे निर्माण होणाऱ्या बेकारीस होता. यंत्र बेकारी निर्माण करतात ही त्यांची धारणा खरीच होती.

(ब) महात्मा गांधींनी श्रमाच्या प्रतिष्ठेला महत्त्व दिले. मानवी जीवनात श्रमाला महत्त्व असले तरी अनेक व्यक्ती शारीरिक श्रमास फारसे महत्त्व

देत नाहीतच तर उलट पक्षी असे श्रम तुच्छ मानतात. त्यामुळे दैनंदिन व्यवहारात प्रत्यक्ष शारीरिक काम करून महात्मा गांधींनी श्रमाचे महत्त्व अधोरेखित केले व श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. शारीरिक श्रमाला तुच्छ वा हिण मानले की ते श्रम करणाऱ्यांनाही आपण तुच्छ किंवा हिणकस मानू लागतो. जर प्रत्येकाने श्रम केले तर श्रम करणाऱ्यांबाबत आपल्या मनात तुच्छता निर्माण होणार नाही. श्रमिक वर्ग आणि मध्यम व श्रीमंत वर्गातील दुरावा दूर होऊ शकेल. आपल्याकडे संत गाडगे महाराजांनीही कीर्तनातून व आचरणातून श्रमाचे महत्त्व सिद्ध केले. श्रमाला योग्य महत्त्व दिल्यास ते श्रम करणाऱ्यांच्या कामालाही योग्य किंमत देण्याची प्रवृत्ती रुजेल.

(क) आधुनिक काळातील वर्ग विग्रह महात्मा गांधींना पसंत नव्हता. समाजात मालक विरुद्ध कामगार यामधील वर्ग संघर्ष कार्ल मार्क्सने स्पष्ट करून मालक श्रमिक वर्गाचे कसे शोषण करतात हे जगासमोर मांडले होते. महात्मा गांधींना वाटत होते की या दोन वर्गांनी परस्परात बंधूभवाने वागावे. या दोन वर्गाच्या हितसंबंधात समन्वय प्रस्थापित करणे शक्य आहे असे महात्मा गांधींना वाटत होते. असा समन्वय साधला जावा म्हणून त्यांनी विश्वस्ताची कल्पना मांडली. धनिक वा मालक वर्गाने स्वत:स उत्पादनाचे मालक न समजता विश्वस्त मानावे. हा विश्वस्त उत्पादनापासून मिळणाऱ्या नफ्याचा मालक असणार नाही. असा विश्वस्त प्राप्त नफ्याचा वापर कामगारांसहित संपूर्ण समाजाच्या हितासाठी करेल. त्यामुळे मालक वर्गाची शोषण करण्याची प्रवृत्ती संपुष्टात येईल. यावर असा प्रश्न विचारला जाईल की विश्वस्त राहून नफा समाजाच्या कल्याणासाठी वापरण्यास मालक वर्ग तयार होईल का? यावर उपाय असा की या वर्गाचे सत्याग्रहाचे मार्गाने हृदय परिवर्तन करावे. अंतिम परिणाम साध्य करण्यासाठी महात्मा गांधींचा हृदय परिवर्तनावर गाढा विश्वास होता.

(ड) महात्मा गांधींच्या विविध विचारांपैकी त्यांनी ग्रामोद्योगाचे केलेले समर्थन अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. ग्रामोद्योगासोबत त्यांना हस्तव्यवसायाच्या कल्पनेचाही पुरस्कार केला होता. याचा संबंध भारतातील ग्रामीण जीवनाशी विशेषत: ग्रामीण क्षेत्रातील दारिद्र्य आणि बेकारीशी आहे. गोपाळकृष्ण गोखले यांना गांधींजी गुरू मानत. त्यांच्या सूचनेनुसार त्यांनी भारतात इ.स. १९१५ मध्ये परतल्यावर वर्षभर संपूर्ण भारतात प्रवास केला (ते त्या प्रवासात प्रथमत: गुरुदेव टागोरांना शांतिनिकेतन येथे भेटावयास गेले होते). या भारत भ्रमणात त्यांनी डोळे व कान उघडे ठेवले व शक्यतो न बोलण्याचे ठरविले होते. भारताच्या ग्रामीण भागातील तीव्र दारिद्र्य व बेकारी त्यांनी पाहिली व अनुभवली. (''गांधी'' या चित्रपटात महात्मा गांधी भारतात फिरतांना एका नदीकाठी येतात. किनाऱ्यापासून थोड्या दूर अंतरावर एक गरीब स्त्री स्नान करीत असते. त्या स्त्रीजवळ स्नानानंतर वापरण्यास कुठलेच वस्त्र नसते. गांधी स्वत:जवळील पंचा/उपरणे पाण्यात टाकतात. पंचा वाहत जाऊन त्या स्त्रीपर्यंत पोहचतो. ती स्त्री हा पंचा घेते... अत्यंत हृदयस्पर्शी पण देशातील दारिद्र्य दर्शविणारा हा सीन उत्कटतेने व कलापूर्ण पद्धतीने चित्रित झाला आहे.) आपल्या मनावर ठसा उमटतो तो भारतातील निर्धनतेचा अत्यंत हलाखीच्या परिस्थितीचा. प्रत्यक्ष गांधींनाही या वास्तवाची

कल्पना आली. भारत भ्रमणामुळे महात्मा गांधींना दारिद्र्यासोबत देशातील बेकारीही दिसली. ग्रामीण क्षेत्रातील लघु व कुटीर उद्योगांना उत्तेजन देण्याची आवश्यकता त्यांच्या लक्षात आली. देशात भांडवल अल्प असून श्रमिक भरपूर असल्याने ग्रामोद्योगांची उभारणी करणे, त्यांना बळकट करणे गरजेचे आहे. खादी उत्पादनाचा पुरस्कार करून महात्मा गांधी थांबले नाहीत तर स्वत: खादीचे वस्त्र वापरण्यास सुरुवात केली. खादीच्या प्रचारामुळे त्याकाळात अक्षरश: क्रांती घडून आली. अनेक नेते व सामान्य जनता देखील खादीचा पेहराव करू लागलेत. स्त्रिया देखील खादीच्या साड्या वापरू लागल्यात. अशा पार्श्वभूमीवर महात्मा गांधींनी खेड्यात चला हा नारा दिला.

(इ) महात्मा गांधींनी आपल्या गरजा कमी करण्याचे आव्हान जनतेला केले. अनावश्यक गरजा व वासनांचा त्याग करण्यास जनतेने शिकले पाहिजे. व्यक्तीने गरजा कमी केल्यात तर मानवी जीवनातील संघर्ष कमी होईल. संपूर्ण समाजात समतेची स्थापन होण्यास मदत होईल. एका अर्थाने पूर्वीच्या काळातील साधुसंतांनी पुरस्कृत केलेली तत्त्वेच महात्मा गांधी सांगत होते.

महात्मा गांधीने जे आर्थिक विचार सांगितले ते त्यांच्या राजकीय, शैक्षणिक, सामाजिक विचारांशी सुसंगत होते. त्यांना संपूर्ण मानव समाजात अहिंसात्मक पद्धतीने बदल घडावा असे वाटत होते. ते म्हणालेत,' My mission is to convert every indian and finally the world to non-violence for regulating mutual relation whether political, economic, religious.......'

**महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांची यथार्थता :**

आजच्या स्थितीत महात्मा गांधींचे आर्थिक विचार लागू पडतील काय किंवा महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांची यथार्थता काय? असे प्रश्न मनात उद्‌भवणे शक्य आहे. इथे एक मुद्दा प्रथमत: अधोरेखित केला पाहिजे. कोण्याही अभ्यासकाने वा तज्ञाने जे विचार सांगितले असतात ते पुढील काळात जसेच्या तसे लागू पडत नसतात. महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांची यर्थाथता दोन टप्प्यात पाहू.

भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पं. जवाहरलाल नेहरू महात्मा गांधींच्या इच्छेनुसार पंतप्रधान झालेत. नेहरूंनी महात्मा गांधींच्या नेतृत्वात स्वातंत्र्य लढ्यात सक्रिय सहभाग घेतल्याचा इतिहास आपणा सर्वांना माहीत आहे. त्यांना महात्मा गांधींची विचारसरणी पूर्णपणे माहीत होती. म. गांधीच्या विचारसरणीचा पं. नेहरूंवर प्रभाव पडला असला तर पं.नेहरू आधुनिक विचारांचे व विज्ञाननिष्ठ होते. पं.नेहरू १७ वर्षे देशाचे पंतप्रधान होते. त्यांनी म.गांधींचे विचार प्रत्यक्षात आणले का? त्यांना भारताला आधुनिक राष्ट्र बनवायचे होते. पं.नेहरूंनी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून मोठ्या उद्योगांच्या विकासावर भर दिल्याने स्वाभाविकपणेच ग्रामोद्योगाकडे दुर्लक्ष झाले. पण याच काळात डी.जी.कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने लघू व कुटीर उद्योगांच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण शिफारशी केल्यात. त्यातल्या काही अंमलात आणल्यात तर काही अंमलात येऊ शकल्या नाहीत. पुढील पंचवार्षिक योजनांमध्येही औद्योगिकीकरणाचा उद्देश कायम राहिला व मोठ्या उद्योगांच्या स्थापनेवर भर दिला गेला. बदलत्या जगापुढे जे प्रश्न होते ते लक्षात घेता पं. नेहरू यांनी विज्ञान व तंत्रज्ञानाची कास धरून मोठ्या उद्योगांच्या स्थापनेवर भर दिला. पुढील काळात हा निर्णय बरोबर होता असे म्हटल्या

गेले. इ.स. १९९१ नंतर तर अर्थव्यवस्थेचे चित्र झपाट्याने बदलले. जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाच्या व्यवस्थेत खाजगी क्षेत्रात नव्या मोठ्या आधुनिक उद्योगांची स्थापना व विकास झाला. जीडीपी वाढविणे, निर्यात वृद्धी करणे, विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक कशी वाढेल हे पाहणे व त्यासाठी देशात अनुकूल वातावरण निर्माण करणे, आधारभूत संरचनेचा विकास इ. उद्दीष्ट्ये गाठतांना महात्मा गांधीच्या आर्थिक तत्त्वांचा विचार होऊ शकला नाही, तसे शक्यही नव्हते. या सर्व प्रकरणात देशातील पर्यावरणाची जी नासधूस झाली ती पाहून महात्मा गांधीच्या विचारांची नव्याने आठवण येऊ लागली.

आचार्य विनोबा भावे हे महात्मा गांधी यांचे खरे शिष्य होते. त्यांच्यावर म. गांधीच्या विचारसरणीचा खोल परिणाम झाला होता. त्यांनी भूदान यज्ञाचे आर्श्चयकारक काम करून शेतजमिनी नसणाऱ्या हजारोंना जमिनीवरील अधिकार मिळवून दिले. ग्रामदान हा देखील त्यांचाच कार्यक्रम. ग्रामीण क्षेत्रात अशा कार्यक्रमांचा चांगलाच परिणाम झाला. विनोबांप्रमाणे असे अनेक म. गांधींचे अनुयायी होते की ज्यांनी म. गांधीच्या आर्थिक विचारसरणीचा प्रसार व प्रचार केला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा या संदर्भात उल्लेख करावा लागेल. त्यांची ''ग्रामगीता'' हे त्यांचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

दुसऱ्या टप्प्यात आपण तात्त्विक दृष्टिकोनातून म. गांधींच्या विचारांची यथार्थता पाहू. म. गांधींचा यंत्रास विरोध होता. यंत्रामुळे मानवी जीवन यंत्रवत होते ह्या कारणाने व यंत्रामुळे बेकारी वाढते या कारणांमुळे त्यांनी यंत्रास विरोध केला. सध्याच्या बदलत्या स्थितीत यंत्रांचा वापर वाढत आहे. पण आपण विवेकाने त्या यंत्राचा वापर केला तर आपले जीवन यंत्रवत होणार नाही. तसेच यंत्राचा वापर असा करावा किंवा यंत्रे अशी निर्माण करावीत की ज्यामुळे बेकारी वाढणार नाही. असे करणे अशक्य नाही. श्रमिक व मालकांमध्ये वर्गसंघर्ष असल्याने त्याचे समजावर प्रतिकूल परिणाम होतील असे जरी समाजवादी म्हणत असले तर त्यांच्यात बंधुभाव निर्माण करण्याची नीती महात्मा गांधींनी सांगितली होती. वर्तमान काळात हा संघर्ष शासनाने कायद्यांच्या द्वारा जी व्यवस्था उभी केली आहे त्यामुळे तो उघडपणे दिसत नाही. गांधी म्हणत की मालकांनी स्वत:ला उत्पादनाचे मालक न मानता विश्वस्त मानले पाहिजे. मोठ्या कंपन्यांना आपल्या फायद्याचा २ प्रतिशत हिस्सा सामाजिक दायित्व म्हणून समाजासाठी खर्च करावा लागतो. अनेक उद्योगपती प्रचंड देणग्या सामाजिक कार्यांसाठी देत आहेत. हळूहळू त्यांना जीवनाचे वैय्यर्थ पटू शकते व ते नफ्याचा मोठा हिस्सा शिक्षण, आरोग्य इ. कार्यासाठी खर्च करू लागतील. महात्मा गांधी खेड्यात चला असे म्हणत. आज तर अनेकजण खेड्यातून शहरांमध्ये स्थलांतरित होत आहेत. अशा स्थितीत लोकसंख्या खेड्यांमध्ये आकर्षिल्या जाईल का? सध्या जशी स्थिती आहे ती तशीच राहिली तर जनता शहरांकडेच धाव घेईल. शेतीची स्थिती सुधारून जर शेती फायदेशीर झाली, ग्रामीण क्षेत्रात लघू उद्योगांची संख्या वाढली आणि खेड्यातही दर्जेदार शिक्षण व आरोग्य सेवा मिळू लागल्यात तर खेड्यातून शहरांकडे जाणारा लोंढा थांबेल व शहरातील जनता शहरी अडचणींना कंटाळून खेड्यात जाऊ लागतील असे मानणे सहज शक्य आहे.

महात्मा गांधींनी गरजा कमी करण्यावर भर दिला आहे. त्यांचा हा विचार केवळ आर्थिक

दृष्टीकोनातूनच नाही तर त्यांच्या जीवन मूल्यांच्या संदर्भात महत्त्वाचा आहे. त्यांच्या स्वत:च्या गरजा बऱ्याच सीमित होत्या. वर्तमान काळात मानव समूहाच्या ज्या गरजा सतत वाढत आहेत त्या सुखासाठी तसेच चैनीसाठी आहेत. त्या गरजांच्या पूर्ततेसाठी मोठ्या प्रमाणावर विविध वस्तू आणि सेवांचे उत्पादन होत आहे. अनेक वेळा हे उत्पादन करतांना नैसर्गिक संपत्तीचा प्रमाणाबाहेर वापर होतो व सोबत पर्यावरणाचाही विध्वंस होत असतो. ही प्रक्रिया केवळ भारतातच नाही तर जगभर विशेषत: विकसित देशांमध्ये वेगाने चालू असल्याने जागतिक पातळीवर पर्यावरणाची हानी होत असून जागतिक पर्यावरण धोक्यात आले आहे. अशा स्थितीत मानवाने आपल्या गरजा विवेकाने मर्यादित केल्या तर उत्पादनाची रचना बदलेल. अनावश्यक वस्तू व सेवांच्या उत्पादनावर आळा बसेल व पर्यावरणाची हानी थांबविता येईल. जागतिक पातळीवर पर्यावरण संवर्धन करण्यासाठी विविध राष्ट्रांच्या ज्या परिषदा होतात त्यात प्रामुख्याने पर्यावरण हानी थांबविणाऱ्या तांत्रिक बाजूंचाच विचार होतो. तेथे महात्मा गांधींनी सांगितलेल्या या कार्यक्रमाचा विचार केला जावा. काही अभ्यासकांचे मत आहे की गरजा कमी केल्याने उत्पादन घटेल व त्याचा विकासावर प्रतिकूल परिणाम होईल. विकास म्हणजे उत्पादन वाढ असे मानणेच चूक आहे. विकास म्हणजे समानतेकडे वाटचाल, पर्यावरण संवर्धन, मानवी जीवनातील शांती असे अर्थ स्वीकारलेत तर गरजा कमी करण्यावर भर देणे किती योग्य आहे याची प्रचिती सर्व मानवांना येईल. अर्थात हे खरे की गरजा जशा वेगाने वाढतात तशा वेगाने त्या कमी होणार नाहीत. त्याला वेळ द्यावा लागेल. हळूहळू टप्प्या टप्प्यानेच त्या कमी करता येईल. येथे मानवी मनावर संस्कार अभिप्रेत आहेत.

महत्त्वाचा लाख मोलाचा प्रश्न : आपणास महात्मा गांधीचे विचार खरोखर मनातून अंमलात आणण्याची इच्छा आहे का? उत्तर होय असेल तर तसे करणे शक्य आहे. उत्तर नाही असेल तर सारेच खुंटले !

**संदर्भ ग्रंथ :**


1) Guha Ramchandra (2012) : Makers of Modern India, Penguin Books.
2) Fischer Louis (1950) : The Life of Mahatma Gandhi, Harper and Row.
3) Bettelheim Charles ( 1969) : India Independent, MR Press.
4) Diwan Ramesh & Lutz Mark (Ed.) (1985) : Essays in Gandhian Economics, Gandhi Peace Foundation.
५) प्रधान ग.प्र. (१९६६) : स्वातंत्र्य संग्रमाचे महाभारत, साधना प्रकाशन.
६) भोळे भा.ल.(२००२) : भारतीय राजकीय विचारवंत, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स.
७) जहागिरदार दि.व्यं. (२०१८) : महात्मा गांधींचे आर्थिक विचार, दै. हिंदुस्थान, ८ ऑक्टोबर.
८) केतकर कुमार (१९८५) : कथा स्वातंत्र्याची, महाराष्ट्र राज्य पाठ्य पुस्तक मंडळ.
९) पंडित नलिनी (१९८३) : गांधी, ग्रंथाली प्रकाशन.


◆◆◆

# महात्मा गांधींची स्त्री सक्षमीकरणातील भूमिका

**वर्षा गंगणे**
एम.बी. पटेल महाविद्यालय,
देवरी, जि. गोंदिया.

**प्रस्तावना :**

राष्ट्रपिता महात्मा गांधी हे एक अष्टपैलू व्यक्तीमत्व होते. याची ओळख त्यांच्या 'मोहनदास ते महात्मा' या जीवनप्रवासावरून होते. स्वातंत्र्यलढयातील त्यांचा कार्यभाग आणि सामान्यजनांचे अधिकार, हित आणि न्यायासाठी त्यांचा लढा यामूळे त्यांची जगाच्या नकाशावर स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे. थोडक्यात आज गांधी संपूर्ण जगाला परिचीत आहे. त्यांची ओळख आणि तत्वांची गरज जगाला आवश्यक वाटू लागली आहे. सत्य, अहिंसा या शस्त्रांचा आधार घेत त्यांनी सत्याग्रह केले. पारतंत्र्याकडून स्वातंत्र्याकडे वाटचाल केली. एका संवेदनशील व्यक्तीमत्वाने केलेले हे कार्य युगानुयुगे सुवर्णाक्षरांनी लिहिले जावे असेच आहे. त्यांच्या १५० व्या जयंतीनिमित्य अनेक कार्यक्रम विविध क्षेत्रात विविध पातळयांवर राबविले जात आहेत जे त्यांच्या कार्याला उजाळा देणारे आहेत. गांधीजींचा परिचय देश-विदेश तसेच नविन पिढीला जवळून करून देण्यासठी त्यांच्या सन्मानार्थ त्यांच्या व्यक्तीमत्वाच्या अनेक पैलूंवर देखील प्रकाश टाकण्यात येत आहे.

महात्म गांधींची अनेक कार्ये विविध उदाहरणांद्वारे वेळोवेळी स्पष्ट करण्यात येत असली त्यांची स्त्रिया व त्यांच्या अधिकारांबाबत असलेली कार्ये तेवढी प्रकाशात आलेली नाही किंबहुना त्यावर उपहासात्मक व टिकात्मक चर्चा करण्यात आली. आज स्त्रीसबलीकरणाचा केला जाणारा विचार व कार्ये तसेच जे प्रयत्न केले जातात ते अनेक वर्षांपूर्वी गांधीजींनी केले. गांधीजींची स्त्रीसक्षमीकरणाबाबतची कार्ये, गांधी वाचतांना लक्षात येतात. स्त्रीसक्षमीकरण या ज्वलंत व अत्यावश्यक मुद्दयांची गरज आणि ओळख मोठया प्रमाणात आज चर्चेत आहे. स्त्रियांना आजही समानतेची पातळी लाभलेली नाही. त्यासाठी शासनाद्वारे अनेक उपक्रम व योजना राबविल्या जात आहेत. स्त्रियांना विकसीत केल्यास कुटुंब व पर्यायाने देश विकसीत होईल हे समाजसुधारक व पुरोगामी विचारांच्या पुढाऱ्यांना लक्षात आल्यामुळे त्यांनी या मुद्दयाला उचलून धरले व दुजोराही दिला त्यापैकी महात्मा गांधी हे एक होत.

**स्त्रीसक्षमीकरण म्हणजे काय ?**

माझ्या मते ''स्त्रियांना मोकळा श्वास घेता येणे म्हणजे स्त्रीसक्षमीकरण होय''. तसेच,

- स्त्रियांना एक मानवघटक म्हणून समानतेची वागणूक मिळणे म्हणजे स्त्रीसक्षमीकरण होय.
- स्त्रियांना न्याय हक्क, अधिकार व स्थान याविषयी जाणिव निर्माण करून देणे व तशी

वागणूक तिला मिळवून देणे म्हणजे स्त्रीसक्षमीकरण होय.

* देशाची एक नागरिक म्हणून घटनेनुसार तिला बरोबरीचा दर्जा प्रत्यक्षात मिळणे म्हणजे स्त्रीसक्षमीकरण होय.

या व अश्या काही व्याख्या लक्षात घेतल्यास महात्मा गांधींची स्त्रीसक्षमीकरणाबाबतची भूमिका अधिक स्पष्ट होते. गांधी हे पहिले व्यक्ती होते ज्यांनी स्त्रियांचे स्वातंत्र्य मान्य करीत खांद्याला खांदा लावून स्वातंत्र्य चळवळीत त्यांना सहभागी करून घेतले. राजकारणात स्त्रियांचा सहभाग वाढल्याशिवाय खऱ्या अर्थाने स्त्रीसक्षमीकरण साधता येणार नाही हे विधान प्रयत्नपूर्वक त्याकाळी गांधीजींनी प्रत्यक्षात आणले. संयम, ब्रम्हचर्य यांचे दाखले देत थक्क करणारी उदाहरणे याबाबत पुरेशी बोलकी आहेत. सत्याचे प्रयोग या त्यांच्या आत्मचरित्रात गांधी आणि त्यांच्या जीवनातील स्त्रीबाबतचा दृष्टीकोन याचा परिचय अत्यंत जवळून होतो आणि या थोर पुरूषाबाबत असणारा आदर अनेक पटींनी वाढतो.

**विषय निवडीची उद्दिष्टे :**

१. महात्मा गांधी आणि स्त्रीसक्षमीकरण या मुद्दयावर प्रकाश टाकणे.
२. महात्मा गांधींच्या स्त्रीसमक्षमीकरणाच्या कार्याची आजच्या स्त्रीसक्षमीकरणाचा पाया म्हणून विचार मांडणे.
३. स्त्रीसक्षमीकरण या अतिमहत्वाच्या मुद्दयाबाबत गांधीजींची भूमिका स्पष्ट करणे.
४. स्त्रीसक्षमीकरणासाठी गांधीच्या कार्यातील त्याग, सातत्य व कळकळ स्पष्ट करणे.
५. काळाची गरज असणाऱ्या या मुद्दयावर साधक-बाधक चर्चा घडवून आणणे.

महात्मा गांधीच्या जीवनातील अनेक घटना स्त्रीसक्षमीकरणास पोषक व समर्थनार्थ असल्याने दिसून येते. गांधीजींचे स्त्रीसक्षमीकरणाचे कार्यक्षेत्र व्यापक असले तरी त्यावर प्रकाश टाकण्यांत लेखकांनी हात आखडता घेतला आहे. काही ठळक घटनांवर प्रकाश टाकल्यास गांधीजींची स्त्रीसक्षमीकरणाबाबतची भूमिका स्पष्ट करता येईल.

*** घटना क्र. १ :**

गांधीजींचा विवाह :- वयाच्या १३ व्या वर्षी गांधीजींचा विवाह १४ वर्षीय कस्तुराबाईंशी झाला व पुढे त्या कस्तुरबा झाल्या. गांधीजींनी स्त्रीसक्षमीकरणाची सुरूवात आपल्याच कुटुंबापासून केली. गांधींच्या प्रत्येक आंदोलनात कस्तुरबा त्यांच्यासोबत होत्या. समानतेचे सर्व अधिकार त्यांना बहाल होते. राजकीय कार्यकर्त्या आणि नागरिकांच्या कल्याणासाठी हक्कांसाठी लढणाऱ्या त्या एक स्वतंत्र्य सैनिक होत्या. गांधीनी सामाजिक चौकट मोडीत आपल्यापेक्षा वयाने मोठया असलेल्या कस्तुरबासह संसार मांडला तसेच त्यांना बरोबरीचा मान देत त्यांच्या कार्यांना प्रोत्साहन व प्रेरणा दिली. दृढता आणि एकनिष्ठतेची ती मूर्ती असून मोहनदासचा महात्मा बनविण्यात कस्तुरबाची भूमिका महत्वपूर्ण आहे हे त्यांनी मान्य केले होते.

*** घटना क्र. २ :**

दक्षिण आफ्रिकेतील ट्रान्सवाल सरकारने कर आकारण्याच्या विरोधात जो लढा देण्यात आला त्यात अनेक स्त्रियांनी बरोबरीने सहभाग घेतला. सत्याग्रहाद्वारे हा कर रद्द करण्यासाठी गांधीजींच्या प्रेरणेने हजारो स्त्रिया रस्त्यावर उतरल्या त्यापैकी काही तुरूंगात देखील गेल्या. अन्यायाविरोधतील

लढयात स्त्रियांचा समान सहभाग हे स्त्रीसक्षमीकरणास अत्यावश्यक असणारे उदाहरण होय.

*** घटना क्र. ३ :–**

विवाहविषयक कायदा – कायदेशीर (रजिस्टर्ड) विवाहखेरीज इतर विवाहांना मान्यता नाही असा सुप्रिम कोर्टाच्या न्यायाधिशाने आफ्रिकेत निर्णय दिल्यानंतर अनेक स्त्रियांनी यास विरोध दर्शविला. या निर्णयामूळे बहुतांश विवाह रद्द ठरवित अपत्यांना वारसा हक्क नाकारण्यात आला. लग्नाच्या पत्नीलाही दुसऱ्या पत्नीचा दर्जा देण्यात आला. याविरूद्ध महिलांनी सत्याग्रह पुकारला. तेव्हा त्यांना नेटालची राजधानी मेरिसबर्ग येथे ठेवण्यात आले. नंतर या स्त्रियांनी स्वातंत्र्य लढयात देखील सहभाग घेतला. येथेच वालियम्मा यांचे निधन झाले.

*** घटना क्र. ४ :–**

बलात्कारपिडीत महिलेचा प्रश्न – गांधीजींनी जौहार प्रथेस विरोध केला. बलात्काराच्या भयाने केलेला जौहार योग्य आहे कां ? बलात्कार पिडीत बांग्लादेशी आई–बहिणी व बायकोस कुटुंबाने स्विकारण्यास नकार दिल्यानंतर त्यांनी आपल्याच वेणीने फासी लावून आत्महत्या केली. बलात्कारापूर्वी जौहार आणि बलात्कारानंतर आत्महत्या या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

दुसऱ्या महायुद्धानंतर सैनिकांनी शत्रुदेशातील स्त्रियांवर बलात्कार केले तेंव्हा एकीने गांधीना पत्र लिहून तीन प्रश्न विचारले.

१. जर वाटेत राक्षसरूपी माणूस चालत्या स्त्रीवर बलात्कार करेल तर शील भंग होईल कां ?
२. ती तिरस्कारास पात्र आहे कां ?
३. जनतेने काय करावे ?

१ मार्च १९४२ रोजी गुजराती 'हरिजनबंधू' या पत्रिकेत गांधींनी या पत्रास उत्तर दिले की, अत्याचारग्रस्त कोणत्याही तिरस्कार व बहिष्कारास पात्र नाही. ती तर दयेची पात्र आहे. घायाळ आहे. तिची सेवा आपले दायित्व आहे. वास्तविक शील तिचे भंग होते ज्यासाठी ती स्वत: सहमत असते. शीलभंग हा बदनामी सूचक शब्द आहे. यावरून त्यांचे स्त्रियांबाबतचे सकारात्मक व सुधारणावादी विचार स्पष्ट होतात.

*** घटना क्र. ५ :–**

हरिजन महिलांना आव्हान – १४ सप्टेंबर १९४२ रोजी 'हरिजन' पत्रिकेतून, हरिजन महिलांना निर्भयता, आत्मबळ, आणि नैतिक बळ मिळविणे आवश्यक आहे. असे आव्हान त्यांनी लेखणीद्वारे केले. आत्महत्येस विरोध करण्यासाठी पूर्ण ताकतीचा वापर करावा. त्याकाळी स्वराभास्कर (आजचा दैनिक भास्कर) ने त्याची दखल घेतली.

*** घटना क्र. ६ :–**

गांधीजींचे वक्तव्य – १५ सप्टेंबर १९२१ च्या यंग इंडियात गांधीजींचे खळबळजनक वक्तव्य प्रकर्षित झाले. ''मी जर स्त्री असतो तर पुरूषांसाठी कधीच शृंगार केला नसता'' पुरूषांसाठी स्त्रीने शृंगार करावा याला गांधींनी प्रखर विरोध केला. माणूस जेवढया वाईट प्रवृत्तींसाठी जवाबदार आहे, त्यापैकी सर्वात हिन प्रवृत्ती म्हणजे नारीजातीचा दुरूपयोग आहे. स्त्रियांनी देखील स्वत:ला पुरूषांची भोग वस्तू म्हणणे बंद करावे. पुरूषांनी स्त्रियांना कळसुत्री बाहुली बनविले आहे आणि स्त्रियांना देखील याची सवय झाली आहे. कारण पतनाच्या गर्तेत पडणारा माणूस आपल्यासोबत दुसऱ्यालाही ओढतो त्यामूळे क्रिया सहज सोपी होते. या शब्दात त्यांनी पुरूषांच्या वाईट वर्तनांची निंदा केली.

**※ घटना क्र. ७ :–** गांधींचे दृढ मत – २ मे १९३६ च्या 'हरिजन' च्या अंकात त्यांनी लिहिले. माझे दृढ मत आहे की, स्त्रियांनी आपल्या नवऱ्यांना नाही म्हणणे शिकले पाहिजे. त्यांना हे सांगितले जावे की, त्या पतीच्या हातातील कठपुतळया नसून त्यांचेही काही अधिकार व कर्तव्ये आहेत. यावरून गांधीजींचे स्त्रियांच्या सक्षमीकरणाबाबत विचार स्पष्ट होतात.

**※ घटना क्र. ८ :–**

लोकशाही आणि महिला – गांधीजींच्या मते – लोकशाही आणि महिला यांचे अतुट नाते आहे. पुरूषांप्रमाणे सगळे हक्क, अधिकार व स्वातंन्त्र्य स्त्रियांनाही आहेत. त्यांनी हे अधिकार त्यांच्या संपर्कात असणाऱ्या स्त्रियांना बहालदेखील केले होते. निर्णयक्षमतेत स्त्रियांना स्थान मिळावे असे ते म्हणत.

**※ घटना क्र. ९ :–**

आश्रमांची स्थापना – साधी राहणी उच्च विचारसरणीसह गांधीजींनी आश्रमांची स्थापना केली. त्यांची सचिव, डॉक्टर, फोटोग्राफर, स्त्रियाच होत्या. यावरून पुरूषांप्रमाणे स्त्रियादेखील उत्तम पदे भूषवू शकतात हे त्यांनी दाखवून दिले. निराधार व अत्याचारग्रस्त गांधी विचारांचे पालन करून आश्रमात आधार दिला जात असे.

भारताच्या स्वातंत्र्यलढयात गांधीजींसह लढणाऱ्या, त्यांच्या तत्वांचे अनुसरण करणाऱ्या काही स्त्रिया होत्या त्यात प्रामुख्याने ॲनी बेझंट, सरोजीनी नायडू यांची नावे उल्लेखनिय आहेत. गांधीच्या विचारांनी प्रेरित होऊन अनेक विदेशी स्त्रियादेखील त्यांच्या अनुयायी बनल्या. त्यांच्याशी वागतांना स्त्रीसक्षमीकरणाच्या प्रयत्नांचे अनेक दाखले गांधीजींनी जगापुढे ठेवले. गांधीजी एखादी सुधारणावादी गोष्ट स्वत: अंगिकारत आणि नंतर ती इतरांना सांगत त्यामूळे त्यांच्या स्त्रियांबाबतच्या उदारमतवादीपणाला अनेकदा मान्यता मिळाली तर अनेकदा त्याला विरोध देखील झाला. त्यावर टिकांची झोडही उठली. वाईट चर्चाही झाली. चांगल्यापेक्षा वाईटाकडे बोट दाखविणाऱ्यांना 'गांधी समजलाच नाही' असे खरमरीत उत्तरही मिळाले. एखादी स्त्री आपल्यामूळे चर्चेत येत असेल तर आपण त्यापासून दूर होणे तिच्यासाठी अधिक हिताचे असते. असा कठोर निर्णय ते सहजपणे घेत असत.

**※ गांधीजींच्या संपर्कातील प्रमुख ८ स्त्रिया :–**

**१. मेंडेलीन (१८९२–१९८२) :–** एडमिरल सर एडमंड स्लेडची मुलगी मेडेलीन ही गांधीविचाराने प्रेरित होऊन त्यांच्या विचारांचे व शिस्तीचे अनुसरण करू लागली. नंतर गांधीने तिचे नाव मीराबेन असे ठेवले.

**२. नीला क्रॅम क्रूक (१९७२–१९४५) :–** हिला सगळे नील नागिण असे म्हणत. स्वत:ला कृष्णाची गोप्पी म्हणवून घेणारी नील स्वातंन्त्र्य लढयासोबतच सामाजिक सुधारणांसाठी कार्यरत राहिली. स्पृश्य–अस्पृश्यांच्या लढयात तिचा सहभाग होता. १९३३ साली येरवडा येथे गांधींची भेट झाल्याव ती त्यांची अनुयायी झाली.

**३.सरल देवी चौधरानी(१८७२–१९४५) :–** रविंद्रनाथ टेगोर यांच्या मोठया बहिणीची मुलगी सरलदेवी, संगित, लेखन, भाषा इत्यादित पारंगत होती. गांधी तिला महानशक्ती म्हणत बंगालच्या सशस्त्र स्वातंन्त्र्य लढयातील ती पहिली स्त्री होती. गांधींसह तिने खादीचा प्रसार व प्रचार केला. गांधी तिला अनेकदा 'आध्यात्मिक पत्नी' देखील म्हणत.

**४.सरोजीनीदेवी नायडू (१८१९-१९४९) :-** भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची पहिली अध्यक्षा सरोजीनी देवी नायडू स्वातंत्र्य लढयातील एक सक्रीय व्यक्तीमत्व असून मीठ सत्याग्रहाच्या पुढारी नेत्या होत्या. त्यांची स्वतंत्र ओळख होती. गांधींसह सत्याग्रह करतांना त्याही अनेकदा तुरूंगात गेल्या.

**५.राजकुमारी अमृत कौर(१८८९-१९६४):-** पंजाबच्या कपूरथला येथील राजा हरनामसिंग यांची शाही कुटुंबातील मुलगी राजकुमारी अमृत कौर गांधींची सर्वात जवळची सत्याग्रही होती. भारत छोडो आंदोलनात ती (१९४२) तुरूंगात गेली. स्वतंत्र भारताची ती पहिली आरोग्यमंत्री होती.

**६.डॉ. सुशिला नायर / नय्यर (१९१४-२००१)** :- गांधीजींचे सचिव प्यारेलाल यांच्या पत्नीच्या बहिणीची मुलगी सुशीला गांधीची खाजगी डॉक्टर होती. कस्तुरबांच्या अखेरच्या दिवसात तिने खूप सेवा केली. ब्रम्हचर्याचे प्रयोग यात तिची मोलाची भूमिका होती. भारत छोडो आंदोलनात कस्तुरबासह तिही तुरूंगात गेली होती. गांधीच्या हत्येप्रसंगी ती सोबत होती.

**७. आभा गांधी :-**

गांधीजींचे पणतू कनु गांधी यांची आभा पत्नी होती. प्रार्थना सभेत ती सुंदर भजने म्हणत असे. ती फोटोग्राफर देखील होती. १९४० सालचे बरेच फोटो आभा गांधींने काढले आहेत. दंग्यांच्या काळात ती गांधीबरोबर होती. नथ्थूराम गोडसे ने गोळी झाडली तेव्हा ती उपस्थित होती.

**८. मनू गांधी :-**

मनू गांधी गांधीजींची पणती होती. वयाच्या ८ व्या वर्षी तिच्याच वडिलांनी तिच्यावर बलात्कार केल्यामूळे ती शारिरिक व मानसिक दृष्टया खचलेली होती. वयाच्या १७ व्या वर्षी ती गांधीजींच्या संपर्कात आली. आणि खाजगी सहाय्यक म्हणून काम करू लागली. नंतर तिचे नाव मृदुल गांधी असे ठेवण्यात आले. गांधीच्या म्हाताऱ्या शरिराला खांदा देत ती सदैव त्यांच्या सोबत राहिली. गांधीच्या वाटेत मलमुत्र टाकणाऱ्यांच्या विरोधात ती गांधीसोबत स्वच्छता करीत असे.

वरिल स्त्रिया गांधीजींच्या सातत्याने संपर्कात होत्या. त्यांच्याशी वागतांना गांधींनी स्त्रियांविषयीची सकारात्मक भूमिका स्पष्टपणे मांडली ज्यामधून स्त्रियांना स्वतंत्रपणे कार्य करण्याची संधी मिळाली व त्या पुढे येत गेल्या. या प्रमुख स्त्रियांशिवाय अनेक स्त्रिया गांधीजींच्या सत्य, अहिंसा, सत्याग्रह, प्रार्थना, उपवास, आध्यात्म, शिस्त, नियम, संयम, ब्रम्हचर्य, यासारख्या तत्वांनी प्रभावित झाल्या होत्या. 'कस्तुरबा ए सिक्रेट पोस्ट', डायरीची लेखिका तिलीया असनमिया यांनी गांधींच्या अनेक खाजगी पत्रांवर व वागणूकीवरही प्रकाश टाकला. रामभूज दत्तू यांची पत्नी सरलादेवी आणि गांधीबाबत उठलेल्या वावटळी याची चर्चा तिने यामधून केली. पण... यातून गांधी स्वत: बाजूला झाले. सरल देवींच्या पतीच्या निधनानंतर त्या हिमालयात वास्तव्यास गेल्या व तेथेच त्यांचे निधन झाले. यावरून त्यांची समयसूचकता, सामाजिकता, निर्णयक्षमता तसेच स्त्रियांप्रती सन्मान दिसून येतो.

**स्त्री सक्षमीकरणाबाबत ठळक मुद्दे :**

'मोहनदास ते महात्मा' या गांधीजींच्या जीवनप्रवासात स्त्रीसक्षमीकरणाबाबत फारसा स्वतंत्र उल्लेख नसला तरी त्यांच्या कार्यांच्या अभ्यासाअंती स्त्रीसक्षमीकरणात त्यांची भूमिका स्पष्ट करणारे काही ठळक मुद्दे मांडता येतील.

१. गांधीनी स्त्रियांना सर्वप्रथम स्वातंत्र्यलढात सहभागी करून घेतले व त्यांना यासाठी प्रयत्न केले.

२. स्त्रियांचे शिक्षण, कला व राजकीय सहभागाला महत्व दिले.

३. स्त्रियांना हक्क आणि अधिकारांसाठी लढणे शिकवले.

४. लोकशाहीत स्त्रीघटकाचे महत्व वेळोवेळी पटवून दिले.

५. स्त्रिया धैर्याने व आत्मविश्वासाने कार्य करू शकतात हे त्यांनी स्पष्टपणे दाखवून दिले, आत्मविश्वास रूजविला.

६. स्त्रियांच्या गुणांना वाव देत तिला आत्मनिर्भरतेचे धडे दिले.

७. कुटुंबातील तिचे मत व स्वातंन्त्र्य मान्य करण्यावर वेळोवेळी पत्रिकांमाधून लेखन केले.

८. राजकीय क्षेत्रात स्त्रियांचे प्रमाण वाढावे असा सतत पाठपुरावा त्यांनी केला.

९. शांती–अहिंसा–स्वावलंबन आणि सत्याग्रहाचे धडे त्यांनी स्त्रियांनाही दिले.

१०. सत्याचे प्रयोग व ब्रम्हचर्य पालन याबाबत स्त्रियांवर बंधने लादली नाहीत.

थोडक्यात गांधी आणि स्त्रीसक्षमीकरण यांचा सखोल अभ्यास केल्यास त्यांच्या संपर्कातील प्रत्येक स्त्रीचा एक इतिहास असलेला दिसून येतो. त्यांना उजळ माथ्याने जगासमोर वावरता येण्यासाठी त्यांना आश्रमात राहण्याची परवानगी देण्यात आली. याची जाणिव त्यांच्या समग्र खंडांचा अभ्यास केल्यानंतर होते. स्त्रीसक्षमीकरणात आफ्रिका ते भारत या देशांत गांधीजींची भूमिका महत्वपूर्ण अशीच होती.

**⁕ निष्कर्ष :–**

१. गांधीजी स्त्रियांना सन्मान व आदर करणारे पुरोगामी विचारांचे स्वतंत्र्य सेनानी होते.

२. स्त्रियांना त्यांच्या न्याय, हक्क व अधिकारांसंबधी सदैव प्रेरित करून त्यांना पाठिंबा दिला.

३. गांधीजींच्या तत्वज्ञानाने प्रभावित स्त्रिया भारताच्या स्वातंत्र्य लढयातील विरांगना व नायिका ठरल्या.

४. स्वातंत्र्य लढयात स्त्रियांची सक्षम भूमिका गांधींनी समोर आणली व त्यांना निर्भय बनविले.

५. गांधींच्या स्त्रीसक्षमीकरणाच्या स्वतंत्र भूमिकेवर अभ्यासकांनी पाहिजे तेवढा प्रकाश टाकला नाही.

**शिफारसी :**

१. महात्मा गांधीच्या समग्र खंडांचे अध्ययन करून त्यातिल स्त्रीसक्षमीकरणाच्या बाजूवर प्रकाश टाकण्यात यावा.

२. शिस्त, प्रेम, अहिंसा, सत्याग्रह, उपवास, प्रार्थना यांचे महत्व स्त्रीसक्षमीकरणाच्या दृष्टीने पटवून देण्यात यावे.

३. स्वातंत्र्य लढयातील स्त्रियांचा परिचय व कार्य यांची तरूण पिढीला ओळख करून देण्यात यावी.

४. आज गांधीवादी विचारसरणीची गरज मान्य करून अध्ययन व अभ्यासक्रमात त्याचा समावेश केला जावा.

५. लोकशाही व्यवस्थेत स्त्री हा घटक महत्वाचा आहे यावर आजही प्रकाश टाकण्यात यावा.

६. स्त्रियांना बरोबरीचा दर्जा, सुरक्षा व सन्मान देण्यासाठी सर्व स्तरांतून प्रयत्न केले जावेत.

७. स्त्रियांनी स्वावलंबी व आत्मविश्वासाने पुढे जावे.

**सारांश :**

२ ऑक्टोबर १८६९ साली पोरबंदर येथे करमचंद आणि पुतळीबाई यांच्या पोटी मोहनदास यांचा जन्म झाला. 'मोहनदास ते महात्मा' हा त्यांचा जीवनप्रवास अनेक घडामोडी, जगण्याचे संदर्भ देणाऱ्या घटना आणि सत्याच्या प्रयोगांनी भरलेला आहे. महात्माबापू ते राष्ट्रपिता या संबोधनात त्यांचे अफाट कतृत्व, प्रेम, माया, नेतृत्वक्षमता आणि समानता व आपलेसे करून घेण्याची वृत्ती दिसून येते. 'आधी करावे मग सांगावे' हे गांधीचे एक मुख्य तत्व होते. म्हणूनच त्यांनी आधी स्वत:वर प्रयोग केले, वागणूकीस बदल केले आणि नंतर लोकांना सांगितले कदाचित म्हणूनच ते 'सत्याचे प्रयोग' या नावाने आत्मचरित्रात मांडले गेले. स्त्रियांना लढण्यासाठी, आत्मसन्मानासाठी लागणारी प्रेरणा, प्रोत्साहन आणि भक्कम आधार त्यांनी वेळोवेळी दिला. म्हणूनच त्यांच्या सोबत काम करणाऱ्या स्त्रिया कणखर, सक्षम आणि स्वतंत्र विचारांसह जगू शकल्या. स्त्रीसक्षमीकरणाचे यापेक्षा चांगले उदाहरण कोणते असू शकेल ? आजच्यापेक्षा गांधीकाळातील स्त्री अधिक सक्षम होती कां ? असा प्रश्न समोर येतो.

आज स्त्रीसक्षमीकरणासाठी अनेक योजना, धोरणे, आणि नियम शासन राबवित आहे तरी देखील स्त्री सुरक्षित व उपेक्षित आहे. जगण्याचे संदर्भ बदलले असले तरी तिला तिचे मुलभूत हक्क आणि अधिकार अजूनही मिळालेले नाहीत. मानवविकास निर्देशांकात भारताचा क्रमांक जगात १२१ वा असला तरी त्यात स्त्रियांची स्थिती व स्थान कसे आणि कुठे आहे ? याचा विचार करणे गरजेचे आहे. स्त्री सक्षमीकरणासाठी केवळ, कायदयाची नव्हे तर प्रेरणा व मानसिक आत्मबळाची गरज आहे हे गांधीजींच्या तत्वज्ञानातून आत्मसात करण्याची नव्याने गरज आहे असे मला प्रकर्षाने म्हणावेसे वाटते.

**संदर्भसूची :**

१. गांधीदर्शन, डॉ. एम.के. मिश्रा, डॉ. कमल दाधिच, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली.

२. गांधी से महात्मा गांधी तक, अनुवाद सत्याचे प्रयोग, प्रो. विरेंद्र कुमार अग्रवाल, इंडियन बुक बँक.

३. महात्मा गांधी, मनोज कुमार, रवि रंजन, कल्पना प्रकाशन, नई दिल्ली.

४. वृत्तपत्रे, लोकसत्ता, महा. लोकमत.

◆◆◆

# लघु व कुटिर उद्योगातील रोजगार विषयक राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचे विचार

**प्राची दिलीप देशपांडे**
सेवानिवृत्त, अर्थशास्त्र विभाग प्रमुख
महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर.

**मृणालिनी तापस**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री निकेतन कला-वाणिज्य महाविद्यालय, नागपूर.

**प्रस्तावना :**

राष्ट्रपिता महात्मा गांधींचे व्यक्तिमत्व हे अष्टपैलू व्यक्तिमत्व होते. मानवाची सेवा हिच ईश्वर सेवा आहे असे त्यांचे स्पष्ट मत असल्याने देशाची व मानवाची सेवा करणे हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय निश्चित करुन त्यांनी त्यांच्या उच्च विचारांतर्गत मानवसेवेसोबतच देशाची सेवा केली. विविध विचारांनी, विविध उपक्रमांनी, विविध चळवळींनी, संघटनांनी, अहिंसेच्या मार्गाने आणि स्वतंत्र जीवन पद्धतीव्दारे महात्मा गांधींनी राजकीय, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, आध्यात्मिक यासारख्या अनेक क्षेत्रात कार्य केले. त्यांचे बरेच उपक्रम हे समाजाच्या आर्थिक बाजूंना स्पर्श करणारे होते. जो देश आर्थिक दृष्ट्या स्वयंनिर्भर बनण्याचा प्रयत्न करतो. तो देश विकासाच्या प्रवाहात आहे असे त्यांचे स्पष्ट मत होते. प्रत्येक आर्थिक प्रश्नांचा विविध पैलूंनी अभ्यास करुन तसेच योग्य नियोजनाव्दारे तो सोडविल्या जाऊ शकतो ही त्यांची विचारसरणी होती. त्यांचा प्रत्येक आर्थिक उपक्रम हा तत्वांशी व अहिंसेशी निगडित होता. त्यांचे विचार ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेशी संबंधित होते आणि भारतातील जास्तीत जास्त लोकसंख्या ही ग्रामीण भागात रहात असल्याने त्यांनी ग्रामीण भागातील उद्योगांवर अधिक भर दिला होता. म्हणूनच महात्मा गांधीच्या विचारसृष्टीचे पुनरावलोकन करुन त्याचा उहापोह ह्या लेखात करण्याचा प्रयत्न केला आहे.

**ग्रामीण विकासाबाबत गांधीजींचा दृष्टीकोन** :

- ग्रामीण भाग स्वयंपूर्ण झाला पाहिजे.
- ग्रामीण खेडे विकसीत झाले पाहिजे. त्यामुळे गांधीजींनी ग्रामीण भागातील लघू व कुटीर उद्योगातील रोजगारावर विशेष भर दिला.
- खादी वस्त्रोद्योग, हस्तकला व्यवसाय, हॅन्डलूम आणि घरगुती ग्रामीण उद्योग हे सामान्यतः कुटूंबातील श्रमिकांवर अवलंबून असतात. तसेच फारशा अवजड यंत्रसामग्रीची आवश्यकता नसल्याने या व्यवसायाला फार मोठ्या भांडवलाची गरज नसते.
- उद्योगांना लागणारा कच्चा माल सामान्यतः कृषी क्षेत्रावर अवलंबून असल्यामुळे ग्रामीण भागात तो सुलभतेने आणि कमी किंमतीत उपलब्ध होऊ शकतो.
- उत्पादन तयार झाल्यानंतर त्याची स्थानिक बाजारातच विक्री करणे शक्य असल्याने ग्रामीण भागात उत्पादन घेणे व विक्री या बाबत समस्या निर्माण होत नाही.
- म्हणूनच गांधीजींनी ग्रामीण भागात लघु व

कुटिर उद्योगाचा विकास करुन ग्रामीण भागातील रोजगार निर्मितीवर भर दिला होता.

- परिणामतः ग्रामीण भागात कृषी क्षेत्रावरील ताण तसेच कृषीवरील निर्भरता कमी करुन कुटिर व लघु उद्योगांचा विकास करणे हे रोजगाराच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.

**ग्रामीण भागाची स्वयंपूर्णता :**

आपला भारत देश हा खेड्यांचा देश आहे आणि याचा आपल्याला एकेकाळी अभिमान होता. एक काळ असा होता की, आपली खेडी ही स्वयंपूर्ण होती, स्वबळावर जगत होती. त्यांच्या सर्व गरजा स्थानिक उत्पादनाव्दारे भागत होत्या. त्यामुळे खेड्यातले लोकजीवन हे सुखी होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र शहरांचा विकास झपाट्याने होऊ लागला. आणि शहरातील वैभव, चैन, शहराचे आकर्षण, कमी श्रमात जास्त पैसा या संबंधीच्या भ्रामक समजुतीमुळे शहरात लोकसंख्या वाढून तिथे बेकारांच्या संख्येत भर पडू लागली. तर दुसरीकडे ग्रामीण भागातील उद्योगधंदे बंद पडू लागले. तसेच अवर्षण, अतिवृष्टी, अवेळी पाऊस, पिकांवरील रोगराई यामुळे शेतकरी संकटात येऊन शेती डबघाईस येऊ लागली. परिणामतः ग्रामीण भागात रोजगारीवर कुऱ्हाडच कोसळली.

ही परिस्थिती बदलविण्यासाठी या संदर्भात महात्मा गांधीजींनी 'खेड्यांकडे परत चला' या संदेशाव्दारे शहरातील सुविद्य तरुणांची पावले पुन्हा खेड्याकडे वळवून नव्याने उद्योगधंदे सुरु केल्यास ग्रामीण भागातच लोकांना रोजगार मिळेल व ते खेडे स्वयंपूर्ण आणि आत्मनिर्भर बनू शकेल असा संदेश वारंवार दिला होता.आणि आज त्याच विचारांची पुन्हा नितांत गरज आहे. ग्रामीण भागातील उद्योगांव्दारे लोकांच्या गरजा पूर्ण झाल्यावर शिल्लक राहिलेल्या उत्पादित वस्तूंची निर्यात करता येईल व यातून ग्रामीण भागातील दारिद्र्य दूर होऊन ग्रामीण भागातही सुख, आनंद, समृद्धी दिसू लागेल.

पण अर्थात यासाठी गांधीजींनी कुटिर व लघु उद्योगातील स्वदेशी वस्तू वापरण्याचीच शिफारस भारतीयांना केली. भारतातील ग्रामीण भागात तयार होणारी वस्तू सन्मानपूर्वक वापरली पाहिजे. म्हणजे आपल्या भारतीयांना त्याचा खऱ्या अर्थाने लाभ होईल. अर्थात खेड्यातील वस्तुंमूळे संपूर्ण समाजाच्या मागण्या पूर्ण होतीलच असे नाही. परंतु काही प्रमाणात मात्र समाजाची मागणी पूर्ण करता येईल. त्यासाठी खेड्यातील अर्थव्यवस्थांची दोन उद्दिष्ट्ये त्यांनी प्रामुख्याने मांडलीत.

१. ग्रामीण भागात जास्तीत जास्त रोजगार पुरविल्या जाईल, त्यामुळे उत्पन्न वाढेल.
२. यातूनच समानता, स्वातंत्र्य व न्याय निर्माण करता येईल.

त्यासाठी गांधीजींनी खेड्याकडे चला, खेड्यांचा विकास करा आणि खेडे स्वयंपूर्ण व आत्मनिर्भर बनवा असा संदेश दिला व म्हणूनच ग्रामीण भागातील रोजगार निर्मितीसाठी त्यांनी कुटिर व लघू उद्योगांच्या विकासावर अधिक भर दिला आहे.

**गांधीजींचा रोजगार विषयक दृष्टीकोन :**

महात्मा गांधीजींचा समाजवाद हा श्रम प्रतिष्ठेवर आधारित होता. बौद्धिक श्रम आणि शारिरीक श्रम यांची तुलना न करता किंवा त्यांचे श्रेष्ठत्व न ठरविता त्या दोन्ही प्रकारच्या श्रमाला समतूल्य मानून अशा श्रम प्रतिष्ठेवर आधारलेल्या समाजाची कल्पना यांनी मांडलेली होती. गांधीजींचे संपूर्ण जीवन आणि कार्यक्रम रचनात्मक होते. म्हणूनच महात्मा गांधींना खादीमध्ये आणि चरख्यामध्ये

भाकरीच्या रुपाने वास करीत असलेला परमेश्वर दिसला. म्हणून परमेश्वराची सेवा म्हणजे गरीब मानवाची सेवा आणि गरीब मानवाची सेवा म्हणजे चरख्याचा व खादीचा निष्ठापूर्वक पुरस्कार होय असा गांधीजींचा दृढ विश्वास होता. आजही खादी ग्रामोद्योगांच्या क्षेत्रात देशात साठ लाख लोकांना काम मिळत आहे. या रोजगारीवर ही साठ लाख कुटूंबे आपला चरितार्थ चालवित आहे. म्हणून या देशातील प्रत्येक व्यक्तीने वर्षातून एक जरी खादीचा ड्रेस किंवा खादीचा  कपडा खरेदी केला तरी एक कोटी लोकांना त्यातून रोजी रोटी मिळू शकते. पण वास्तविकतेत बरेचदा ग्राहक या वस्तू अधिक किंमतीला पडत असल्याने त्याकडे दुर्लक्ष करतो. पण अशावेळेस ग्राहकांनी फक्त मौद्रिक मूल्याचाच विचार न करता त्या व्यवसायात निहित सामाजिक किंमतीचा (Social Cost) विचार करणे अधिक संयुक्तिक आहे. या संदर्भात भारत सरकारलाही आता याची जाणीव होऊ लागल्याने एकीकडे जागतिकीकरणाचे धोरण स्विकारत असतानाच खादी ग्रामोद्योगाला प्रेरणा देण्यासाठी कोट्यावधी रुपये खादी व ग्रामोद्योग कमिशनला देण्याची घोषणा सरकारने केली आहे व त्याची अंमलबजावणी देखील अनेक वर्षांपासून सुरु केलेली आहे.

महात्मा गांधीजींनी भारतातील लोकांचे जेव्हा त्यांच्यामध्ये राहून अवलोकन केले तेव्हा त्यांना असे आढळले की, भारतातील बरेच लोक बेरोजगार आहेत, धष्टपुष्ट व्यक्तीही भीक मागत आहे. दारिद्र्यासोबतच या व्यक्तींचे आर्थिक, मानसिक आणि शारिरीक शोषण हे मूळ कारण आहे,  आणि यांत्रिकीकरण ही त्या समवेत निर्माण होणारी समस्या आहे. त्यामुळे जेवढी गरज स्वातंत्र्य मिळविण्याची होती तेवढीच गरज लाखो लोकांना स्वराज्यासोबत रोजगार उपलब्ध करुन देण्याची होती. म्हणून दोघांनाही एक दुसऱ्यांचे पुरक मानून त्यांनी स्वराज्याला व रचनात्मक कार्याला जोडून कुटिर व लघु उद्योगांची स्थापना ग्रामीण भागात करण्याचे कार्य हाती घेतले व त्याव्दारे ग्रामीण भागातील लोकांसाठी जीवनातील आचारप्रणाली स्वीकरुन त्यातून प्रत्येकाला रोजगार प्राप्त होईल. परिणामतः रोजगारीच्या आशेने शहराकडे धाव घेणाऱ्यांची संख्या कमी होऊन शहरातील बेरोजगारीत भर पडणार नाही. व शहरावरील लोकसंख्येचा ताण कमी होईल. एकंदरीत गांधीजींचा दृष्टीकोन ग्रामीण भागातील कुटीर, लघु उद्योगातील रोजगारावर भर देणारा होता. या संदर्भात साधर्म्य साधणारा विचार 'आशियन ड्रामा' या पुस्तकाचे लेखक स्विडीश अर्थशास्त्रज्ञ गुन्नार मिर्डाल यांनी देखील मांडलेला आहे. मिर्डाल यांच्या मते, ''भारतासाठी पाश्चिमात्य अर्थव्यवस्था उपयोगी नसल्याने त्यांचे अनुकरण न करता ती 'रोजगारावर आधारित'(Job Oriented) असावी लागेल.'' आज ही शक्ती गांधी विचारांवर आधारित अर्थरचनेतच आहे. आणि म्हणून आज पुन्हा रोजगार निर्मितीसाठी गांधीजींच्या विचारांचे पुनरावलोकन करण्याची गरज आहे.

**लघू व कुटिर उद्योगातील उत्पादनाबाबत गांधीजींचे विचार :**

गांधीजींच्या मते, उत्पादन हे सरळ, साधे असावे. त्यात कोणावरही अन्याय व शोषण व्हायला नको. उत्पादन हे अहिंसात्मक व पोषक वातावरणात व्हावयास हवे. उत्पादन प्रणालीत स्थानिक स्त्रोताव्दारे उत्पादन घेतले जावे. तसेच उत्पादन प्रक्रिया प्रदुषणरहित असणे आवश्यक आहे. या उत्पादन प्रक्रियेतून सर्व लोकांच्या गरजा पूर्ण होऊन स्वयंनिर्भरता पूर्ण होणे ही प्राथमिक गरज आहे

आणि ही प्रक्रिया मात्र सरळ असली पाहिजे. यावरुन गांधीजींचे या संदर्भातील विचार मिश्र अर्थव्यवस्थेवर आधारित असल्याचे आढळते. व ते विशेषतः श्रमप्रधान अर्थव्यवस्थेवर अवलंबून होते. यालाच आधुनिक पद्धतीत Pragmatic Economics असे म्हणतात. औद्योगिकरण हे आवश्यकतेनुसार करणे गरजेचे असले तरी ज्या प्रणालीव्दारे कार्य करावयाचे असेल ते श्रमिकांशी व रोजगाराशी संबंधित असले पाहिजे यावर त्यांचा अधिक भर होता.

कुटिर उद्योगांमध्ये दैनंदिन वापराच्या वस्तू तयार व्हाव्यात म्हणजे प्रत्येक खेडे हे आत्मनिर्भर होऊ शकेल. ग्रामीण दारिद्र्याचा अभ्यास करतांना ग्रामीण भागातील विषमता दूर करुन स्वदेशी उद्योगांचे संरक्षण करण्यासाठी त्यांनी ग्रामोद्योगांचा पुनरुद्धार केला. गांधीजींचे हे स्वप्न पूर्ण झाल्यास भारतातील जवळपास सात लाख खेड्यातील दारिद्र्य नष्ट होईल. कोणीही असुरक्षित रहाणार नाही, कोणीही बेरोजगार रहाणार नाही. ब्रिटिश शासनाच्या पूर्वी भारताची अर्थव्यवस्था ही कुटिर उद्योगावरच आधारित होती. प्रत्येक परिवार काही ना काही प्रमाणात उत्पादन करीत होता. त्यातील काही उत्पादन स्वतःच्या उपभोगासाठी ठेऊन बाकी विकले जात असे. परंतु ब्रिटिश शासन काळात त्यांनी कूट निती द्वारे कुटिर उद्योग हेतूपुरत्सर नष्ट करण्यात आले व तेथून हस्तोद्योग व लघु कुटिर उद्योगाचा ऱ्हास व्हायला सुरुवात झाली. नंतर मात्र स्वातंत्र्योत्तर काळात सरकारने या व्यवसायांच्या वाढीसाठी व त्यातून रोजगार निर्मिती होण्यासाठी पंचवार्षिक योजनेत भर द्यायला सुरुवात केली. पण त्याचा फारसा अनुकूल परिणाम आढळून आलेला दिसत नाही. आणि म्हणून आज पुन्हा यासारख्या लघु व कुटिर उद्योगांची आवश्यकता असल्याचे स्पष्ट होते.

**लघु व कुटिर उद्योग आणि विकेन्द्रीकरण :**

विशाल उत्पादन हे सामान्यतः नफा कमविण्याच्या उद्देशाने होत असल्याने तिथे संपत्तीचे व संसाधनाचे केन्द्रिकरण होते. तसेच मोठ्या उद्योगात अत्याधुनिक तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणावर वापरले जात असल्याने तिथे कुशल श्रमिकांचा रोजगार वाढत असला तरी सर्वसामान्य बेकारीत मात्र भर पडते आणि म्हणून विशाल उद्योग, रोजगार निर्मितीस बाधा आणणारे असतात. गांधीजींचा विकेंन्द्रीकरणावर विशेष भर होता. व हे विकेन्द्रिकरण लघू उद्योगामध्ये दिसून येते. १९४६ च्या भाषणात गांधीजींनी असे म्हटले होते की, ''मी तंत्रज्ञान आणि मशीनरीच्या विरोधात नाही परंतु यंत्रामुळे श्रमिक आळशी बनतात, बेरोजगार होतात.'' म्हणून ते पूर्ण यांत्रिकीकरणाला विरोध करीत असत. अन्यथा तंत्रज्ञानाचे स्वागत आहे. यंत्रामुळे उत्पादकता वाढत असली तरी त्यांनी श्रमिकांना कामावरुन काढून टाकावयास नको. मशीनरीमुळे गुलामगिरी नष्ट होईल हे सत्य असले तरी गांधीजींनी नेहमीच श्रमप्रधान तंत्राला प्राधान्य दिले आहे.

गांधीजींनी जीवनाचा सर्वंकष विचार केलेला असल्याने अर्थशास्त्राचा विचारही त्यांनी विभक्त रीतीने केलेला नाही. या अघोरी यांत्रिकीकरणाच्या चढाओढीत ईश्वरनिर्मित जीवंत यंत्र म्हणजे माणूस याचा विसर पडू नये ही त्यांची मूलभूत भूमिका होती. आणि त्यासाठी गांधीजींनी पाण्यातील वलयासारखी अर्थरचनेची संकल्पना मांडली होती. ती अंगिकारावी लागेल. जसे लहान वलयातून मोठे, त्यातून अधिक मोठे मोठे वलय पाण्यावर निर्माण होत असतात. तसेच खेड्यांची गुलामगिरी संपवून उद्योग धंद्यातील अंतर्विरोध संपविण्याची इच्छा असेल तर गृहोपयोगी कुटिर

उद्योग, ग्रामोद्योग, लघुउद्योग व नंतर स्वदेशी मोठे उद्योग असाच प्रवास असावा लागेल. स्वदेशी ही केवळ भौगोलिक संकल्पना नसून ती एक भावना आहे आणि शोषणरहित समाजरचना हे त्यांचे अधिष्ठान आहे. यातही पारस्पारिकता विश्वस्तवृत्ती यांचा विकास करावा लागेल. ग्रामस्वराज्याकडून विश्वकुटुंबाकडे आणि त्यानंतर जयजगत्‌च्या दिशेने हा प्रवास असेल.

**जागतिकीकरण व लघु व कुटिर उद्योगातील रोजगाराचे स्वरुप :**

जागतिकीकरण, खुली अर्थव्यवस्था यांचा विचार भारताच्या एकूणच विकासाच्या संकल्पनेशी निगडीत आहे. फक्त हा विकास 'हॉर्स पॉवर' आधारित आहे की 'मॅन पॉवर' वर आधारित आहे एवढाच प्रश्न आहे. हाच प्रश्न फार महत्वाचा आहे. कारण आपल्या देशात एवढी मनुष्यशक्ती असतांना त्याचा वापर न करता बेरोजगारी वाढविणारी, कमीत कमी मनुष्यशक्ती लागणारी व यंत्रशक्तीवर आधारित रचना आपल्याला परवडण्यासारखी नाही. यात यंत्रविरोध नसून, यंत्र विवेक आहे. गांधीजींनी वापरलेला चरखा हा यंत्रच आहे. गांधीजींच्या मते, माणसाच्या हाताची शक्ती वाढविण्यासाठी हातोडा असावा परंतु हात कापून त्याला हातोडा चिकटवू नका. असे ते म्हणत. यंत्रामुळे माणसांची उत्पादन शक्ती व श्रमशक्ती कमी होता काम नये. माणसाच्या कलेचा आणि गुणांचाही विकास उत्पादक परिश्रमातूनच झाला पाहिजे. Mass Production ऐवजी Production by Masses हे वैभवाचे लक्षण आहे. जीवनाची समृद्धी जीवनाच्या व्यापकतेमध्ये आहे. विज्ञानाची प्रगती मानवीय संबंधाच्या प्रस्थापनेत झाली पाहिजे. म्हणून माणसाला उपकरणाचे स्थान देऊ नये. साध्यानुरुप साधने व उपकरणे निर्माण करण्यात भौतिकशास्त्राचीही प्रगती आहे असे गांधीजी नेहेमीच मानत असत. फक्त सर्व योजनांचा व विकासाचा मध्यबिंदू हा मानवच असावा यावर त्यांचा भर होता.

**बारावी पंचवार्षिक योजना एमएसएमई च्या व्दारे रोजगार निर्मितीची सद्यस्थिती –**

इ.स. १९४९ पर्यत महात्मा गांधीजींनी लघु व कुटिर उद्योगातील रोजगारासंबंधी मांडलेल्या विचारांची अनुकुलता लक्षात घेऊन नियोजन मंडळाने पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून लघु व कुटिर उद्योगासंबंधी नियोजन करण्यात आले आहे. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत नियोजन मंडळाने गांधीजींच्या लघू व कुटिर उद्योगांच्या विचारांच्या आधारावर काही निर्णय घेऊन त्यांची ध्येय पूर्ण करण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसते.

**बारावी पंचवार्षिक योजना :– (२०१२–२०१७)**

१२ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये MSMEs (Micro, Small Medium Enterprises) च्या उपक्रमाच्या क्षेत्रामध्ये १२ ते १३ % प्रत्येक वर्षात वृद्धी दर ठरविला गेला. त्याप्रमाणात प्रयत्न करुन उत्पादनाचे स्त्रोत वापरण्याचा प्रयत्न केल्या गेला. १२ व्या पंचवार्षिक योजनेतील एमएसएमई ची लघू व कुटिर उद्योगातील रोजगाराबाबतची तसेच उपक्रमाची व त्या उपक्रमामधील बाजार मूल्या–विषयीची उपलब्ध आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. १**

**लघु व कुटिर उद्योगातील उपक्रम, रोजगार आणि बाजारमूल्य**

| वर्ष | कार्यरत उपक्रम लाखामध्ये | रोजगार (लाखामध्ये) | अचल संपत्तीचे बाजारमूल्य (करोडमध्ये) रू. |
|---|---|---|---|
| २००१-०२ | १०५ . २१ | २४९ . ३३ | १५४ . ३४९० |
| २००२-०३ | १०९ . ४९ | २६० . २१ | १६२ . ३१७० |
| २००३-०४ | ११३ . ९५ | १७१ . ४२ | १७० . २१९० |
| २००४-०५ | ११८ . ५९ | २८२ . ५७ | १७८ . ६९९० |
| २००५-०६ | १२३ . ४२ | १९४ . ९१ | १८८ . ११३० |
| २००६-०७ | ३६१ . ७६ | ८०५ . २३ | ८६८ . ५४३८ |
| २००७-०८ | ३७७ . ३६ | ८४२ . ०० | ९२० . ४५९८ |
| २००८-०९ | ३९३ . ७० | ८८० . ८४ | ९७७ . ११४७ |
| २००९-१० | ४१० . ८० | ९२१ . ७९ | १०३८ . ५४६१ |
| २०१०-११ | ४२८ . ७३ | ९६५ . १५ | ११०५ . ९३४१ |
| २०११-१२ | ४४७ . ६६ | १०११ . ८० | ११८३ . ३३२० |
| २०१२-१३ | ४६७. ५६ | १०६१ . ५२ | १२६९ . ३३८० |

(Source–Annual Report Ministry of MSME)

२००५-०६ पर्यंतच्या आकडेवारीत फक्त लघु उद्योगांचा अन्तर्भाव होता. पण २००६-०७ पासून पुढील वर्षात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांची एकत्रित आकडेवारी आहे.

एमएसएमई च्या उपलब्ध असलेल्या वरील आकडेवारीवरुन असे दिसून येते की, २००१-०२ ते २०१२-१३ पर्यत एमएसएमई मध्ये रोजगार आणि बाजारमूल्य वाढत असल्याचे दिसून येते. (अपवाद फक्त २००३-०४, २००५-०६ वर्षांचा आहे.) २००१-०२ मध्ये १०५.२१ लाख उपक्रम होते. तर २०१२-१३ मध्ये याची संख्या ४६७.५० लाख उपक्रम झाल्याचे आढळते. रोजगार निर्मिती एमएसएमई मध्ये २००१-०२ ते २०१२-१३ मध्ये वाढलेली दिसून येते. २००१-०२ या वर्षी २४९.३३ लाख श्रमिक कार्यरत होते. तर २०१२-१३ मध्ये १०६१.५२ एवढी झालेले दिसते. तर याच काळात अचल संपत्तीचे बाजार मूल्य १५४.३४९० करोड रुपयांपासून तर १२६९.३३८० करोड रुपयांपर्यंत वाढले आहे.

रोजगार, उपक्रम आणि बाजारमूल्य या वर्षामध्ये वाढलेले आहेत. पण फक्त २००३-०४ मध्ये उपक्रमांची संख्या वाढलेली आहे. पण रोजगाराची संख्या कमी झालेली आहे. तसेच २००४-०५ च्या तुलनेत २००५-०६ मध्ये कार्यरत उपक्रमाची संख्या वाढलेली आहे पण रोजगाराची

संख्या मात्र घटलेली आहे. याचा अर्थ असा दिसून येतो की, उपक्रमामध्ये जरी वाढ होत असली तरी त्याप्रमाणात रोजगारात वाढ होईलच असे नाही. आणि गांधीजींच्या विचारांच्या मते, जर देशात उद्योग वाढत असतील आणि त्याबरोबरच रोजगाराची संख्या वाढत असेल तर तो देशाच्या विकासास व लोकांच्या विकासास पुरक ठरेल आणि म्हणून यांत्रिकीकरण करतांना रोजगारीवर विपरित परिणाम होणार नाही याची दक्षता घेणे हे आजही संयुक्तिक ठरते. व त्यासाठी महात्मा गांधींच्या रोजगार विषयक विचारांची साधर्म्यता आजच्या काळातही महत्वपूर्ण ठरते.

**समारोप :**

महात्मा गांधीजींच्या संपूर्ण विचारांचा आधारस्तंभ हा सजीव मानव असून त्या भवती केंद्रित असणाऱ्या विविध पैलूंचा अभ्यास व त्यांचे नियोजन आणि अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. विशेषत्वाने लघु व कुटिर उद्योग व्दारे रोजगार निर्माण करता येईल यावर त्यांनी अधिक भर दिला. त्यासाठी भारत सरकारने एमएसएमई लघु व कुटिर उद्योगाच्या रोजगाराबाबतही व त्याच्या उपक्रमाची, प्रशिक्षणाची तसेच त्याच्या विकासाची जबाबदारी स्वीकारली असून जागतिकिकरणाच्या काळातही कालबाह्य न झालेल्या गांधीजींच्या समग्र विचारांच्या आधारे एकविसाव्या शतकातील बेरोजगारीच्या समस्या लघू व कुटिर उद्योगाच्या सहाय्याने सोडविता येईल यात कुठेही शंका नाही. गांधीजींच्या विचारातून आपल्याला अनेक चिरंतन स्वरुपाचे मुद्दे आढळतात.

**संदर्भ सूची :**


१) अजमेरा सुर्यकांता व पोतदार अनुराधा (२०११) : गांधी विचार आणि युवकांची सक्रियता, अथर्व पब्लिकेशन, धुळे.

२) डॉ. जीपीनेमा प्रतापसिंह : गांधीजी का दर्शन, रिसर्च पब्लिकेशन, जयपूर.

३) धर्माधिकारी चंद्रशेखर (२००६) : शोध गांधींचा, अक्षर प्रकाशन, मुंबई, वर्ष जून.

४) गुप्ता विश्व प्रकाश (२००१) : महात्मा गांधी व्यक्ती आणि विचार, राधा पब्लिलकेशन, न्यु दिल्ली.

५) सत्याग्रही विचारधारा - नोव्हेंबर-डिसेंबर २०१८, जोड अंक , प्रकाशक डॉ. कुमार स्वामी, पुणे.

६) गुप्ता शांती स्वरुप (१९९४) : Economic Philosophy of Mahatma Gandhi. Concept Publication New Delhi, Pg. No. १८५, ७८-७९, १३६-१३७

७) Small Scale Industries and Entrepreneurship, Vasant Desai, Himalaya Publication, 2017.

८) Internet Website.


◆◆◆

# महाराष्ट्रातील जलयुक्त शिवार अभियान -एक दृष्टिक्षेप

**करमसिंग राजपूत**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
लोकमान्य टिळक महाविद्यालय,
वणी, जि. यवतमाळ

**प्रस्तावना :**

सामान्यत: १९९० च्या दशकापासून महाराष्ट्रात अधुनमधून पाणी टंचाईची समस्या जाणवायला लागली. इ. स. २००० पासून त्यात सातत्याने वाढ होऊन उभ्या महाराष्ट्राला पाणी टंचाईच्या समस्येने ग्रासले. यावर मात करण्यासाठी सरकारने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तात्पुरता सोडविण्यासाठी पाणी टंचाई असलेल्या गावांना टँकरने पाणीपुरवठा करण्यास सुरूवात केली. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तात्पुरता मिटविता आला. परंतु शेतीला लागणाऱ्या पाण्याचा प्रश्न कायम होता. महाराष्ट्रात सामान्यपणे दर-दोन वर्षानी नैसर्गिक पावसाअभावी कोरडा दुष्काळ पडू लागला. त्यामुळे महाराष्ट्रातील शेती व पशूधन धोक्यात आले. कोरडा दुष्काळ पडू लागल्याने शेतमालावर तर विपरीत परिणाम झालाच शिवाय पावसाअभावी चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाल्याने शेतकऱ्यांना जनावरे पाळणे कठिण झाले. या दुष्काळाची सर्वात जास्त झळ मराठवाड्यातील लातूर, उस्मानाबाद, बीड, औरंगाबाद या जिल्ह्यांना बसली. विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र व खांदेशातही कोरड्या दुष्काळाची झळ मोठ्या प्रमाणात बसली. एकूणच संबंध महाराष्ट्रात कोरड्या दुष्काळाने शेतीक्षेत्र धोक्यात आले. शहरांमध्ये पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली व कुठे महिन्यातून केवळ एकवेळ किंवा दोन वेळाच पाणीपुरवठा होऊ लागला. लातूर शहराला रेल्वेने पाणीपुरवठा केल्याचे आपण अनुभवले आहे. दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्यातील काँग्रेस - राष्ट्रवादी आघाडी शासनाने मृदसंधारण व जलसंधारणाची कामे हाती घेतली. परंतु कामाचा वेग धिमा असल्याने त्यांची फारशी फलनिष्पती दिसली नाही.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात तब्बल १५ वर्षानंतर सत्तेवर आलेल्या भाजपा-सेनेच्या युती शासनाने या दुष्काळी परिस्थितीशी लढण्याचा निर्धार केला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांनी पुढाकार घेऊन ५ डिसेंबर २०१४ रोजी एक शासन निर्णय काढला व त्यानुसार महाराष्ट्रात जलयुक्त शिवार योजना सुरू केली. 'सर्वांसाठी पाणी टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९' ही या योजनेची मध्यवर्ती संकल्पना आहे. मा. मुख्यमंत्र्यांची ही महत्त्वाकांक्षी योजना मानली जाते.

सन २०१४-१५ मध्ये भूजल पाताळीत २ मीटरपेक्षा जास्त घट झालेल्या १८८ तालुक्यातील २२३४ गावे तसेच शासनाने पाणी टंचाई परिस्थिती जाहीर केलेल्या २२ जिल्ह्यातील १९०५९ गावांमध्ये ही जलयुक्त शिवार योजना प्राधान्याने राबविण्यात येत आहे. तसेच भविष्यात राज्याच्या

उर्वरित भागात पाणी टंचाई निर्माण होऊ नये यासाठी उपाययोजना करण्यावरही भर देण्यात आला आहे. अपुऱ्या आणि अनियमित पावसामुळे राज्यात पाणी टंचाईची परिस्थिती निर्माण झाल्याने त्याचा कृषीक्षेत्रावर विपरित परिणाम झाला. राज्यात गेल्या १५-२० वर्षात नैसर्गिक पावसाच्या पुरेशा उपलब्धते अभावी महाराष्ट्रातील कोरडवाहू क्षेत्रातील पिकांच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात चढ-उतार दिसून येतो. ही बाब राज्याच्या विकासाला मारक ठरणारी आहे. निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असणारी ही परिस्थिती बदलण्यासाठी राज्यातील सर्व विभागांच्या समन्वयाने एकात्मिक पद्धतीने 'जलयुक्त शिवार अभियान' राबविण्यात येत आहे.

**जलयुक्त शिवार अभियानाची आवश्यकता :**

महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक विकासात कृषी क्षेत्राचा सिंहाचा वाटा आहे. परंतु कृषी क्षेत्राचा विकास हा सिंचनाशी निगडीत आहे. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यापासून गेल्या ५८ वर्षाचा सिंचन विकासाचा हिशेब केला असता राज्यात सिंचनाचा विकास समतोल प्रमाणात झालेला दिसून येत नाही. आजही विदर्भ व मराठवाड्यात उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत सिंचन अनुशेष मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसून येते. देश स्वतंत्र झाल्यानंतर राज्याराज्यांत सिंचनक्षेत्रात जी गुंतवणूक झाली त्यात महाराष्ट्र अग्रेसर आहे. परंतु अजुनही महाराष्ट्रात सिंचन क्षेत्राचे प्रमाण केवळ १७.५ प्रतिशत असून देशपातळीवरील सिंचनक्षेत्राचे प्रमाण मात्र ४३ प्रतिशत एवढे आहे. राज्याच्या निर्मितीनंतर १९६५, १९६६, १९७२, १९७९, २००२, २००९, २०१४, २०१५, २०१६ आणि २०१८ असे आलटून पालटून सातत्याने महाराष्ट्रात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून येते. या पार्श्वभूमीवर जलयुक्त शिवार योजना ही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दिलासा देणारी योजना मानली जात आहे. सन २०१४-१५ मध्ये राज्यात सरासरी २० प्रतिशत पेक्षा जास्त पर्जन्यमान असलेले १८४ तालुके होते. तसेच भूजलपातळीत ३ मीटरपेक्षा जास्त घट झालेले ७२ तालुके तर २ ते ३ मीटर एवढी भूजलपातळीत घट झालेले ११६ तालुके व १ ते २ मीटर पेक्षा जास्त भूजलपातळीत घट झालेले १९० तालुके होते. थोडक्यात राज्यात सरासरी २ मीटर पेक्षा जास्त भूजलपातळीत घट झालेला राज्याचा बहुतांश भाग सन २०१४-१५ आढळून आला. त्यामुळे शासनाने २५ नोव्हेंबर २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात २२ जिल्ह्यांतील १९०५९ गावांमध्ये पाणी टंचाई सदृष्य परिस्थिती जाहीर केली. याच काळात राज्यातील निरनिराळ्याा प्रकल्पातील पाणीसाठा अत्यंत कमी झाला होता. मराठवाड्यातील प्रकल्पांमध्ये तर केवळ १० प्रतिशत एवढा कमी पाणी साठा होता. त्यामुळे राज्यात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या, कृषीक्षेत्राचा नकारात्मक विकासदर, जनावरांच्या चाऱ्यांचा प्रश्न, वाढते स्थलांतर, शेतीवर आधारित उद्योगधंद्यांचा प्रश्न, वाढती बेकारी असे अनेक प्रश्न राज्यात निर्माण झाले. या सर्व प्रश्नांवर कायमस्वरूपी उपाय म्हणून 'जलसिंचन' हा उपाय पुढे आला. त्यामुळे शासनाने एकात्मिक पद्धतीने नियोजनबद्धरित्या कृती आराखडा तयार करून ५ डिसेंबर २०१४ रोजी शासन निर्णयाद्वारे 'जलयुक्त शिवार योजना' सुरू केली. या योजनेची 'सर्वासाठी पाणी टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९' अशी मध्यवर्ती संकल्पना आहे. राज्यात जानेवारी २०१५ पासून जलयुक्त शिवार योजनेची सुरूवात झाली.

**जलयुक्त शिवार अभियानाचे उद्देश :** पुढील

महत्त्वाच्या उद्देशांसाठी ही योजना सुरू करण्यात आली.

१) पावसाचे जास्तीत जास्त पाणी गावाच्या शिवारातच अडविणे.
२) भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ करणे.
३) राज्याच्या सिंचनक्षेत्रात वाढ करणे तसेच शेतीसाठी संरक्षित पाणी व पाण्याच्या वापराच्या कार्यक्षमतेत वाढ करणे.
४) राज्यातील सर्वांना पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध करण्याची शाश्वती व ग्रामीण भागातील बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजनांचे पुनरूज्जीवीकरण करून पाणी पुरवठ्यात वाढ करणे.
५) भूजल अधिनियमाची अंमलबजावणी करणे.
६) विकेंद्रित पाणीसाठे निर्माण करणे.
७) पाणी साठवण क्षमता निर्माण करणारी नवीन कामे हाती घेणे.
८) अस्तित्वात असलेल्या परंतु निकामी झालेल्या जलस्त्रोतांची (बंधारे/ गाव तलाव/ पाझर तलाव/ सिमेंट बंधारे इत्यादी) पाणी साठवण क्षमता पुनर्स्थापित करणे.
९) अस्तित्त्वात असलेल्या जलस्त्रोतांमधील गाळ लोकसहभागातून काढून त्या जलस्त्रोतांमधील पाणीसाठा वाढविणे.
१०) वृक्ष लागवडीस प्रोत्साहन देऊन मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करणे.
११) पाण्याच्या ताळेबंदाबाबत जनतेत जाणीव जागृती निर्माण करणे.
१२) शेतीसाठी पाण्याचा कार्यक्षम वापर करण्याबाबत शेतकऱ्यांमध्ये जागृती करणे.
१३) पाणी अडविणे किंवा जिरविणे याबाबत लोकांना प्रोत्साहित करून या संदर्भातील लोक सहभाग वाढविणे.

**जलयुक्त शिवार योजनेची व्याप्ती :**

ही योजना एका अभियानाच्या स्वरूपात शासकीय विभाग, स्वयंसेवी संस्था, लोकसहभाग व खाजगी उद्योजक यांच्याकडील उपलब्ध निधीतून राबविली जात आहे. ही योजना महाराष्ट्रातील पाणी टंचाई सदृष्य तालुक्यांमध्ये तसेच उर्वरित तालुक्यांमध्ये भविष्यात पाणी टंचाई भासू नये याकरिता राबविण्यात येत आहे. यासाठी विभागीय समन्वय समिती, जिल्हास्तरीय समिती व तालुका स्तरीय समिती अशा विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

**जलयुक्त शिवार योजनेंतर्गत करावयाची कामे :**

या योजनेंतर्गत खालील कामे करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

१) पाणलोट विकासाची कामे
२) साखळी सिमेंट क्राँक्रीट नाला बंधाऱ्याची कामे तसेच नाला खोलीकरण व रूंदीकरण करणे.
३) जुन्या जलसंरचनेचे पुनर्जिवन करणे.
४) अस्तित्त्वातील लघुपाटबंधारे संरचनांची दुरूस्ती करणे.
५) पाझर तलाव, लघुसिंचन तलाव यांची दुरूस्ती व नुतनीकरण करून त्यांची क्षमता पुनर्स्थापित करणे.
६) पाझर तलाव, गाव तलाव, साठवण तलाव, शिवकालीन तलाव, ब्रिटीश कालीन तलाव, निजाम कालीन तलाव व मातीचे नाला बंधारे यांतील गाळ काढणे.
७) मध्यम व मोठ्या प्रकल्पांची सिंचनक्षमता विचारात घेऊन त्यानुसार अशा प्रकल्पांचा प्रत्यक्ष वापर होण्यासाठी उपाय योजना करणे.
८) छोटे ओढे किंवा नाले जोड प्रकल्प राबविणे.
९) विहीरी किवा बोअर वेल्सच्या पुनर्भरणाचे

काम करणे.

१०) उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करणे.

११) पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकट करणे.

१२) पाणी वापर संस्था बळकट करणे.

१३) कालवे दुरूस्त करणे.

**जलयुक्त शिवार योजनेंतर्गत प्रत्यक्ष करण्यात आलेली कामांची अंमलबजावणी :**

शासनाच्या ५ डिसेंबर २०१४ च्या शासननिर्णयात जलयुक्त शिवार योजनेंतर्गत वरील प्रकारची कामे एकात्मिक पद्धतीने करणे अपेक्षित होते. उदा. पाणलाट विकासची कामे 'माथा ते पायथा' या पद्धतीने केल्यावर नाला खोलीकरण झाले तर नवीन बंधारे लगेच गाळाने भरून जाणार नाहीत. त्याचप्रमाणे अधिसूचित नैसर्गिक प्रवाहास प्रमाणाबाहेर अडथळा होणार नाही याची काळजी घेतल्यास खालच्या बाजूची धरणे कोरडी पडणार नाहीत. विशेष म्हणजे पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे बळकटीकरण झाल्यास टँकर व बाटलीबंद पाण्यावरील अवलंबित्व कमी होईल. परंतु दुर्दैवाने या अभियानांतर्गत निश्चित करून दिलेल्या १३ कामांपैकी केवळ साखळी बंधाऱ्यांसह नाला खोलीकरण व रूंदीकरण या एकाच कामावर अवाजवी भर देण्यात आल्याचे दिसून येते. त्यामुळे जलयुक्त शिवार म्हणजे साखळी बंधाऱ्यासह नाला खोलीकरण व रूंदीकरण असे जणु समीकरणच होऊन बसले आणि नाला खोलीकरण व रूंदीकरण म्हणजेच नदी पुनरूज्जीवन असा समज दृढ झाला. वास्तविक पाहता २१ मे २०१३ च्या कृषी आयुक्तांच्या परिपत्रकानुसार ज्याठिकाणी नालापात्रात वाळू साठा आहे अशा नाल्यांच्या खोलीकरणास मनाई करण्यात आली आहे. तसेच याच परिपत्रकानुसार ज्या ठिकाणी नाला पात्रांची नैसर्गिक खोली ३ मीटर पेक्षा जास्त आहे अशा ठिकाणी नाला खोलीकरणासंदर्भात भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे (जीएसडीए) मार्गदर्शन घेण्यास सुचविले आहे. त्याचप्रमाणे नाला खोलीकरणाची कमाल मर्यादा ३ मीटर असावी व अतिशोषित व शोषित पाणलोट क्षेत्रामध्ये खोलीकरणाची कामे अग्रक्रमाने करावीत तसेच कोणत्याही परिस्थितीत नाला तळाच्या मूळ रूंदीपेक्षा जास्त रूंद करू नये, जेणेकरून नाल्याच्या काठास बाधा पोहोचणार नाही. या परिपत्रकातील निकषांनुसारच नालाकाठास हरळी अथवा स्थानिक गवताचे जैविक अस्तरीकरण करावे व नालाकाठावर वृक्षलागवड करावी असेही सुचविण्यात आले होते.

नदीनाल्यांनी वळणे घेत वाहणे ही नैसर्गिक अवस्था आहे. त्यामुळे नदीनाले संथ गतीने वाहतात आणि पाणी मुरण्याला जास्त काळ संधी मिळते. त्यामुळे नदीनाल्यांचे सरळीकरण करू नये. पर्यावरणीय संतुलनासाठी नदी नाले वाहते राहणे आवश्यक असते. नदीनाल्यांचे प्रमाणापेक्षा जास्त खोलीकरण झाल्यास दोन धोके संभवतात असे तज्ञांचे मत आहे. ते दोन धोके या प्रमाणे आहेत. जलधर उघडा पडून त्यातील पाणी नदीनाल्यांत येते व त्याचे बाष्पीभवन होते. तसेच पावसाचे गढूळपाणी उघड्या पडलेल्या जलधारात गेल्यास तो हळूहळू काम करेनासा होतो व त्याने पर्यावरणीय धोका निर्माण होतो. व पाणलोटातील वरच्या भागातील विहिरींमधील पाणी नदी नाल्यांत येईल व त्या विहिरी कोरड्या पडतील.

वरील मार्गदर्शक तत्त्वांचा व संभाव्य धोक्यांचा विचार न करता संपूर्ण राज्यात जलयुक्त शिवार योजनेची कामे सुरू आहेत. जेसीबी व पोकलेन वाल्यांनी या अत्यंत लोकोपयुक्त योजनेचे

चक्क अपहरण केल्याचे दिसून येते. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली सर्वेक्षण, संकल्पन, आराखडे, अंदाजपत्रके, आवश्यक त्या परवानग्या घेणे तसेच सक्षम अधिकाऱ्यांकडून अभ्यासाअंती मान्यता घेणे या बाबी अभावानेच होतांना दिसत आहेत. जलयुक्त शिवार योजनेच्या बाबतीत कोणी कोठेही काहीही करावे, विचारणारा कोणी नाही अशी परिस्थिती काही ठिकाणी दिसून येत आहे. ज्या मोकाट पद्धतीने या योजनेंतर्गत कामे होत आहेत त्यातून फायदा होण्याऐवजी उलट पर्यावरणीय नुकसान होण्याचीच शक्यता जास्त आहे. २०१९ पर्यंत ही योजना चालणार आहे. त्यामुळे शासनाने या योजनेचा त्वरीत कठोर आढावा घ्यावा आणि सूयोग्य बदल करावेत. मूळ योजना अत्यंत चांगली असून या योजनेनुसार निर्धारीत केलेली १३ कामे एकात्मिक पद्धतीने केल्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात त्याप्रमाणे ही योजना 'गेम चेंजर' बनू शकते. परंतु या योजनेत शासनाचा परिणामकारक हस्तक्षेप त्वरीत न झाल्यास जेसीबी व पोकलेन लॉबी या लोकोपयुक्त योजनेचाच 'गेम' करण्याची शक्यता नाकारता येत नाही अशी भिती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

**जलयुक्त शिवार अभियानाची फलनिष्पत्ती :** सन २०१५ पासून ही योजना संपूर्ण महाराष्ट्रात सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून गेल्या ३-३.५ वर्षात जी कामे महाराष्ट्रात झाली त्यांचा आढावा घेतला असता असे आढळून येते की या योजनेच्या माध्यमातून झालेल्या कामांमुळे राज्यातील १३००० गावे दुष्काळ मुक्त झाली असून पाणी पुरवठा करण्यासाठी लागणाऱ्या टँकरची संख्या ६१४० वरून यावर्षी मे २०१८ मध्ये अवघ्या १५२ टँकरवर आली आहे. सन २०१५ च्या उन्हाळ्यात राज्यात एकूण ६१४० टँकरद्वारे टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा सुरू होता. सन २०१६ मध्ये ही संख्या कमी होऊन १३७९ झाली तर सन २०१७ मध्ये ती ३६६ वर आली. सन २०१८ च्या मे महिन्यात तर ही संख्या अवघ्या १५२ टँकरवर आल्याची शासनाची आकडेवारी सांगते (पहा लोकसत्ता दि. २५ जून २०१८). सन २०१८ मध्ये परत महाराष्ट्रात पावसाने दगा दिल्यामुळे महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील एकूण ३५५ तालुक्यांपैकी तब्बल २६ जिल्ह्यांतील १५१ तालुक्यांमध्ये ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी दुष्काळ जाहीर केला. त्यापैकी ११२ तालुक्यांमध्ये गंभीर दुष्काळ तर ३९ तालुक्यांमध्ये मध्यम दुकाळ असल्याचे शासनाने जाहीर केले. दुकाळग्रस्त तालुक्यांची यादी जाहीर केल्या बरोबर ज्या तालुक्यात खरोखरच दुष्काळ निर्माण झाला परंतु शासनाकडून त्या ठिकाणी दुष्काळ असल्याचे जाहीर करण्यात आले नाही अशा परत २१ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्याची त्या-त्या तालुक्यांमधून मागणी होऊ लागली. त्यामुळे सन २०१८ मध्ये महाराष्ट्रात तब्बल १७२ तालुक्यांमध्ये दुष्काळ असल्याचे मान्य करण्यात आले. या पार्श्वभूमीवर महाराट्रात जलयुक्त शिवार अभियान राबविणे किती आवश्यक आहे हे स्पट होते. या योजनेंतर्गत ज्या-ज्या ठिकाणी कामे झाली त्या भागात काही प्रमाणात का असेना पाण्याची समस्या कमी झाल्याचे दिसून आले. ही योजना निश्चित केलेल्या शासकीय नियमावलीनुसार एकात्मिक पद्धतीने राबविल्यास भविष्यात महाराष्ट्रात दुष्काळाचे संकट कमी होण्यास निश्चितपणे मदत होईल असे वाटते. थोडक्यात भूजल पातळी, खरीप हंगामातील उत्पादकता व रब्बीतील पीकक्षेत्र या निकषांआधारे ही योजना फायदेशीर ठरल्याचे दिसून येते.

**योजनेतील त्रुटी :**

**१) मूळ उद्देशाला फाटा :**

जलयुक्त शिवार योजनेत निश्चित करून निरनिराळी १३ प्रकारची कामे एकात्मिक पद्धतीने करणे आवश्यक होते. परंतु त्यापैकी या योजनेद्वारे केवळ नाला खोलीकरण व रूंदीकरण या एकाच कामावर जास्त भर देण्यात आला. त्यामुळे पर्यावरणीय धोका निर्माण होण्याची भिती व्यक्त होत आहे.

**२) मार्गदर्शक तत्त्वांची पायमल्ली :**

९ मे २०१३ च्या शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा तसेच २१ मे २०१३ च्या कृषी आयुक्तांच्या परिपत्रकातील मार्गदर्शक तत्त्वांचा या योजनेद्वारे करावयाच्या कामांच्या वेळी पालन करण्यात आले नाही.

**३) तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचा अभाव :**

जलयुक्त शिवार योजनेंतर्गत कामे करतांना बहुतांश कामांमध्ये तज्ज्ञांचा सल्ला घेण्यात आलेला नाही. जसे कामाच्या जागेची योग्य निवड तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली झाली नाही व काम करतांना आवश्यक त्या सक्षम अधिकाऱ्यांच्या वेळोवेळी परवानग्या घेण्यात आलेल्या नाहीत असा तज्ज्ञांचा आक्षेप आहे.

**४) कामातील निकृष्टपणा :**

या योजनेंतर्गत करण्यात आलेली काही ठिकाणची कामे ही निकृष्ठ दर्जाची झालेली आहेत. काही ठिकाणचे सिमेंट बंधारे पावसाच्या पाण्यात वाहून गेल्याच्या नागरीकांच्या तक्रारी आहेत.

**५) खालच्या भागातील पाणी उपलब्धता कमी होण्याचा धोका :** ज्या भागात नदी-नाला खोलीकरण व रूंदीकरण झाले व बंधारे बांधण्यात आले त्याच्या खालच्या भागात पाण्याची उपलब्धता कमी होण्याचा धोका संभवण्याची शक्यता काही तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

वरील निरनिराळ्या त्रुटी जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत झालेल्या कामांसंबंधी दिसत असल्या तरी या योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्रभर झालेल्या मृद संधारण व जलसंधारणाच्या कामांमुळे बऱ्याच प्रमाणात पाणी टंचाईचा प्रश्न मिटला असून जमिनीच्या भूजल पातळीत वाढ झाल्याचे ठिकठिकाणच्या कामांच्या अहवालावरून दिसून येते. अयोग्य कामांवर नियंत्रण, दर्जेदार कामांच्या निर्मितीकडे लक्ष, योजनेतील भ्रष्टाचारावर नियंत्रण, शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कामे करणे इत्यादी बाबींकडे लक्ष दिल्यास ही योजना आणखी लोकाभिमुख होईल व निश्चितच या योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्र दुष्काळमुक्त होऊन ''सर्वांसाठी पाणी टंचाईमुक्त महाराष्ट्र'' हे या योजनेचे उद्दिष्ट सफल होईल याची खात्री वाटते.

**संदर्भ सूची :**


१) शासन निर्णय क्र. जलअ-२०१४/ प्र.क्र. २०३/ जल-७ मंत्रालय मुंबई-४०००३२, दि. ५ डिसेंबर २०१४

२) दुसाने मिलिंद मधुकर (२०१५) : महान्यूज मधील लेख. दि. २३ मार्च .

३) पाध्ये रमेश (२०१६) : दुष्काळाला भिडतांना, ४ युनिक फाऊंडेशन

४) जलसाक्षरता-पाणलोट व्यवस्थापन केंद्र, राज्य ग्रामीण विकास संस्था, (यशदा)-महाराष्ट्र शासन

५) इंगळे राजेंद्र, गव्हाणे अजय (२०१६) : मराठवाड्यातील पाणी समस्या एक दृष्टीक्षेप, परिवर्तनाचा वाटसरू, द युनिक अकॅडेमी, पुणे.

६) जलसंवाद - मे, २०१६.

७) लोकराज्य - जुलै, २०१६.

८) योजना - जुलै, २०१६.

९) लोकसत्ता - दि. २५ जून २०१८, २ ऑगस्ट २०१८, ३१ ऑक्टो. २०१८

१०) इंटरनेटवरील विविध लेख.


◆◆◆

# Existential crises and 21st Century Issues before WTO

**Anjali Kulkarni**
Retd. Professor of Economics,
R.T.M. Nagpur University,
Nagpur.

At present World Trade Organization (WTO) as a multilateral trading institute is passing through a critical stage. The WTO seems trapped in a deep malaise. The credibility and survival of WTO is under serious threat as major economies put up protectionist barriers and the beginning of a trade war by USA and China. The report published by Bertelsmann Foundation comes amid a deepening trade dispute between China and United States which has engulfed other major trading parterners.

U. S. President Donald Trump has warned he may ultimately impose tariffs on more than $500 billion worth of Chineses goods - nearly the total amount of U.S. imports from China in 2017 to combat what Washington says are Beijing's trade abuses.( Economic news ,July 17 2018). China has decided to retaliate at each step.

In a bid to survival of WTO, the 14 experts led by Bernard Hoekman, urged 164 member states to work on new trade programme that will address trade distorting policies and preserve multilateral rule based trading system. According to the report " sticking to status quo modes of operating is a major cause for institution's gradual demise. Revitalizing Multilateral Governance is a need of the hour "

The report also urged to avoid further erosion of WTO's credibility. The report suggested to prevent backsliding by WTO members towards unilateral use of protectionist trade policies and ensuring that disputes are resolved

As per the report, US is invoking national security concerns to impose tariffs and quotas on imports of selected products." Such measures create systemic risks given the prospect of tit -for- tat trade distorting measures and greater use of national security justifications by WTO members for the imposition of protectionist measures.

As per the report , Trump has also blocked appointment to the WTOs appeals chamber to replace judges as their term expires. If this matter is not resolved the Applet body will lack the minimum needed to consider an appeal and will cease to be operational when more vacancies arise. The demise of the appeals system would paralyze dispute resolution and make negotiating new trade rules pointless.

The paralysis of the Appellate Body would cast a long and deep shadow on the continued operation of the multilateral trading system.

**About WTO :**

Today's trading system began to emerge towards the end of World War II when 730 delegates from 44 nations gathered in Bretton Woods, New Hampshire, to lay the foundation of a new international economic order.

These diplomats and economists sought to create a system that would prevent global wars and foster shared prosperity by spurring more trade. They laid the groundwork for the International Monetary Fund, the World Bank and the precursor of the institution that later became the WTO, to support this new economic order.

Highly influenced and shaped by President Franklin D. Roosevelt's New Deal policies, the initial trade rules were calibrated toward the pursuit of financial stability and full employment. A golden age of capitalism ensued. Between 1950 and 1973, average incomes in the U.S. and the rest of the world grew at a faster rate than they had for the prior century - and haven't been beaten since. Beginning in the 1980s, the nature of trade and investment treaties changed significantly. Trade, finance and investment became ends in and of themselves, rather than the means to shared prosperity that the international economic order had been centered on.

On top of the WTO's establishment, in 1994, more than 2,000 regional and bilateral trade deals such as the North American Free Trade Agreement proliferated.

Lot of criticism is made against regional and bilateral trade deals. It is alleged that rather than tightly regulating the financial sector to finance, trade and investment flow toward productive investment and good jobs, these deals seek to deregulate finance and investment. They make it illegal for participating countries to enforce regulations meant to ensure productive investment, meaningful employment and social welfare. What is more, many of these treaties allow

corporations to sue governments through private tribunals that usually side with foreign firms over host country regulations on finance, public welfare and the environment.

Free trade has been very good to the U.S., but it is yielding diminishing returns. By all accounts, the era of corporate globalization hasn't delivered like the golden age did. The Peterson Institute for International Economics, a think tank, estimates that trade liberalization injected US$1 trillion into the U.S. economy between 1947 and 2002, yet more than 90 percent of those gains had already occurred by 1982. The benefits of trade deals since that time have been marginal, and are shrinking.

If all the tariffs in the world were completely eliminated, there would only be a one-time bump in the world economy of just 0.7 percent.

**Bigger costs :**

As the gains from trade shrank, its costs grew. Financial crises became more frequent. Indeed the IMF found that the countries that liberalized their financial services industry, as many trade and investment pacts required them to do, were among the worst hit by the Great Recession. MIT economists have found that the WTO accentuated American deindustrialization, likely costing as many as 2.4 million jobs.

Rather than investing the profits from globalization into productive and employment-generating activity, global corporations have been choosing to speculate with their profits and buy back their own stock.

The government isn't investing the gains from trade either. Research at the Brookings Institution shows that the people who lose their jobs because of free trade are not compensated enough to make up for their losses through Trade Adjustment Assistance, a program that pays for people who wind up unemployed due to overseas outsourcing to get professional training and the like.

And these losses for American workers have not translated into widespread gains overseas. Indeed, NAFTA boosted Mexico's trade and investment yet its per capita growth has hardly budged. Environmental damage, however, has followed since NAFTA shifted pollution-intensive manufacturing south of the Rio Grande. Rural communities have suffered since more than 2 million Mexican farmers and farmworkers lost their livelihood.

**Regional Trade Agreement :**

The World Trade Organization

(wto) was supposed to be the driver of free trade in a globalised economy. But this does not seem to be the case. Regional Trade Agreements (RTS) seem to be ruling the roost. Two hundred ninety RTA s are now in force. RTAs are popular among industrialised countries and developing countries are being coaxed to sign such agreements without understanding their ramifications. What then will be the fallout?

According to economist Jayati Ghosh, "If rtas promote faster trade creation, they also destroy employment opportunities." The example of North American Free Trade Agreement (NAFTA) between Mexico, Canada and the US is a case in point. nafta saw Mexico's merchandise trade with the us increasing by 75 to 80 per cent between 1992 and 1996, and after 10 years of NAFTA, there was a 300 per cent import surge in corn and 500 per cent surge in soybean, wheat, poultry and beef import. This resulted in 1.7 million farmers losing their jobs. But trade economist Jack O Neil, who is with finance major Goldman Sachs, feels, " rtas are faster ways to promote trade and economic growth. The benefits ultimately trickle down to the poor." rtas are also a problem area with respect to trade diversion. "When rtas come into existence, demand shifts from efficient producer to inefficient producer who are members in rta because of lower tariffs. Hence, the countries that do not participate in rtas are at the receiving end," says Prabhas Ranjan, trade researcher with Centre for Trade and Development.

Organisation of Economic Co-operation and Development (OECD) nations prefer rtas, especially in the case of developing economies. They have obvious advantages. Bilateral Trade Agreements (BTAs) and rtas enable them to dictate trade norms in their favour.

**Trans -Pacific Partnership (TPP) :**

One of Trump administration's first action was to withdraw the United States from the Trans Pacific Partership. This agreement which was a major initiative of Obama administration would have created the largest economic bloc in the world by linking America's economy with those of 11 other pacific nations. It would also have created an American- led liberal bulwark in Asia agaist any Chinese challenge to the regional economic order.

Withdrawing from the agreement denied American exporters enhanced access to foreign markets and was a gift to Chinese influence in Asia. Sidelining Trump's decision to withdraw from TPP the other 11 signatories of the original trade deal , including Japan , Austria, Canada and

Mexico agreeded to move forward without the US. This is a problem for US. Because it means that these countries will grant preferential market access to one another , making it harder for American companies to compete in their markets.

American companies are already feeling the impact of what happens when they are already left out of a trade deal. The plight of American producers is highlighted in recent New York Times article. Their prices are undercut by Canadian producers in the wake of a new Canada European Union trade agreement. If the US is reluctant to participate in multilateral trade agreements other countries have every incentive to do deals that exclude US and even may hurt the deals.

**Need for Reforms in WTO :**

Three broad areas of WTO activity can be identified where reforms could be relevant in the current context.:institutional issues (including decision making, small grouping, and promoting leadership); " the negotiating forum " ( which clearly needs rethinking); and shifts in trade patterns and global trading power (and the consequences). This third area , the impact of external events , needs to be emphasized even if the facts about changing pattern of world trade are well known. China has risen to be the third largest trading nation in goods and services in the decade since it joined the WTO and second if European Union is not treated as a group. India has followed , now joining the top echelon. Thanks to its successes in services sector. Countries such as Korea,Mexico, and Brazil have also been rising up the ladder. WTO remains an indispensable organization but it requires urgent modernization .Members have to face reality that the organization requires non-cosmetic serious root and branch reform for a WTO adapted to 21st century economic and political realities.

The range of problems facing the WTO spans conflicting economic models, architectural and structural inadequacies and rules ,functions and procedures that entail radical updates.

A reformed WTO will have to be constructed on the foundation of liberal multilateralism, resting on open, non discriminatory, plurilateral pillars, an improved Appallate Body explicit accommodation of regional trade agreements and appropriate safety volves for rule based sovereign action.

A reaffirmed commitment to the rule based liberal order with a development dimension must be the foundational starting point.

**21st Century Issues before WTO :**

The 21st century trade issues in the WTO are the ones that are newly brought especially by the developed countries to scale up liberalization. Throughout the history of WTO the developed world is trying to broaden the trade agenda . The main 21st century issues are commerce, disciplines for Micro and Small and Medium Enterprises (MSMEs), investment facilitation, gender development and domestic regulation.

A striking feature of 21st century issues is that they seem to have distant connections with trade. The developed countries who likes to broaden trade agenda of theWTO, are the champions and promoters as well as parties who consistently bring in these issues into the trade discussion platforms of WTO.

There is intense debate within the WTO about extending the agenda of the WTO Without solving the existing outstanding issues. They also opposed talk on new issues at Buenos Aires Ministerial Conference.

**Importance of 21st century issues for the WTO :**

WTO as a multilateral institution with a dedicated function to create rules for world trade, is facing intense competition from regional trade blocks (RTBs). In case of trade liberalization Often the RTB s adopt higher levels of trade liberalization by expanding trade agenda.

The WTO seems trapped in a deep malaise unable to conclude the Doha round. Due to 20th century conflicts over tariffs and agricultural barriers, theWTO seems unable to move forward. Supporters of 21st century issues argue that 21st century issues require discipline that goes far beyond those in the WTOs rulebook. If WTO can't deal with such issues RTBs will take care of them. Here, WTO will loose its relevance.

The real threat, therefore, is not failure of WTO but rather the erosion of its centrality in the world trade system

**References :**


1) https://www.reuters.com/articles/us
2) https://www.marketwatch.com/story/what-history
3) https//www.ictsd.org/sites
4) https//www.indian economy . net/spiclass
5) https://down to earth .org .in not all is well with WTO


◆◆◆

ISSN 2320-0197

# आर्थिक वृद्धी, तंत्रज्ञानात्मक बदल आणि हवामान बदल यासाठी २०१८ चे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक

**प्रशांत हरमकर**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
या.द.व.देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय,
तिवसा, जि.अमरावती.

**प्रस्तावना :**

विल्यम डी. नार्थस आणि पॉल एम. रोमर यांना २०१८ चे अर्थशास्त्रामधील नोबेल पारितोषिक जाहीर (८ ऑक्टोबर २०१८ रोजी) झालेले आहे. विल्यम नॉर्थस येल विद्यापीठ न्यु हवाना, अमेरिका येथे कार्यरत आहे. पॉल रोमर एन.वाय.यु. स्र्टन विद्यापीठ न्युयॉर्क, अमेरिका येथे कार्यरत आहे. विल्यम डी. नार्थस यांनी ''हवामान बदलाच्या एकात्मिकरणासाठी दीर्घकालीन समष्टी आर्थिक विश्लेषण केलेले आहे.'' तर पॉल रोमर यांनी ''तंत्रज्ञानात्मक नवप्रर्वतनाच्या एकीकरणासाठी दीर्घकालीन समष्टीय आर्थिक विश्लेषण केले आहे.'' यावर्षीचे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक आर्थिक वृद्धीसह पर्यावरण आणि नवप्रर्वतनाच्या एकीकरणासाठी देण्यात आलेले आहे. या दोघांनी मुलभूत आणि दबाव निर्माण करणाऱ्या प्रश्नांना संबोधून त्यांना सोडविण्याची पद्धती विकसित केलेली आहे.

संसाधनाचे व्यवस्थापन करित असतांना आर्थिक करार केले जातात. ज्याअंतर्गत पर्यावरणाला हानी पोहचलेली आहे. मुख्यत्वे हा परिणाम निसर्गावर घडून आलेला आहे. आर्थिक वृद्धी आणि आपल्या ज्ञानाच्या आधारावर हे परिणाम कसे आहे ते पहावे लागणार आहे. कराराचा परिणाम पर्यावरणावर कसा घडून आला. अशा प्रकारे आर्थिक विश्लेषणाचा विस्तार ठळकपणे प्रारूपामधून केलेला आहे. कशा प्रकारे बाजार अर्थव्यवस्थेमध्ये निसर्ग आणि ज्ञानाची आंतरकृती चालते याचे विवेचन नॉर्थस आणि रोमरने केलेले आहे.

**तंत्रज्ञानात्मक बदल :**

दीर्घकालीन आर्थिक वृद्धीला वहन करण्याचे कार्य ज्ञान कशा प्रकारे करते ते त्यांच्या प्रस्तुतीकरणावर (demonstration) अवलंबून असते असे रोमरने स्पष्ट केलेले आहे. एकूणच एखाद्या दशकात काही प्रतिशत प्रमाणात आर्थिक वृद्धी घडून आली तर लोकांच्या जीवनमानात बदल घडून येतो. रोमरने समष्टीय आर्थिक संशोधनावर भर देत असतांना तंत्रज्ञानात्मक नवप्रवर्तन आर्थिक वृद्धीचे प्राथमिक वाहक असल्याचे म्हटले आहे. मात्र त्यावरून प्रारूप तयार होऊ शकले नाही. आर्थिक निर्णय आणि बाजार अटी ठरवित असतांना नवीन तंत्रज्ञानाची निर्मिती कशा प्रकारे होते. प्रस्तुतीकरणाद्वारे पेढ्याच्या ऐच्छिकतेचा आर्थिक दबाव (economic force) शासक असतो. तो नवीन कल्पना आणि नवप्रवर्तनांना उत्पादित करतो. याद्वारे ही समस्या सोडविली जाते असे पॉल रोमरचे मत आहे.

रोमरने जे उपाय शोधले ते १९९० मध्ये प्रसिद्ध झाले. जो की त्यांनी स्थापनेमध्ये (foundation) मध्ये पुढाकार घेतला. त्याला आंर्तजात वृद्धी सिद्धांत (endogenous growth theory) असे म्हणतात. सिद्धांत दोन्ही प्रकारचे म्हणजे संकल्पनात्मक आणि वास्तव आहे. ते रोमरने स्पष्ट केले आहे. कल्पना कशा प्रकारे भिन्न असतात. आवश्यक विशिष्ट अटीअंतर्गत बाजाराला कशी भरभराट येते याचे स्पष्टीकरण केलेले आहे. रोमर सिद्धांताने नवीन संशोधनासाठी मोठी व्याप्ती निर्माण केलेली आहे. नवीन संशोधनामधील नियमन आणि धोरणामधून नवीन संशोधन निर्माण होते. जो नवीन कल्पना आणि दीर्घकालीन संपदेला प्रोत्साहन देतो.

**हवामान बदल :**

निसर्ग आणि समाज यामधील आंतरकृती करार (deal) घडवून शोधून काढले जातात. नार्थसने केलेले या विषयावरील काम १९७० च्या दशकामधील आहे. उष्ण हवामानामध्ये जैव इंधनाचा (fossil fuel) संयोग ज्वलनशील आहे. शास्त्रज्ञ म्हणून याची काळजी वाढणारी आहे. १९९० च्या दशकाच्या मध्यामध्ये पहिल्यांदा एकात्मिक मूल्यांकन प्रारूप (Integrated Assessment Model) निर्माण करण्यात आले. या संस्थात्मक प्रारूपाद्वारे विश्लेषण करीत असतांना अर्थव्यवस्था आणि पर्यावरण यांच्या मधील जागतिक आंतर खेळ चालत असतो. त्यांचे एकात्मिक मूल्यांकन प्रारूप आणि अनुभवनिष्ठ विश्लेषणाद्वारे भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि अर्थशास्त्राकडून उत्तर प्राप्त झाले आहे. नार्थसचे प्रारूप आता मोठ्या प्रमाणात विस्तारलेले आहे. त्याचा उपयोग समांतरपणे अर्थव्यवस्था आणि पर्यावरणामध्ये गुंतलेला आहे. पर्यावरण धोरण ठरवितांना त्याचा उपयोग झाला आहे. उदा. कार्बन कर.

पॉल रोमर आणि विल्यम नॉर्थस याचे योगदान पर्यावरण, तंत्रज्ञान आणि अर्थशास्त्र याचे शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण करण्याचे आहे. यासह मूलभूत तरतुदीच्या छाया यामधून प्रकटलेल्या आहे. हवामान बदल आणि तंत्रज्ञानात्मक नवप्रवर्तनाची कारणे आणि परिणामाची छाया यामधून उमटलेली आहे. दोघांची मांडणी निष्कर्षत्मक स्वरूपाची आहे. त्याचा जवळचा संबंध शाश्वतता आणि शाश्वत जागतिक आर्थिक वृद्धीशी आहे. शाश्वत आर्थिक वृद्धी कशा प्रकारे संपादित केल्या जाऊ शकते याची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न या दोघांनी केलेला आहे.

मानवाकडे मर्यादित संसाधने आहे. या संसाधनांना इजा पोहचते आहे असे अर्थशास्त्राने दर्शविले आहे. शास्त्र म्हणून त्याचा आरंभ करून अर्थशास्त्राने त्याला मान्यता दिलेली आहे. त्याचा परिणाम संसाधनावर घडून आलेला आहे. त्यांचे प्रतिबिंब निसर्ग आणि ज्ञान यांच्या आंतरसंबंधातून उमटलेले आहे. निसर्ग नमुद करतो की, आपण अटीमध्ये जीवन जगतो आणि ज्ञान स्पष्ट करतो. आपल्या समर्थतेचा निर्वाह या अटीअंतर्गत झाला पाहिजे. शिवाय केंद्रीय भूमिका बाजार आणि आर्थिक वर्तणूकीची आहे. ज्याद्वारे निसर्ग आणि ज्ञान कशा प्रकारे प्रभावित होते याचे अध्ययन केले आहे. पॉल एम.रोमर आणि विल्यम डी.नॉर्दस यांनी आर्थिक विश्लेषणाचा विस्तार ठळकपणे केला आहे. साधनांच्या द्वारे रचना तयार केली आहे. याबाबत परिक्षण करीत असतांना बाजार अर्थव्यवस्था दीर्घकाळात निसर्ग आणि ज्ञानाचा विस्तार घडवून

आणेल असे मत व्यक्त केले आहे.

**ज्ञान :**

एकूणच जागतिक अर्थव्यवस्था शतकापेक्षा जास्त कालावधीपासून वृद्धींगत पावत आहे. एकूणच दशक आणि शतकामध्ये प्रतिवर्ष समग्र आर्थिक वृद्धीचा दर वाढत असतांना योग्य आणि योग्य स्थिर अवकाश (fairly steady space) आहे. मंद गतीने आर्थिक वृद्धी घडून येत असतांना लोकांच्या जीवनमानामध्ये बदल घडून येत आहे. हे मानव इतिहासावरूनच स्पष्ट होते. आर्थिक वृद्धी आणि लोकांच्या जीवनमानातील बदल यांच्यात देशादेशामध्ये तफावत आहे.

आर्थिक वृद्धी का घडून येते ? अर्थशास्त्र याला संकेतात्मक उत्तर देतो. तंत्रज्ञानाचा विकास गुंतवणूकदार, अभियंते आणि शास्त्रज्ञाद्वारे होतो. यामधून तंत्रज्ञान मूर्त स्वरूपात येते. १९८० च्या दशकामध्ये पॉल रोमर जेव्हा शिकागो विद्यापीठामध्ये पीएच्.डी. चे संसाधन करीत होते तेव्हाच अंर्तजात वृद्धी प्रारूप (endogeous growth model) विकसित करण्यास सुरूवात केली. तंत्रज्ञानात्मक पुढाकार हा बर्हिजात स्त्रोताद्वारे (exogenous source) होतो. जो प्रारूपामध्ये गृहीत धरलेला आहे. बाजाराच्या संदर्भात उद्दिष्टपूर्ण कृती घडवून आणण्याची निर्मिती केली आहे. रोमरने शोधून काढले की, याला लागू करीत असतांना स्वत: चांगल्या प्रकारे समजून घेतल्या गेले पाहिजे. बाजार अटी नफादायक तंत्रज्ञानासाठीच्या नवकल्पनाच्या निर्मितीच्या अनुकूल आहे. त्याचे संशोधन कार्य संस्थाची रचना आणि धोरणे यांना मदत करणारे आहे. ज्यामधून मानवी संपदा निर्माण केल्या जाऊ शकते. योग्य अटी अंतर्गत तंत्रज्ञानात्मक विकास घडून आलेला आहे.

**निसर्ग :**

विल्यम नॉर्थस यांनी त्यांच्या संशोधन कामाला सुरूवात १९७० च्या दशकापासून केली. त्यांच्या संशोधनाचा संबंध हा ज्वलनशील जैविक इंधने कशा प्रकारे जागतिक तापमानामध्ये वाढ घडवून आणत आहे. याचा घडून येणारा परिणाम म्हणजे जैवइंधने संपुष्टात येऊन हवामान बदल व जागतिक तापमानात वाढ होत आहे. द्विदिशीय तप्तता (Bi-directional feed) चे परिक्षण करून या जिकरीच्या कामाबाबत शंका व्यक्त करून त्याला टाळले आहे. हे सर्व मानवी कृती आणि हवामानाच्या बाबत आहे. मूलभूत सिद्धांताद्वारे कसून शोध घेतला त्याचा अनुभवनिष्ट परिणाम भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि अर्थशास्त्राशी संबंधित आहे. याद्वारे निसर्गावर लक्ष केंद्रित केलेले आहे. सोबतच मानवी कृतीवर लक्ष केंद्रित करण्यात आलेले आहे. तरी सुद्धा आर्थिक कृतीद्वारे हवामान बदलाचा मोठ्या प्रमाणात विस्तार घडून आलेला आहे. याबाबत नॉर्थसने व्यक्ती म्हणून साधी रचना मांडलेली आहे. तर गतिशील आणि जागतिक आर्थिक-हवामान व्यवस्था मात्रात्मक प्रारूपामध्ये मांडलेली आहे. ज्याला एकात्म मूल्यांकन प्रारूप (Integrated Assessment Model- IAM) असे म्हणतात. या प्रारूपाचा साधन म्हणून वापर करीत असतांना अर्थव्यवस्था कशा प्रकारची आहे आणि यामध्ये हवामान कशा प्रकारे गुंतलेले आहे. यामध्ये समांतर वैशिष्टे असतांना निसर्गाचे कार्य आणि बाजार अर्थव्यवस्थेचे गृहीतक समाविष्ट आहे. विविध ठिकाणाची जागतिक सदृश्य स्थिती आणि विशिष्ट धोरणाच्या हस्तक्षेपाला संबोधून प्रारूपाची मांडणी केलेली आहे.

**जागतिक बाजारातील अपूर्णता :**

समाजावरील सांडवण परिणाम (spillover effect) दोन्ही अर्थशास्त्रज्ञानी विषद केलेला आहे. ज्याचा इतरावर परिणाम घडून येतो. केवळ व्यक्तिगत नवप्रर्वतने किंवा प्रदुषके (polluters) याद्वारे मापन करता येत नाही. नवतंत्रज्ञानासाठी कोणत्याही कल्पना कोणत्याही ठिकाणी असू शकतात. वर्तमान किंवा भविष्यामध्ये नव्याने कार्बन उर्त्सजनाचे एकक आहे. त्याचे मूळ कोठे आहे. तर तो वातावरणामध्ये पसरलेला आहे. त्याचा हवामान बदलामध्ये सहभाग नोंदवलेला आहे. यामुळे सध्याची आणि भविष्यातील आर्द्रता प्रभावित होते. याचा संबंध सांडवण परिणामाशी आहे जशी की ही बाह्यता आहे. बाह्यताचे अध्ययन रोमर आणि नॉर्दसने जागतिक पोहोच आणि दीर्घकालीन परिणामाच्या संदर्भात केलेले आहे. अनियंत्रित बाजार अकार्यक्षम उत्पादन करतो जो बाह्यतानाच प्रस्तुत करतो किंवा बाह्यताचा भाग आहे. रोमर आणि नॉर्थस यांनी शासनाच्या हस्तक्षेपाची तरतूद दर्शविली आहे.

**तंत्रज्ञानातमक नवप्रर्वतन – प्रेरणा :**

दीर्घकाळात वृद्धिदरामध्ये तफावत आहे. याचा प्रचंड परिणाम (staggering effect) हवामानावर घडून आलेला आहे. जर दोन अर्थव्यवस्थामध्ये समग्र देशीय उत्पाद (GDP) समान आहे. मात्र एक अर्थव्यवस्था ४ प्रतिशत उच्चतम दरावर आहे. जो की ४० वर्षामध्ये पाचव्यांदा ती या स्तरावर पोहचेली आहे. आधिक्याने मर्यादित (modest) प्रतिशत वृद्धी दराने पुढाकार घेतल्यास गेल्या ४० वर्षात राष्ट्रीय उत्पन्न दुहेरी अंकात परिवर्तित होते.

रोमरने १९८० च्या दशकामध्ये निरीक्षण केले की, देशोदेशीचा उत्पन्न दर जास्त दिसून आला. १९६० च्या दशकामध्ये प्रति व्यक्ती उत्पन्न आणि सरासरी वृद्धी दर २५ वर्षात पर्याप्त प्रमाणात १०० देशामध्ये समकालीन समंकाची रेखाकृती दिसून येते. यामुळे दृश्य स्वरूपाची ओळख पटते. उपलब्ध समंकावरून हे देखील स्पष्ट होते की भिन्न देशामधील वृद्धी दर हा भिन्न असतो. जलद आणि मंद आर्थिक वृद्धी दरामुळे मोठी तफावत दिसून येते. कोणताही सूत्रबद्ध असा संबंध उत्पन्न आणि वृद्धी दरामध्ये नसतो. काही गरीब देश जलद गतीने वृद्धी घडवून आणतात. जो कि इतर देश आर्थिक वृद्धीच्या खालच्या टोकावर असतात. रोमरने निष्कर्ष काढला की, कारणांना समजवून घेतले पाहिजे कि, दिर्घप्रयत्नी आणि वृद्धी दरामध्ये भिन्नता ही निर्णायक व महत्त्वाची अट आहे. त्याहीपेक्षा त्याचे विश्लेषण करण्याची गरज आहे.

**अनुभवनिष्ठ आणि सैद्धांतिक उणिवा :**

रोमरने नमूद केले की, सोलो वृद्धी प्रारूपाकरिता अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक देण्यात आले होते. या प्रारूपाने आर्थिक वृद्धीची अनेक वैशिष्टे स्पष्ट केली आहे. मात्र दीर्घप्रयत्न करून सुद्धा आर्थिक वृद्धी दरामध्ये भिन्नता होती. सोलो प्रारूपाने स्पष्ट केले की, गरीब देश जलद गतीने आर्थिक वृद्धी घडवून आणून श्रीमंत देशाच्या आर्थिक वृद्धींना गाठू शकतात. या प्रारूपानुसार अर्थव्यवस्था वृद्धिंगत होत असतांना समग्र भौतिक भांडवल (accumulate physical capital) उदा. यंत्रे किंवा आधारभूत विकास/संरचनात्मक विकास आहे. मात्र भांडवल कर्णित वृद्धी (capital driven growth) हळूहळू संपुष्टात येते. याला जोडून भांडवल उत्पन्न न्यूनतम आणि न्यूनतम आधिक्य

उत्पादनाच्या संदर्भात आहे. त्यामुळे दीर्घकाळात आर्थिक वृद्धीमध्ये भिन्नता येते. प्रारूपामध्ये गृहीत मानले आहे की, आधिक वेळेचा (over time) वापर करून श्रमिकाकडून उत्पादन वाढविल्या जाते. असे असतांना देखील तंत्रज्ञानात्मक पुढाकारावर अधिक भर दिला जातो. तरी देखील प्रत्येक देशाच्या वृद्धि दरामध्ये तफावत दिसून येते. अशा प्रकारच्या प्रवृत्तीचे सोलो प्रारूपाद्वारे स्पष्टीकरण करता येत नाही कारण तंत्रज्ञानामध्ये सातत्याने बदल घडून येत असतात यांना बर्हिजात ब्लॅक बॉक्स (exagenous black box) असे म्हटले आहे.

प्रामुख्याने हे निस्तरलेपण (breakthrough) रोमरने स्पष्ट केलेले आहे. या ब्लॅक बॉक्स द्वारे दर्शविले आहे की, नवीन वस्तू आणि सेवांसाठी कशा कल्पना आहे. नवीन तंत्रज्ञानाद्वारे उत्पादन केले जात असतांना यामध्ये बाजार अर्थव्यवस्था निर्माण केल्या जाऊ शकते. रोमरने प्रस्तुत केले आहे की कशा प्रकारे अंतर्गत तंत्रज्ञानात्मक बदल वृद्धीला आकार देऊ शकतात. कोणती धोरणे या प्रक्रियेला कार्यप्रवण करू शकतात. रोमरचे योगदान प्रचंड परिणाम घडवून आणणारा आहे. हा परिणाम अर्थशास्त्राच्या क्षेत्रामध्ये घडून येणारा आहे. याबाबत वाद-प्रतिवाद निर्माण झालेले आहे. देश निहाय तुलनेच्या आधारे नवीन कंप पावणारे अनुभवनिष्ट संशोधन आहे.

**कल्पना वाहक वृद्धीच्या बाबत विशेष काय :**

या प्रश्नाचे उत्तर देतांना आपल्याला समजवून घ्यावे लागेल की, कशा प्रकारे वस्तू भौतिक किंवा मानव भांडवल संकल्पनेमध्ये भिन्नता आहे. रोमरच्या नुसार वस्तूचा विचार दोन पैलूद्वारे करावा लागतो. पहिला पैलू असा की, भौतिक आणि मानवी भांडवल प्रतिस्पर्धो वस्तू (river good) आहे. यंत्र, तज्ञ, अभियंते यांचा उपयोग एका विशिष्ट कारखान्यामध्ये होतो. तर दुसऱ्या बाजूला अप्रतिस्पर्धो वस्तू (non-river good) देखील आहे. एखाद्या व्यक्ती किंवा पेढी या कल्पनाचा उपयोग करतात. शिवाय याचा उपयोग करणे अशक्य नाही.

दुसरा पैलू असा की, या वस्तू वगळलेल्या असू शकतात. या वस्तूचा उपयोग करतांना अडथळा निर्माण होऊ शकतो. याकरिता संस्थात्मक कायदे किंवा नियमन करण्याची संभाव्यता असते. याचा काही कल्पनासाठी उपयोग केला जातो. ज्याचा मूलभूत संशोधनावर परिणाम घडून येतो. मूलभूत संशोधनामध्ये काही अडचणी किंवा असंभाव्यता आहे. ज्याचा विचार गणितात्मक स्वरूपात झालेला आहे. जसा की पायथागोरसचा सिद्धांत आहे. याशिवाय इतर कल्पनाचा उपयोग करणारे यातून वगळलेले आहे. यामध्ये तंत्रज्ञानात्मक मापके आहे. किंवा पेटंट सारखे कायदे आहे. रोमरने त्याच्या संशोधनामध्ये स्पष्टपणे दर्शविले आहे की, प्रतिस्पर्धी (rivalry) आणि वगळलेल्या (excludability) संकल्पना आर्थिक वृद्धीमध्ये ठरविलेल्या आहे.

| | प्रतिस्पर्धी वस्तू | अप्रतिस्पर्धी वस्तू |
|---|---|---|
| ↑ | ✻ सॉफ्ट ड्रिंक | ✻ संकेत असलेले सॅटेलाईट टी.व्ही.ब्रॉडकास्ट |
| नियंत्रणात्मक अंश किंवा प्रवेशास मनाई | ✻ दूरदर्शन संच | ✻ सॉफ्ट ड्रिंक तयार करण्याची पद्धतीची युक्तता |
| | ✻ खोल समुद्रातील मासे | ✻ संगणक सॉफ्टवेअर |
| | | ✻ जीपीएस संकेत |
| | | ✻ मूलभूत संशोधन |
| ↓ | | ✻ पायथागोरस सिद्धांत |

रोमरचा विश्वास आहे की, संकल्पनाच्या मांडणीसाठी बाजार प्रारूपाची आवश्यकता आहे. नवीन वस्तूचे उत्पादन होत असतांना या संकल्पनाचा आधार घ्यावा लागतो. वस्तू उपयोगात येत असतांना तिचा उत्पादन व्यय जलद गतीने घटत जातो. याचे ठळक चित्र (blue print) मोठ्या स्थिर व्ययाचे आहे. मात्र प्रतिकृती किंवा पुनर्उत्पादन (replication/ reproduction)लहान सीमांत उत्पादन व्ययामध्ये होते. म्हणून त्याची भरपाई होऊन आरंभापासून स्थिर व्यय असतो. शिवाय पेढीकडे एकाधिकार असणे आवश्यक आहे. पर्याप्त प्रमाणात नवीन वस्तूच्या प्रवेशास मनाई असल्यामुळे (excludable) ते शक्य आहे. रोमरने असे दर्शविले की, कल्पनाच्या समग्रतेद्वारे (accomodation) वृद्धी होत असते. जर वृद्धी वाहक होत नसेल तर भौतिक भांडवलाच्या समग्रतेद्वारे वृद्धी वाहक होते. अनुभवनिष्ठतेनुसार ऱ्हासमानतेद्वारे परतावा मिळू शकत नाही. थोडक्यात कल्पना-कर्षित वृद्धी (ideas-driven growth) आधिक्य वेळामध्ये पर्याप्त असू शकते.

**अपूर्ण बाजारातील धोरणे :**

तत्वत: यशस्वी संशोधन आणि विकासाद्वारे नवीन ज्ञानाची निर्मिती होते. संशोधन आणि विकास (R & D) नवप्रर्वतनकाराच्या जगात कोठे ही लाभदायक असू शकतात. हा लाभ बाजाराला प्राप्त होतो. याचा सन्मान संपूर्णपणे नवीन ज्ञानाच्या निर्माण कर्त्यांना देता येत नाही, तर नवप्रवर्तकांना देखील सन्मान द्यावा लागतो. याचा अर्थ असा की नवीन ज्ञान सामाजिक दृष्ट्या लाभदायक असते. शिवाय संशोधन आणि विकासाशी जुळलेले असते. संशोधन व विकासाद्वारे बाजार प्रोत्साहने प्राप्त होऊन एकाधिकार लाभ प्राप्त करून घेतले जातात. अगदी नवीन वस्तूसाठी अपर्याप्त तरतुदी असतात. ज्याचा शोध (invented) घेतल्या गेला पाहिजे. पर्याप्त संशोधन दर्शविते की, बाजार कशा प्रकारे परिणाम घडवून आणतो. संशोधन आणि विकासामुळे (R & D) बदल घडून येतात. नवीन कल्पना अस्तित्वातील पेढ्यांना नष्ट करतात. ज्याला निर्माणशील ऱ्हास (destruction) असे म्हणतात. नवीन कल्पनानी भर घातल्यामुळे बरेचदा ते सामाजिक दृष्ट्या अपायकारक तंत्रज्ञान देखील ठरते. नवीन कल्पना अतिशय जास्त प्रमाणात कुवत निर्माण करतात. पूर्वीचे तंत्रज्ञान उपटून टाकतात. जसे की जीवाश्म इंधनाचा (fossile fuel) उपयोग पर्यावरणाला हानी पोहचविते त्याला पर्यायी पर्यावरण पूरक इंधनाचा वापर झाला तर पूर्वीचे तंत्रज्ञान काढून टाकल्या जाईल.

संक्षिप्त स्वरूपात रोमरने असे म्हटले आहे की, बाजार अनियंत्रित आहे. बाजारामध्ये तंत्रज्ञानात्मक बदल निर्माण होत असतात. संशोधन आणि विकास व नवीन कल्पनामुळे नवीन वस्तूची निर्मिती होत असते. यामध्ये संचनात्मकरित्या शासनाचा हस्तक्षेप यामध्ये होतो. जसे संशोधन आणि विकासाला अनुदान दिला जाते. याकरिता पेटंट अधिनियमन केले जाते. अशा प्रकारचा हस्तक्षेप आणि धोरण दीर्घकालीन वृद्धीकरिता अत्यंत आवश्यक असते. ज्याचा लाभ केवळ देशांतर्गत पातळीवरच नाही तर जागतिक पातळीवर देखील मिळतो. या संदर्भातील तरतुदी धोरणात्मक रचनेसाठी उपयोगी ठरतात. पेटंट कायद्यामुळे स्थिरता निर्माण होऊन योग्य प्रकारे संतुलन साधल्या जाते. यामुळेच नवीन कल्पनाच्या निर्मितीकरिता प्रोत्साहन मिळते.

यामार्फतच विकासकाना काही एकाधिकार दिले जातात. तसेच इतरांनामध्ये त्याचा उपयोग व्हावा याकरिता उपयोग होण्याची क्षमता निर्माण केल्या जातो. वेळ आणि अंतर यानुसार अधिकारांना मर्यादा आहे.

**हवामान बदल – प्रारूप व धोरणे :**

सरासरीने जागतिक तापमानामध्ये वाढ मानवी कृतीच्या सहभागामुळे होत आहे. गेल्या १०० वर्षामध्ये मानवी कृतीचा अनिश्चितपणे विस्तार होत गेल्यामुळे भविष्यातील वातावरणाला प्रभावित केले आहे. नैसर्गिक शास्त्रज्ञ (Natural scientists) स्पष्टपणे त्याच्या परिणामापर्यंत पोहोचलेले आहे. ते म्हणतात की, ''यामधील सर्व संभाव्यता या अत्यंत महत्त्वाच्या आहे.''

विल्यम नार्थस १९७० मध्ये येल विद्यापीठामध्ये प्राध्यापक होते. ते जागतिक तापमान वाढीच्या बाबत संशोधन करीत होते. ज्याची कारणे आणि निष्कर्ष त्यांनी नोंदवलेले होते. जागतिक तापमान वाढीचा संबंध श्रृंखलात्मक असून त्याकरिता नवीन साधनाची मदत आपणास कशा प्रकारे होऊ शकते याची कल्पना योजली आहे. अर्थव्यवस्था जागतिक हवामानामध्ये बदल घडवून आणतात. हवामान बदलाचा परिणाम हा सामाजिक देखील असतो. याकरिता विल्यम नार्थसने अर्थशास्त्रांतर्गत हवामान बदलाला लागू होणारी चौकट विकसित केली. त्याचे विश्लेषण व्यय आणि लाभाच्या अटी अंतर्गत केले.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे यांसदर्भात रोमर आणि नॉर्थसने सोलो वृद्धी प्रारूपाचा विस्तार घडवून आणला व महत्त्वाची मांडणी केली. सांडवण परिणाम (spillover effect) जागतिक तापमान वाढीमध्ये समाविष्ट आहे. ज्याचे कारण कार्बन डायआक्साईडचे उर्त्सजन आहे. यासंदर्भात सांडवण परिणामाचे प्राबल्य नकारात्मक आहे. निर्णायकपणे विशिष्ट यंत्रणा आणि मानवी कृती हवामान बदल घडवून आणण्याच्या प्रक्रियेमध्ये गुंतलेले आहे. ज्याचा अभ्यास नैसर्गिक शास्त्रामध्ये (Natural Science) होतो. हवामान बदलाचे जागतिक पातळीच्या संदर्भात विचार करतांना अखंडत्व दृष्टिकोन असणे आवश्यक आहे. कारण हवामान बदलाची प्रक्रिया समाज आणि नैसर्गिक गतिशीलतेच्या आंतरकृतीतून घडून येते. याकरिता नॉर्थसने सर्वात प्रथम संशोधन करून प्रारूप विकसित केले आहे. या प्रारूपाला एकात्मीकरण मूल्यांकन प्रारूप (Integrated Assessment Model - IAM's) असे म्हटले आहे. हे प्रारूप पुढील तीन एकात्मिक प्रारूपाचे मिश्रण आहे.

**अ) कार्बन चक्रीकरण प्रारूप :**

या प्रारूपाचे विश्लेषण करीत असतांना कशा प्रकारे जागतिक पातळीवर कार्बनडाय आक्साईड उर्त्सजनाचा विस्तार घडून आला ते स्पष्ट केले आहे. त्याचा आधार रसायनशास्त्र आहे. याबाबतचे विश्लेषण करीत असतांना कार्बन डायआक्साईडचे उर्त्सजन कशा प्रकारे घडून येते यादरम्यान कार्बन साठवणीच्या (carbon reservoires) संकल्पना महत्त्वाची आहे. ज्यामध्ये वातावरण, समुद्राचा पृष्ठभाग आणि जैवमंडळ (bio-sphere) आहे. हे सर्व वातावरणामध्ये कार्बन डायऑक्साईड निर्माण करतात.

**ब) वातावरणीय प्रारूप :**

या प्रारूपामध्ये वातावरणामध्ये कार्बन डायऑक्साईड कशा प्रकार निर्माण होतो याचे विवेचन केले आहे. तसेच इतर हरितवायूचा परिणाम पृथ्वी

व ऊर्जा प्रवाहाच्या संतुलनावर कसा होतो ते स्पष्ट केले आहे. भौतिक आणि इष्ट स्वरूपाचे बदल घडून येतात. ज्याचा आधिक्याने परिणाम जागतिक ऊर्जा अंदाजपत्रकावर होतो. या प्रारूपानुसार जागतिक तापमान वाढीचे मार्गक्रमण व हवामान बदलाची गाभा मापके आहे.

**क) आर्थिक-वृद्धी प्रारूप :**

जागतिक बाजाराचे विश्लेषण करीत असतांना श्रम आणि भांडवलाचा उपयोग करून उत्पादक वस्तूची निर्मिती केल्या जाते. यासोबतच ऊर्जा आणि आदानाचा वापर केला जातो. या ऊर्जेचा एक भाग म्हणजे जीवाश्म इंधन (fossil fuel) होय. ज्यामधून कार्बन डायऑक्साईडचे उर्त्सजन घडून येते. कार्बन डायऑक्साईड उर्त्सजनावर नियंत्रण ठेवण्याकरिता विविध हवामान संबंधित धोरणे राबविण्यात आलेली आहे. जसे की कर आणि कार्बन कर लावले जातात यामुळे अर्थव्यवस्था प्रभावित होते. प्रारूपानुसार उत्पादने हा समग्र देशीय उत्पादाचा (GDP) कालपथ आहे. यादरम्यान कल्याण आणि जागतिक कार्बन उर्त्सजन आहे. कार्बन उर्त्सजनाचे प्रमाण वाढल्यामुळे हवामान बदल घडून कालपथालाच (Time -path) हानी पोहोचते.

**जागतिक गतिशील व्यवस्था :**

विल्यम नार्थसने वरील तीनही प्रारूपे अत्यंत साध्या पद्धतीने मांडलेली आहे. जो कि जागतिक गतिशील आंतरकृती प्रारूप आहे. नार्थस प्रारूपाचे दोन भाग आहे. ज्यामध्ये प्रादेशिक एकात्मिक हवामान अर्थव्यवस्था प्रारूप (Regional Integrated Climate Economy - RICE) आहे. या प्रारूपानुसार आर्थिक वृद्धी प्रारूप आठ स्वतंत्र प्रदेशामध्ये घडून येते. तर सुलभ गतिशील एकात्मिक हवामान अर्थव्यवस्था प्रारूपानुसार (Simplified Dynamic Integrated Climate Economy - DICE) एकाच प्रदेशासाठी हे प्रारूप आहे. नार्थसच्या नुसार या दोन्ही प्रारूपाचा उपयोग होऊ शकतो. समांतरपणे याचा परिणाम व्यावसायिक उपयुक्त धोरणावर घडून येतात ही प्रारूपे सहाय्यकारी आहे. ते हवामान बदलाचे मूल्यांकन करून बाजार अर्थव्यवस्थेला मार्गदर्शक ठरतात. यामुळे कार्बन डायऑक्साईड उर्त्सजनाची पातळी संतुलित राहते. नॉर्थसच्या मते केवळ सामाजिक व्यय व लाभाच्या आधारे या वादप्रश्नाला संपूर्णपणे संबोधित केल्या जाऊ शकत नाही. ही यामधील वास्तविकता आहे. मानवी हा हवामानामुळे प्रभावित होतो तर समानपणे मानव आर्थिक कृतीमुळे हवामान प्रभावित होते.

**उच्चतम अनिश्चिता :**

नैसर्गिक शास्त्रे आणि सामाजिक शास्त्रे या दोन्हीशी हवामान बदलाचा संबंध आहे. हवामान बदलाच्या अनेक पैलूबाबत अनिश्चितता आहे. आपणास प्रत्यक्षात माहीत नाही की कशा प्रकारची संवेदनशीलता हवामानामध्ये आहे. ज्याअंतर्गत हरितवायूचे उर्त्सजन होत असते. यामध्ये जोखमी मोठ्या प्रमाणात आहे. हा एक महत्त्वाचा मुद्दा असून यामुळे हवामान अनियंत्रित होऊ शकते. आर्थिक आणि मानवी हानीच्या संदर्भात आपणास ज्ञानाची अपूर्णता असते. याचे कारणच हवामान बदल आहे. कार्बन कर म्हणजे कार्बन विरोधी (de-carbonisation) व्यय आहे. नार्थसच्या नुसार कार्बन उर्त्सजनाची तीव्रता कमी करणे यामध्ये अनिश्चिता आहे. याकरिता कार्बन उर्त्सजनाची कररूपी किंमत ठरविणे आवश्यक आहे. जो कि विविध संभाव्यतेला प्रभावित करतो. उच्चतम हवामान

संवेदनशीलता धोकादायक पातळीवर पोहचून जागतिक तापमान सरासरीने २°c ने वाढू शकते. जो की अत्यंत धोकादायक आहे.

**धोरणात्मक शिफारशी :**

नॉर्थसच्या संशोधनानुसार अगदी महत्त्वाचे कार्यक्षम उपाय समस्याशी संबंधित आहे. याचे कारण हरितगृह उत्सर्जन आहे. जागतिक योजना कार्बन कराची आहे. सर्व देशांवर त्याचा एकच भार (Uniformly impose) राहणार आहे. या शिफारशीची बांधणी परिणामावर आधारित राहील. याचे सुसूत्रीकरण ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञाद्वारे १९२० मध्येच झालेले होते. ज्याचे नाव ए.सी.पिगु होत. प्रत्येक उत्सर्जनकर्त्याला हानीचा सामाजिक व्यय द्यावा लागणार आहे. कार्बन उत्सर्जन योग्य किंमतीवर होणे आवश्यक आहे. जागतिक कार्बन उत्सर्जनाने व्यापार व्यवस्था निर्माण केलेली आहे. समान रोजगार निर्माण होण्यासाठी उत्सर्जनावर मर्यादेची तरतूद असणे आवश्यक आहे. ज्याची मांडणी कमी उत्सर्जन पातळीवर केल्या जाऊ शकते. कार्बन उत्सर्जनासाठी पुरेशी किंमत द्यावी लागली तर त्याचा उच्चतम परिणाम घडून येईल.

शिवाय कार्बन उत्सर्जनासाठी संख्यात्मक मापनाची तरतूद केल्या जाऊ शकत नाही. मात्र निर्णायकपणे कार्बन कर योग्य संख्यात्मक मापक आहे. कारण संख्यात्मक मापकाच्या आधारावरच या वादप्रश्नाची संवेदनशीलता ओळखता येते. जागतिक तापमान वाढ हा संवेदनशील वादप्रश्न असून कार्बन डाय ऑक्साईडवर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे. दीर्घकाळात हवामान बदल लक्षात घ्यावा लागणार आहे. हवामान बदलाद्वारे हानीचा विस्तार कोणत्या कारणामुळे झाला त्याचे अध्ययन होणे आवश्यक आहे. जागतिक हवामान धोरण राबवितांना रोजगार निर्मिती होणे आवश्यक आहे. धोरणात्मक विश्लेषण करतांना सुलभ गतिशील हवामान एकीकरण अर्थव्यवस्था प्रारूपानुसार चार धोरणे प्रस्तुत केलेली आहे. हवामान बदलाच्या मापनासाठी योग्य मापकाचा उपयोग होण्याची आवश्यकता आहे.

यामध्ये कार्बन उत्सर्जन आधिक्याने झालेले आहे. जो कि त्याचे विभाजन चार बाह्यदृष्ट्यामध्ये (Scenarios) दिसून येते. ज्याला रोखण्याचा मार्ग कार्बन कर आहे. याचा अर्थच उत्सर्जन मोठ्या प्रमाणात होत आहे. पहिल्या व दुसऱ्या बाह्य दुश्यानुसार 30 UDP/ Ton कार्बन उत्सर्जन गेल्या कालावधीत घडून आले तर तिसऱ्या आणि चवथ्या बाह्यदुष्यानुसार आधिक्याने कार्बन उत्सर्जन कपात घडवून आणायचे आहे. याकरिता कार्बन उत्सर्जनाच्या ६ ते ८ पट कार्बन कर लावण्याची आवश्यकता आहे.

**समारोप :**

पॉल रोमर आणि विल्यम नार्थस यांचे अर्थशास्त्रातील योगदान निर्णायक टप्प्यामधून पुढे गेलेले आहे. ते तंत्रज्ञान आणि हवामान बदलाच्या मध्यवर्ती वादप्रश्नांना संबोधते. या प्रश्नांचा सबंध भविष्यातील आर्द्रतेशी (humidity) संबंधित आहे. या दोन्ही संशोधकांनी जी पद्धती वास्तविकता आहे.

ती सध्याच्या आणि भविष्यातील हवामान बदलांना संबोधणारी आहे. यामध्ये सुधारणा केल्या जाऊ शकतात. यावर रोमर आणि नार्थस या दोन्ही संशोधकाचा भर आहे. यांच्या संशोधनाचा वापर केल्यास शाश्वत विकास व शाश्वत आर्थिक वृद्धी घडून येऊ शकते अशी मांडणी या दोन्ही

अर्थशास्त्रज्ञांनी केलेली आहे.

**संदर्भ सूची :**


1) Nordhaus W.D. (2015 ): The climate casino : Risk, uncertanity and economics for warming world, Yale University Press.
2) Nordhaus W.D. (2007) : Knowledge and Wealth of nations - A story of economic discovery, WW Norton & Comp.
3) Romer P.M. (1994 ) : The origins of endogenous growth, The journal of economic perspective Vol. -8, No. 1
4) Romer P.M. (1993 ) : Two strategies for Economic Development : Using ideas and producing ideas, World Bank.
5) Nordhus W.D. (2017) : Projection and Uncertainties about climate change in an era of minimal climate policies, NBER working paper, 22933.
6) Nordhaus W.D. (2018) : Evaluation of Modelling of Economics of global Warming :Change in the DICE Model 1992-2017, NBER working paper 2331.
7) Romer P.M. (1986) : Increasing return and long run growth, Journal of Political economy.
8) Romer P.M. (1990) : Endogenous Technological change, Journal of Political Economy.
9) Romer P.M. (1987) : Growth based on Increasing Return due to speculation, American Economic Review.


◆◆◆

# शिक्षण आणि स्वास्थ्य संदर्भातील भारत सरकारची अर्थसंकल्पीय धोरणे

**सोनल जनबंधू (मेश्राम)**
धनसावंगी (जि.जालना)

**प्रस्तावना :**

आर्थिक नीतीचा विचार करत असतांना कोणत्याही देशाच्या संदर्भात दोन महत्त्वपूर्ण घटकांचा प्रामुख्याने विचार करणे आवश्यक असते. आर्थिक धोरणामध्ये १) देशाचा आर्थिक विकास आणि २) मानवी कल्याण यांची सामाजिक क्षेत्राच्या दृष्टिकोनातून एक महत्त्वपूर्ण भूमिका असते. त्यामुळे या घटकांमध्ये संतुलन साधणे गरजेचे असते. असे संतुलन साधत असतांना 'शिक्षण' आणि 'आरोग्य' सुविधा ह्या श्रेत्रामध्ये मानवीय भांडवल गुंतवणूक ह्या तत्त्वाचा एक प्रमुख तत्त्व म्हणून विचार होणे गरजेचे आहे.

भारताने ''समता युक्त विकास'' याला केंद्रबिंदू मानून, भारतामध्ये आर्थिक धोरणे राबवण्यास सुरूवात केली. या अंतर्गत भारतामध्ये पसरलेली गरीबी मानवीय भांडवलात अधिकाधिक गुंतवणूक करून कमी करता येईल. भारत हा तरुणांचा देश आहे, अशी मान्यता जगभर भारताला मिळत आहे. एकीकडे ह्या तरुणांमुळे देशाला अनेक नवनवीन प्रकारच्या संधी उपलब्ध होत आहे सोबतच नवनवीन आव्हाने सुद्धा देशा समोर उभी राहत आहेत. भारत २०२० पर्यंत ह्या तरुणांच्या सामर्थ्यावर महाशक्ती बनू पाहत आहे. परंतु देशापुढील आव्हाने जसे – तरुणांना मिळणारे शिक्षण आणि कौशल्य, देशातील नागरिकांना मिळणारे पोषण, आहार, आरोग्य सुविधा, यासंदर्भात विचार होणे गरजेचे आहे. कारण ज्या तरुणांच्या बळकावर भारत महाशक्ती बनण्याचे स्वप्न बघतो आहे त्यांना योग्य प्रशिक्षण आणि स्वास्थ्य सुविधा उपलब्ध करून दिल्या नाहीत तर, तरूण आपल्या देशाच्या विकासात सहभाग नोंदवण्यास समर्थ ठरणार नाहीत. करिता, भारत सरकारने ह्या बाबीकडे अर्थसंकल्पामध्ये दिलेले लक्ष आणि देशाचा विकास होत असतांना संबंधित बाबीमध्ये झालेल्या अंमलबजावणीचा सखोल विचार व अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

**सामाजिक क्षेत्रातील खर्च प्रवृत्ती :**

सामाजिक क्षेत्रात बऱ्याच घटकांचा समावेश होतो. आम्ही आरोग्य आणि शिक्षण या दोन घटकांवर विशेष भर दिला आहे. कारण की शिक्षण व आरोग्य सारख्या सामाजिक व आधारभूत संरचनामध्ये गुंतवणूक करणे अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी अत्यंत गरजेचे असते. सामाजिक क्षेत्राच्या विकासाचा जास्तीत जास्त भाग राज्यघटनेच्या राज्यसूची अंतर्गत येतो. केंद्रसरकारही सामाजिक क्षेत्राच्या विकासामध्ये राज्यसरकारला मदत करत असते. खाली दिलेल्या तक्त्याचा विचार

केल्यास सामाजिक क्षेत्रातील खर्च प्रवृत्ती अधिक स्पष्ट होईल.

**तक्ता क्र. १**

**सामाजिक सेवाच्या विकासावर केंद्र सरकारचा खर्च**

(एकूण खर्चाच्या प्रतिशत)

| पद | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) सामाजिक सेवा | | | | | | | |
| क) शिक्षण, क्रीडा, युवक | ४.०२ | ४.२७ | ४.१५ | ४.५६ | ४.७३ | ४.३८ | ४.३८ |
| ख) स्वास्थ्य व परिवार कल्याण | २.०५ | २.०९ | २.०० | १.९८ | २.०२ | १.८१ | १.९९ |
| ग) जलपूर्ति आवास आदि | २.०२ | २.५४ | २.३९ | २.३५ | २.११ | १.८८ | २.२० |
| घ) एस.सी.एस.टी. आणि अन्य मागासवर्गीयाचा कल्याण | ०.३६ | ०.४१ | ०.४३ | ०.५८ | ०.६४ | ०.५४ | ०.६२ |
| ड) श्रम आणि रोजगार | ०.२७ | ०.३८ | ०.२२ | ०.२४ | ०.२६ | ०.२६ | ०.२९ |
| प) सूचना आणि प्रसारण | ०.२२ | ०.२३ | ०.२० | ०.२१ | ०.१९ | ०.१८ | ०.१७ |
| छ)समाज कल्याण आणि पोषणहार | ०.८२ | १.१५ | ०.८७ | १.०१ | १.२८ | १.१३ | १.२१ |
| ज) पूर्वोत्तर क्षेत्र | ० | ० | ०.०२ | ०.०२ | ०.०१ | १.५६ | १.८० |
| झ) अन्य सामाजिक सेवा | १.२९ | १.५५ | १.६७ | १.६७ | ०.२० | ०.१९ | ०.१६ |
| एकूण | ११.०६ | १२.५२ | ११.९४ | १२.६१ | ११.४३ | ११.९३ | १२.८३ |
| २) ग्रामीण विकास | २.८० | ४.५६ | ३.७७ | ३.५१ | २.८८ | २.४९ | २.५७ |
| ३) प्रधानमंत्री ग्राम सडक योजना | ०.९१ | ०.८८ | १.११ | १.८७ | १.४८ | ०.७० | १.३० |
| ४) सामाजिक सेवाएँ ग्रामीण विकास आणि प्र.ग्रा.संयोजन | १४.७७ | १७.९५ | १६.८२ | १८.०० | १५.७९ | १५.१२ | १६.७० |

(स्त्रोत : अंदाजपत्रक व आर्थिक सर्वेक्षण २००७-०८ ते २०१३-१४)

वरील तक्त्यानुसार सामाजिक क्षेत्रामध्ये केंद्र सरकारचा खर्च पाहिला तर, लक्षात येते की, २००७-०८ मध्ये हा खर्च १४.७७ प्रतिशत होता. २०१०-११ मध्ये हा खर्च वाढून १८ प्रतिशत पर्यंत झाला. त्यानंतर २०१३-१४ मध्ये खर्चात घट होऊन तो १६.७० प्रतिशत पर्यंत झाला. केंद्र सरकारचा फक्त सामाजिक क्षेत्रामधील सेवांवर झालेल्या खर्चाचा विचार केल्यास तो २००७-०८ मध्ये ११.०६ प्रतिशत झालेला दिसून येतो. २००८-०९ मध्ये जागतिक वित्तीय संकटामुळे व देशातील विपरीत वित्तीय परिस्थितीमुळे सामाजिक क्षेत्रावर झालेला खर्च कमी दिसतो. २०११-१२ मध्ये परत युरो संकटामुळे सामाजिक क्षेत्राच्या खर्चामध्ये परिणाम झालेला दिसतो. तथापि २०१३-१४ मध्ये त्यात १२.८३ प्रतिशत पर्यंत वाढ झालेली दिसून येते.

**केंद्र व राज्य सरकारची सामाजिक क्षेत्रावरील खर्च प्रवृत्ती :**

केंद्र सरकार व राज्यसरकार मिळून सामाजिक क्षेत्रातील खर्चाचे विश्लेषण खालील तक्त्याचे साहाय्याने केले आहे. तक्त्यात शिक्षण, आरोग्य आणि अन्य या संज्ञांचा वापर करण्यात आला आहे. याचा अर्थ असा की शिक्षण खर्चामध्ये शिक्षण, क्रीडा, कला व संस्कृतीचा समावेश आहे. आरोग्य खर्चामध्ये चिकित्सा व लोक स्वास्थ्य,

परिवार कल्याण व जलपूर्ति, स्वच्छतेवर केला जाणारा खर्च आहे. अन्य या पदा अंतर्गत आवास, शहरी विकास, एस.सी., एस.टी. व इतर मागासवर्गीय जातीचे कल्याण, श्रम व श्रम कल्याण, सामाजिक सुरक्षा व कल्याण पोषण, प्राकृतिक आपदा संदर्भीत बचाव कार्य इत्यादीचा समावेश केला जातो.

केंद्र व राज्य शासनाद्वारे सामाजिक क्षेत्रातील सेवांवर सकल घरेलू उत्पादनाच्या अनुपादित खर्चात वाढ झालेली दिसून येते. २००७-०८ मध्ये ५.९१ प्रतिशत खर्च सामाजिक क्षेत्रातील सेवांवर करण्यात आले. यानंतरच्या काळामध्ये (२००८-०९ ते २०१४-१५) सामाजिक क्षेत्रातील सेवांमधील खर्च ६ प्रतिशत च्या जवळपास राहिला. २०१५-१६ ते २०१६-१७ मध्ये क्रमश: संशोधित अनुमान व अर्थसंकल्पीय अनुमानानुसार १ प्रतिशतची वित्तीय खर्चात वाढ दिसून येते. शिक्षण क्षेत्रामधील खर्चाची तपशील बघितल्यास, साधारणपणे २००७-०८ मध्ये २.५९ प्रतिशत वित्तीय खर्च शिक्षणावर करण्यात आला. २००७ ते २०१७ या कालावधीत शिक्षण क्षेत्रामध्ये वित्तीय खर्चात वाढ झालेली दिसून येते. २०११-१२ मध्ये ६.६ प्रतिशत आणि २०१६-१७ अंदाजपत्रकीय अनुमानानुसार ७.४ प्रतिशत वित्तीय खर्च झालेला दिसून येतो. आरोग्य सेवांचा विचार केल्यास, सकल घरेलू उत्पादनाच्या वित्तीय खर्च २००७-०८ मध्ये १.२७ प्रतिशत. २०११-१२ मध्ये २.२ प्रतिशत व २०१६-१७ मध्ये ३.२ प्रतिशत असे वाढलेला दिसून येतो. अन्य बाबी मध्ये वित्तीय खर्च हा सकल घरेलू उत्पादनाच्या प्रमाणात २००७-०८ मध्ये २.०५ प्रतिशत, २०११-१२ मध्ये २.२ प्रतिशत आणि २०१६-१७ मध्ये २.०८ प्रतिशत वाढलेला दिसून येतो.

**तक्ता क्र. २**

**सामान्य सरकार (केंद्र व राज्य) द्वारा सामाजिक सेवांवर खर्चाची प्रवृत्ती**

| पदे | २००७-०८ | २००९-१० | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|
| एकूण व्यय (करोड रू.) | १३१५२८३ | १८५२११९ | ३२८५२१० | ३९७४१०३ | ४४४८८६० |
| सामाजिक सेवांवर खर्च (करोड रू.) | २९४५८३ | ४४६३८२ | ७६७६२२ | १००२५९१ | १००२५९१ |
| यात १) शिक्षा (करोड रू.) | १२९३६६ | १९७०७० | ३५३५८० | ४२३१७१ | ४७४६७२ |
| २) आरोग्य (करोड रू.) | ६३२२६ | ८८०५४ | १४८७९१ | १९११४१ | २२१४६६ |
| ३) अन्य (करोड रू.) | १०१९९१ | १६१२५८ | २६५२४२ | ३८८२७९ | ४२१९५५ |
| एकूण खर्च (प्रतिशत) | २६.३७ | २८.६ | २६.४ | २९.१ | २९.५ |
| सामाजिक सेवांवर खर्च (प्रतिशत) | ५.९१ | ६.९ | ६.२ | ७.३ | ७.४ |
| यात १) शिक्षा | २.५९ | ३.० | २.८ | ३.१ | ३.२ |
| २) आरोग्य | १.२७ | १.४ | १.२ | १.४ | १.५ |
| ३) अन्य | २.०५ | २.५ | २.१ | २.८ | २.८ |
| सामाजिक सेवांवर खर्च (प्रतिशत) | २२.४ | २४.१ | २३.४ | २५.२ | २५.१ |
| यात १) शिक्षा | ९.८ | १०.६ | १०.८ | १०.६ | १०.७ |
| २) आरोग्य | ४.८ | ४.८ | ४.५ | ४.८ | ५.० |
| ३) अन्य | ७.८ | ८.७ | ८.१ | ९.८ | ९.५ |
| १) शिक्षा | ४३.९ | ४४.१ | ४६.१ | ४२.२ | ४२.५ |
| २) आरोग्य | २१.५ | १९.७ | १९.४ | १९.१ | १९.८ |
| ३) अन्य | ३४.६ | ३६.१ | ३४.६ | ३८.७ | ३७.६ |

(स्त्रोत : केंद्र व राज्य सरकार आणि भारतीय रिझर्व बँकेचे बजट प्रपत्रे)

एकूण खर्चाच्या प्रमाणात सामाजिक क्षेत्रामधील सेवांवरील वित्तीय खर्च २००७-०८ मध्ये २२.४ प्रतिशत, २०१३-१४ मध्ये २५.२ प्रतिशत व २०१६-१७ मध्ये अर्थसंकल्पीय अनुमानानुसार २५.० प्रतिशत पर्यंत वाढलेला दिसतो. केवळ २०१४-१५ मध्ये यात घट झालेली दिसते. एकूण खर्चाच्या प्रमाणात शिक्षणावरील खर्च हा २००७-०८ ते २०१३-१४ या कालावधीत ९.८ प्रतिशत ते ११.६ प्रतिशत पर्यंत वाढत गेलेला. परंतु नंतरच्या कालावधीत शिक्षणावरील होणाऱ्या वित्तीय खर्चामध्ये घट झालेली दिसून येते. २०१६-१७ मध्ये अर्थसंकल्पीय अनुमानानुसार १०.७ प्रतिशत वित्तीय खर्च शिक्षणावर झाल्याचे दर्शविण्यात आले. आरोग्य सेवांसाठी २००७-०८ मध्ये वित्तीय खर्च ४.८ प्रतिशत दिसून येतो. नंतरच्या काळात त्यामध्ये वाढ होऊन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पीय अनुमानानुसार ५.०० प्रतिशत पर्यंत आरोग्यावरील वित्तीय खर्च करण्यात आला. त्यामुळे नंतरच्या काळात वाढ होऊन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पीय अनुमानानुसार वित्तीय खर्चामध्ये ९.५ प्रतिशत वाढ झाल्याचे दिसते.

सामाजिक क्षेत्रासाठी केल्या जाणाऱ्या खर्चापैकी शिक्षणावर २००७-०८ मध्ये ४३.९ प्रतिशत वित्तीय खर्च केला गेला. शिक्षणावरील वित्तीय खर्च प्रमाणात २०११-१२ पर्यंत ह्यामध्ये वाढ होत गेली. नंतरच्या काळात वित्तीय खर्च प्रमाणात घट होतांना दिसते. २०१६-१७ मध्ये अर्थसंकल्पीय अनुमानानुसार ४२.५ प्रतिशत खर्च करण्यात आला. आरोग्य क्षेत्रामध्ये २००७-०८ मध्ये २१.५ प्रतिशत खर्च झालेला दिसून येतो. नंतरच्या काळात २०१६-१७ मध्ये १९.८ प्रतिशत पर्यंत खर्चामध्ये घट झालेली दिसून येते. अन्य बाबीवरील वित्तीय खर्चामध्ये चढ-उताराची प्रवृत्ती दिसून येते. २००७-०८ मध्ये ३४.०६ प्रतिशत तर २०११-१२ मध्ये ३३.३ प्रतिशत खर्च करण्यात आला. नंतरच्या काळात अन्य बाबींवर झालेल्या खर्च ३७.७ प्रतिशत पर्यंत वाढलेला दिसून येते.

**आरोग्य :**

भारतासारख्या विशाल देशात मुख्यत्वे निर्धन आणि साधर्नाविहीन लोकांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे हे एक आव्हानात्मक कार्य आहे. देशातील सर्व वयोगटातील लोकांना स्वस्थ्य जीवन जगणे, त्यांना आरोग्य विषयक सोई सुविधा प्रदान करणे याकरिता सरकार नेहमी कटिबद्ध असते. एक स्वस्थ्य व कार्यक्षम पिढी निर्माण करण्यासाठी सरकार या बाबीकडे प्रामुख्याने लक्ष पुरवत असते. साधारणपणे २०३० पर्यंत यांसदर्भातील धेय पूर्ण करण्याचे आव्हान सरकार पुढे आहे. या ध्येयाला पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारने ''राष्ट्रीय स्वास्थ्य धोरण-२०१७'' यासंदर्भात एक आराखडा तयार केला आहे. यानुसार सर्वोत्तम स्तरावरील सर्वोच्च स्वास्थ्य स्थिती प्राप्त करणे राष्ट्रीय स्वास्थ्य धोरणाचे उद्दिष्ट आहे. यासोबतच गुणवत्तापूर्ण स्वास्थ्य सुविधा कोणत्याही आर्थिक समस्यांचा सामना न करता देशातील प्रत्येक नागरिक पर्यंत पोहचवण्याचे उद्दिष्ट सरकार पुढे आहे.

आरोग्य संदर्भातील काही सूचकांकाची प्रगती प्रभावपूर्ण दिसून येते. असंशोधित (crude) जन्म दर (प्रति हजार) यासंदर्भातील विचार केल्यास २००७ मध्ये हा दर २३ प्रतिशत दिसून येतो. २००७ च्या तुलनेत हाच असंशोधित जन्म दर २०१२ मध्ये कमी होऊन २१.६ प्रतिशत पर्यंत

आलेला दिसतो. २०१५ मध्ये तो २०.८ पर्यंत आलेला दिसून येतो. असंशोधित मृत्यूदराचा विचार केल्यास २००७ मध्ये हा दर ७.४ प्रतिशत, २०१२ मध्ये ७.०० प्रतिशत आणि २०१५ मध्ये ६.५ प्रतिशत अशाप्रमाणे कमी झालेला दिसून येतो. महत्त्वपूर्ण बाब अशी की, भारताची एकूण जननक्षमता (TFR) कमी होत आहे. २००७ मध्ये भारताची एकूण जननक्षमता २.७६ प्रतिशत, २०१२ मध्ये २.४ आणि २०१५ मध्ये २.३ या प्रमाणे कमी-कमी होत असल्याचे दिसते. यासंदर्भात भारतीय राज्यांचा विचार केल्यास, वेगवेगळ्या राज्यांमध्ये असंशोधित जन्मदर असंशोधित मृत्यूदर व एकूण प्रजननदरांमध्ये तफावत दिसून येते. परिणामस्वरूप भारतीय लोकसंख्या वाढण्याचा दर कमी होईल. अशा प्रकारचे निष्कर्ष काढता येऊ शकतात.

सरकार 'सहस्त्राब्दी विकास लक्ष्य (MDG) यासंदर्भातील उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या मार्गावर आहे. मातृत्व मृत्यू प्रमाण (MDG) लक्ष्य (१,००,००० प्रति) १४० आहे. भारताचा २०१० ते २०१२ या कालावधीत मातृत्व मृत्यू अनुपात १७८ व २०१५ मध्ये १४१ पर्यंत पोहचलेला आहे. शिशू मृत्युदरसाठी चे लक्ष्य ४२ आहे. हे लक्ष्य भारतानी २०१५ मध्येच गाठलेले आहे. ही महत्त्वपूर्ण बाब आहे. तरीही आणखीन प्रयासाची गरज आहे. आणि उपयुक्त सुचकांकात सुधारणा घडून आणायची असेल तर पाणी, स्वच्छता, आरोग्य, पोषणआहार याचे कडे लक्ष देण्याची गरज आहे.

पाणी स्वच्छता, आरोग्य आणि पोषण याचा सहसंबंध मानवकल्याणाशी असतो. दूषित पिण्याचे पाणी, मानवीय मलमूत्राची अयोग्य पद्धतीने केलेली विल्हेवाट, वैयक्तिक व खाद्य स्वच्छतेची कमतरता, घन आणि द्रव कचऱ्याची केलेली अयोग्य विल्लेवाट इत्यादी बाबी भारतात पसरणाऱ्या आजाराची प्रमुख कारणे आहेत. भारत सरकारने या बाबत जनजागृती करण्यासाठी २०१४ मध्ये स्वच्छ भारत अभियानास सुरूवात केली. या अभियानाचे मुख्य उद्देश्य

१) सर्व ग्रामीण कुटुंबांना शौचालय व्यवस्था पुरवणे.
२) स्वच्छतेस प्रोत्साहन देण्यासाठी ग्रामपंचायतीद्वारे घन व द्रव्य कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी योजना तयार करणे.
३) उघड्यावरील हागणदारी पासून प्रामुख्याने सुटका मिळवणे. २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत भारताला उघड्यावरील हागणदारी पासून मुक्त करायचे लक्ष आहे.

ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यामध्ये बदल घडवून आणण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना अन्तर्गत सर्व राज्य, दूरस्थ गावे, पहाडी क्षेत्र व जिथे वीज उपलब्ध नाही अशा ठिकाणीही पिण्याच्या पाण्याची उपलब्धता करून देण्याचे लक्ष्य आहे. २०१६-१७ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार २०,००० सौरऊर्जा आधारित जलपूर्ती योजनांना भारत सरकारने मान्यता दिली आहे. भारतामध्ये पिण्याच्या पाणीसंदर्भात असलेल्या समस्यांना उत्तर देण्यासाठी अशा योजना राबविणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात ही समस्या उग्ररूप धारण करत आहे. सरकारी आकडेवारी नुसार असे आढळून येते की, देशात २००० ब्लॉक असे आहेत की जिथे भूजल पातळी अधिकच खालावलेली आहे. भारत सरकारने ग्रामीण भागातील जलसंकटावर मात करण्यासाठी ''राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम'' आणि ''हर घर जल'' या

सारख्या योजनांची अंमलबजावणी करणे सुरू केले आहे. सरकारने 'हर घर जल' योजनेसाठी २३,००० कोटी रू. ची तरतूद केली आहे.

मार्च २०१६-१७ मध्ये जेव्हा ''राष्ट्रीय पेयजल योजना'' ची सुरूवात करण्यात आली तेव्हा यामध्ये राज्यांनाही समाविष्ट करून निर्देश देण्यात आले. राष्ट्रीय पेयजल योजनेने काही राज्यात चांगले प्रदर्शन केले व काही राज्य मागे राहिले. या योजनेला अधिकाधिक प्रभावशाली बनविण्यासाठी व राज्यांना गतिशीलता देणे व योजनेचे पूर्नगठन करण्यासाठी केंद्रीय स्वच्छता व पेयजल मंत्रालय राज्यासोबत संवाद साधत आहे. 'राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम' साठी सरकार द्वारा किती खर्च करण्यात आला याचा स्पष्टीकरण खालील तक्त्याद्वारा करता येईल.

**तक्ता क्र. ३**

**राष्ट्रीय ग्रामीण पेजयल कार्यक्रम**

(National Rural Drinking Water Policy)

| अ. क्र. | वर्ष | बजट अनुमान | संशोधित अनुमान | खर्च (प्रत्यक्ष) | संशोधित अनुमानाच्या तुलनेत खर्च प्रतिशत |
|---|---|---|---|---|---|
| १ | २००७-०८ | ६५०० | ६४०० | ६४४२.७६ | १००.७२ |
| २ | २००८-०९ | ७३०० | ७३०० | ७२९८.७९ | ९९.९८ |
| ३ | २००९-१० | ८००० | ८००० | ७९८९.७४ | ९९.८७ |
| ४ | २०१०-११ | ९००० | ९००० | ८९८६.७४ | ९९.८५ |
| ५ | २०११-१२ | ९३५० | ८५०० | ८४९३.१५ | ९९.९१ |
| ६ | २०१२-१३ | १०५०० | १०५०० | १०४८९.०५ | ९९.९० |
| ७ | २०१४-१५ | ११००० | ९७०० | ९६९७.२७ | ९९.९७ |
| ८ | २०१५-१६ | ११००० | ९२५० | ९२४२.७६ | ९९.९२ |
| ९ | २०१६-१७ | २६११ | ४३७३ | ४३६९.५५ | ९९.९२ |
| १० | २०१६-१७ | ५००० | - | ३३९७.६५ | ६७.९५ |

स्रोत : Annual Report 2013-14 and 2015-16 Govt.of India, Ministry of Drinking Water and Sanitation.

**राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांसाठी (NRDWP-National Rural Drinking Water Policy) :**

२००७-०८ मध्ये NRDWP साठी ६५०० कोटी रू. बजट अनुमान लावण्यात आले. संशोधित अनुमान ६४०० कोटी रू. वास्तविक खर्च संशोधित अनुमानाच्या तुलनेत जास्त करण्यात आला. २०११-१२ मध्ये ९३५० कोटी रू. बजट अनुमान व संशोधित अनुमान ८५०० कोटी रू च्या तुलनेत वास्तविक खर्च ९९.९१ केला गेला. २०१६-१७ चे आकडे हे ३१.१२.१६ पर्यंतचे आहे. या वर्षी ५००० कोटी रू. बजट अनुमान व वास्तविक खर्च ३३९७.६५ कोटी रू. केला गेला अर्थात ६७.९५ प्रतिशत केला गेला.

**शिक्षण :**

जगभरात भारत आपली ओळख ज्ञान-आधारित अर्थव्यवस्था म्हणून बनवत आहे. गुणवत्ता आणि सुसंगत शिक्षण आर्थिक विकासात महत्त्वाची

भूमिका बजावत असतात. शिक्षण हे भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला दिलेला अधिकार आहे. भारतात असलेल्या लोकसंख्येचा फायदा देशाला मिळावा याकरिता गुणवत्तापूर्व शिक्षण प्रत्येक नागरिकांना मिळणे आवश्यक आहे. सोबतच कौशल्य विकासाच्या संधीही प्राप्त होणे आवश्यक आहे. अगदी सुरूवाती पासूनच शिक्षणासंदर्भातले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी भारत सरकार प्रयत्न करत आहे. भारतात प्राथमिक शिक्षण प्रमाण वाढविण्यासाठी सर्व शिक्षा अभियान महत्त्वपूर्ण आहे. मध्यान्ह भोजन योजना कार्यक्रमाच्या माध्यमातून सरकार शिक्षणाचा विकास करण्याचे कार्य करत आहे.

**प्राथमिक शिक्षण :**

मुलांच्या भविष्याचा पाया प्राथमिक शिक्षणाद्वारे रचला जातो. त्यामुळेच प्राथमिक शिक्षण हे व्यक्तीच्या जडणघडणीमध्ये फार महत्त्वाचा टप्पा असतो. भारत सरकारने प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व ओळखून शिक्षणाला मूलभूत अधिकाराच्या श्रेणीमध्ये स्थान दिले आहे. वर्ष २००५ मध्ये प्रथमच 'प्रथम शिक्षा फाऊंडेशन' द्वारा 'एन्युअल स्टेटस अॅन्ड फाऊंडेशन रिपोर्ट' मध्ये भारताच्या ग्रामीण भागातील शालेय शिक्षण संबंधित रिपोर्ट प्रस्तुत केला. यातून भारतातील प्राथमिक शिक्षण आणि शिक्षणासमोरील अडचणी आणि त्याच्या परिणामाचा अभ्यास केला आहे.

अखिल भारतीय स्तरावर ASER - 2016 अनुसार २०१४ ते २०१६ याकालावधीत सर्व स्तरामधील नामांकनात आंशिक वाढ झालेली दिसून येते. २०१४ मधील यामध्ये ६-१४ या वयोगटातील नामांकन ९६.७% वरून २०१६ मध्ये ९६.९% पर्यंत वाढलेले दिसून येते. १५-१६ या वयोगटातील नामांकन २०१४ मध्ये ८३.४% वरून २०१६ मध्ये ८४.७% पर्यंत वाढलेले दिसते. काही राज्यांमध्ये शाळाबाह्य मुलाचे प्रमाण (६-१४ वयोगटातील) २०१४ च्या तुलनेत प्रमाणात २०१६ मध्ये वाढलेले दिसते. शाळाबाह्य मुलांच्या प्रमाणात भारतातील वेगवेगळ्या राज्यामध्ये तफावत आढळून येते. जसे (२०१४ च्या तुलनेत २०१६) मध्यप्रदेश (३.४ वरून ४.४%), छत्तीसगढ (२% वरून २.८ %) आणि उत्तर प्रदेश (४.९% वरून ५.३%). २०१४ ते २०१६ च्या काळात शाळेत जाणाऱ्या मुलींचे प्रमाण ( ६ ते १४ वयोगट) राजस्थान (९.७%), उत्तरप्रदेश (९.९%) मध्यप्रदेश (८.८%) अर्थात ८% नी वाढलेला आहे.

'' The Right of Children Free and Compulsory Act 2009'' मुळे संपूर्ण देशात प्राथमिक शिक्षण नामांकनात सुधारणा झालेली दिसून येते. तथापि असे असले तरी गुणवत्तेत योग्य प्रमाणात सुधारणा झाली नाही. म्हणून शिक्षणाच्या आदान प्रदान प्रक्रियेवर लक्ष देणे गरजेचे आहे.

**सर्व शिक्षा अभियान :**

या योजनेला राबवण्याच्या मुख्य उद्देश्य मुळातच तळागळापर्यंत शिक्षण पोहचवणे आणि अशिक्षित असलेल्या व्यक्तीला समाजात शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा आहे. या योजनेपूर्वीही शिक्षण क्षेत्राचा आणि त्या माध्यमातून देशाच्या जनतेच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकास करणे या उद्देश्यपूर्तीसाठी अनेकविध योजना बनविण्यात आल्या. त्यातून शिक्षण संदर्भातील बरेच उद्देश्य पूर्णही झाले आहेत. परंतु म्हणावी तशी प्रगती झाली नाही. म्हणूनच प्राथमिक व माध्यमिक

शिक्षणासंदर्भात सरकारने अधिक सुधारणा घडवून आणण्यासाठी 'सर्व शिक्षा अभियान' या योजनेचा शुभारंभ नवव्या पंचवार्षिक योजनेमध्ये झाला.

सर्व शिक्षा अभियानामार्फत शाळा व विद्यालयामध्ये संरचनात्मक सुविधेत सुधारणा झालेली दिसून येते. पण काही राज्यामध्ये अजूनही अशा संरचनात्मक सुधारणेचा अभाव दिसून येतो. या सर्व शिक्षा अभियानातून शाळांना पक्क्या इमारतीची सुविधा पोहचविणे, शिक्षण साहित्य उपलब्ध करणे, शाळेत स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, शाळेत शौचालय बांधणे, मुला-मुलींसाठी स्वच्छतेच्या वेगवेगळ्या सुविधा पुरविणे अशा सुविधांमध्ये २०१६-१७ पर्यंत सरकारला एक सीमेपर्यंत यश प्राप्त झाले आहे. जसे हिमाचल प्रदेशच्या काही शाळा सोडून सर्व शाळेत ब्लॅक बोर्डची सुविधा उपलब्ध आहे. ८८% शाळेच्या इमारती सर्व हंगामा मध्ये पक्क्या आहेत. राजस्थानच्या काही शाळा वगळून सर्व शाळेत पिण्याच्या पाणीची सुविधा आहे. ८२% शाळेत शौचालय सुविधा उपलब्ध आहेत. यात ही ५०% शाळेत मुलींसाठी वेगळे शौचालय आहे. परंतु, आसम, बिहार, हिमाचल प्रदेश, राजस्थान आणि तामिळनाडूत संरचंना संबंधित अभाव दिसून आले आहेत. शहरी क्षेत्राच्या झोपडपट्यांमध्ये ८२% शाळेत पिण्याच्या पाण्याची सुविधा आहे. परंतु फक्त ४०% शाळेत मुलींसाठी वेगळी शौचालये आहेत.

**तक्ता क्र. ४**

**मध्यान्ह भोजन योजनेसाठी सरकारी खर्च (कोटी रू.)**

| वर्ष | बजट अनुमान | संशोधित अनुमान | वास्तविक खर्च |
|---|---|---|---|
| २००७-०८ | ७३२४.०० | ६६७८.०० | ५८३५.४४ |
| २००८-०९ | ८०००.०० | ८०००.०० | ६५३९.५२ |
| २००९-१० | ८०००.०० | ७३५९.१५ | ६९३७.७९ |
| २०१०-११ | ९४४०.०० | ९४४०.०० | ९१२८.४४ |
| २०११-१२ | १०३८०.०० | १०२३९.०१ | ९९०१.९१ |
| २०१२-१३ | ११९३७.०० | ११५००.०० | १०८६७.९० |
| २०१३-१४ | १३२१५.०० | १२१८९.१६ | १०९२७.२१ |
| २०१४-१५ | १३२१५.०० | ११०५०.९० | १०५२६.९७ |
| २०१५-१६ | ९२३६.४० | ९२३६.४० | ९१५१.५५ |
| २०१६-१७ | ९७००.०० | ९७००.०० | ९४८३.४० |
| २०१७-१८ | १००००.०० | - | ९०९५.८१ |
| २०१८-१९ | १०५००.०० | - | ५३३२.९५ |

Source : mdm.nic.in

उपरोक्त तक्त्यानुसार अस लक्षात येते की मध्यान्ह भोजन योजनेसाठी सरकारी खर्च सातत्याने वाढत आहे. वर्ष २००७-०८ मध्ये बजट अनुमान ७३२४.०० कोटी रू. होता व वास्तविक खर्च ५८३५.४४ कोटी रू. करण्यात आला. संशोधित अनुमानाच्या ८७% खर्च करण्यात आले. २०१२-१३ मध्ये संशोधित अनुमान ११५०० कोटी रू. व वास्तविक खर्च संशोधित अनुमानाच्या ९४.५०% होता. २०१८-१९ मध्ये बजट अनुमान १०५०० कोटी रू. व वास्तविक खर्च पहिल्या ६ महिन्यांमध्ये

५२३२.९५ कोटी रू. अर्थात बजट अनुमानाच्या ५१% खर्च करण्यात आले.

**माध्यमिक शिक्षण :**

माध्यमिक शिक्षण उच्च शिक्षणाची पायरी आहे. माध्यमिक शिक्षणामधून श्रमबाजारास आवश्यक असणारे कौशल्य दिले जाते. माध्यमिक स्तरावर शिक्षणाची पोहच वाढवण्यासाठी व शिक्षणात गुणवत्ता सुधार करण्यासाठी सरकार द्वारा 'राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान' सुरू करण्यात आले. या अभियानामार्फत प्रत्येक रहिवासी क्षेत्रात एक माध्यमिक शाळा उघडून वर्ग ९ ते १० मध्ये विद्यार्थी संख्या वाढवणे, सर्व माध्यमिक शाळेमध्ये ठरवलेल्या मापदंडनुसार शैक्षणिक व्यवस्था पुरवणे, माध्यमिक स्तरावरील गुणवत्तेत सुधारणा करणे, लैंगिक, सामाजिक व आर्थिक समस्या शिक्षणाच्या मार्फत दूर करणे, असे उपक्रम राबविले जातात.

माध्यमिक शाळेसंदर्भातील अखिल भारतीय स्तरावर सकल नामांकन अनुपात (GER) फक्त ८०% आहे. माध्यमिक स्तरावरील ( १२ वी धरून) सकल नामांकन अनुपात २०११-१२ मध्ये ५६.८% वरून २०१४-१५ मध्ये ६५.३% पर्यंत वाढला. तसेच शाळा मध्येच सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. यातही अनुसूचित जनजातीच्या विद्यार्थ्यांचे प्रतिशत शाळा सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्यांत जास्त आहे. अखिल भारतीय स्तरावर विद्यार्थ्यांचे प्रमाण १७.१ प्रतिशत आहे व अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे प्रमाण २५% आहे.

ओडिसा राज्यात मध्येच शाळा सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रमाण ३०% आहे. यावर नियंत्रण करण्यासाठी हस्तक्षेपाची गरज आहे. तसेच बिहार राजस्थान, त्रिपुरा, मणिपूर, मिजोराम, मध्यप्रदेश, असम, मेघालय, अरूणाचल प्रदेश, झारखंड, नागालैंड मध्ये माध्यमिक शाळांचा धारणा दर (Retension rate) ५०% आहे. अखिल भारतीय स्तरावर माध्यमिक शाळेचा प्रतिधारण ४२.५७ आहे. यावरून असे लक्षात येते की शिक्षणासंबंधीत धोरणात व अंमलबजावणीत सुधारणेची गरज आहे.

सर्व स्तरातील प्रगती संदर्भातील माहिती, उणिवा, त्यांच्या समाधान संदर्भातील उपाय योजना इत्यादी कडे लक्ष्य देण्याची गरज आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर GER, NER, दर वाढविणे गरजेचे आहे. आतापर्यंत शालेय शिक्षणात भौतिक सरचनेवर जास्त लक्ष दिले आहे. परंतु भौतिक संरचनेच्या क्षमतेपेक्षा कमी वापर केला जात आहे. त्यामुळे या अवसरचनेचा जास्तीत जास्त वापर कसा करता येईल याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

भारताची उच्च शिक्षण प्रणाली हे जगातील युनाइटेड स्टेट व चीन नंतर तिसरी सर्वात मोठी शिक्षण प्रणाली आहे. भारतात लगातार विश्वविद्यालयांची संख्या वाढत आहे. सोबत विद्यार्थ्यांच्या संख्येत सुद्धा वाढ होत आहे.

विद्यार्थ्यांच्या नामांकन मधील ५ वर्षात अर्थात २०१२-१३ मध्ये ३,०१,५२,४१७ वरून २०१६-१७ मध्ये ३,५७,०५,९०५ पर्यंत वाढला. या २०१२-१३ ते २०१६-१७ या पाच वर्षाच्या कालावधीत १८.३% नी विद्यार्थी संख्येत वाढ झाली. पाच वर्षात CAGR (Compound Annual Growth Rate) हे ३.४ होते व इन्टीग्रेड कोर्सचे CAGR हे १२.९ होते. अर्थात उच्च शिक्षणाच्या संदर्भात सांगता येईल की विश्वविद्यालयाची संख्या

व विद्यार्थी संख्येत वाढ होतांना दिसून येते. परंतु श्रम बाजाराच्या विविध क्षेत्राच्या मागणीनुसार पुरवठा होत नाही याचा अर्थ असा की कौशल्यामध्ये भारत कुठ तरी मागे राहत आहे. उच्च शिक्षित असले तरी बेरोजगारी दर अधिक आहे. मला असे वाटते की, उच्च शिक्षणाच्या परिमापकांमध्ये बदल करण्याची गरज आहे. केवळ महाविद्यालय, विश्वविद्यालय संख्या वाढून चालणार नाही तर विद्यार्थ्यांना रोजगार प्राप्त होईल असे शिक्षण देणे गरजेचे आहे.

**समारोप :**

सामाजिक क्षेत्राच्या खर्चमध्ये वाढ होतांना दिसून येते. सामांजिक क्षेत्रात मुख्यत्वे शिक्षण व आरोग्याचा विचार केला गेला आहे. शैक्षणिक क्षेत्रात शासनानी केलेली प्रगती चांगली आहे, पण तरी ही साक्षरता दर वाढविणे शिक्षणाचा हेतू नसावा तो शिक्षित व्यक्तीला रोजगार प्राप्त करून देण्याच्या असावा. देशाच्या विकासात व्यक्तीची भूमिका महत्त्वपूर्ण असते. व्यक्ती हा निरोगी असणे गरजेचे आहे. आरोग्य क्षेत्रासाठीही सरकारने योजना राबविल्या आहेत. त्याची सर्व भागात योग्य अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. शासनानी शिक्षण आणि आरोग्य वर बराच खर्च केला आहे. किन्तु जेव्हा आपण विकसित देशाच्या खर्चाकडे पाहतो तर लक्षात येते की त्याच्या तुलनेत आपण मागे आहोत. अर्थात या क्षेत्राच्या विकासासाठी योग्य पावले उचलण्याची गरज आहे की जेणेकरून ती पोकळी भरून निघेल.

**संदर्भ सूची :**


१) आर्थिक सर्वेक्षण वर्ष २००७-०८ ते २०१७-१८.
२) बजट - २००७-०८ ते २०१७-१८.
3) All India Survey on higher education 2016-17.
4) Annual report 2013-14 and 2015-16. Govt. of India Ministry of Drinking Water and Sanitation.
5) National Health Accounts Estimates for India, Oct. 2017.
6) Health Sector Financing by Centre and States / UTs in India.
7) www.mdws.gov.in


◆◆◆

# The Role Of Maharashtra Rajya Itar Magas Vargiya Vitta Ani Vikas Mahamandal Schemes for the Economic Development Of Women in the Amravati City

**Prashant Katole**
H.O.D. of Economics,
Smt. Kesharbai Lahoti College,Amravati.(M.S)

**Introduction :**

As women in India, the society is changing a lot in terms of acceptance, the many roles of women as professionals, as bread earners in families and as independent thinking individuals. The traditional Indian women have evolved to prove the equal in many professions as well as proved better suited than men in others. The situation for changing the role of women is improving fast.

Women's economic empowerment is a prerequisite for sustainable development. Achieving women's economic empowerment is not a "quick fix." It will take sound public policies, a holistic approach and long-term commitment from all development fields.

More equitable access to assets and services like land, water, technology, innovation and credit, banking and financial services will strengthen women's right, increase agricultural productivity, reduce hunger and promote economic growth.

Infrastructure programmes should be designed to maximize poor women's and men's access to the benefits of roads, transportation services, tele-communications, energy and water.

Women experience barriers in almost every aspect of work. At the same time women perform the bulk of unpaid care work. This is an area for greater attention by development through increased recognition and valueing of the ways in which care work supports thriving economies. Innovative approaches and partnerships are needed to scale up women's economic empowerment.

It seemed to be a slight improvement in women's involvement in household decision-making in male-headed households, on such issues as credit, the disposal of household assets, children's education and family health care. The traditional gender-based divisions persist in intra-household decision-making. Women basically decide on food preparation and men make the financial decisions. But group members had become more aware of their

property and political rights (which was part of group training ). As in the case of mobility and social interaction, the evaluation again found greater improvements among women heads of households, older women and more educated women.

In traditional societies, women's empowerment does not occur easily or overnight. One of the most important emerging powers is that women's group themselves, in their social aspects, play a role in such empowerment. This argues for placing emphasis on sustaining groups beyond the life of her image. Today women can use communication support ( films, radio broadcasts with sensitization and training content ) to speed up the empowerment process.

The Government of India has initiated various schemes spread across a broader spectrum such as women's need for shelter, employment, security, safety, legal aid, justice, information, maternal health, food, nutrition etc. as well as their need for economic sustenance through skill development, education and access to credit and marketing.

Thus various corporations were introduced to implement the women to take part to make their ability to make a status in the society with the permission of Central and State Government from where the funds were given to start their own business. It helps the people living below poverty line. In the Semi-Government Corporations there are various schemes which are useful for the society. These schemes are employment loan schemes, educational schemes, training schemes. The Semi-Government Corporation in the Maharashtra state introduced various schemes for the benefit of women and to encourage them to start their own business. In this paper only employment oriented schemes is studied. The research period is from 2002-03 to 2011-12.

Day by day population of the country is increasing, the gap in between demands of the job and it's availability is also expanding. The State government established the Maharashtra Rajya Itar Magas Vargiya Vitta Ani Vikas Mahamandal under social justice department for self employment of the individual, family and society and registered the Mahamandal at Registrar of Companies Office on 23-04-1999 as state government company under Companies Act rules.

Providing financial assistance, for executing various schemes for welfare and development of the other backward class community is the main object of the Mahamandal. Similarly to improve their financial conditions by helping them for self employment as well as marketing place to their products, is the aim of the Mahamandal. Authorized share capital of corporation is Rs. 50.00 crores and Rs.

125 crores was loan sanctioned amount by government for Mahamandal's loan schemes. Various schemes are run at district level, taluka level and village level to reach up to the common man and Mahamandal tried to reach maximum beneficiaries with available man power and funds.

**Objectives :**

a. To plan and promote agricultural development, marketing, processing, supply and storage of agricultural produce, building constructions and small scale industries. Transport trade or activity for the benefit and welfare of Other Backward Classes.

b. To provide capital, credit means, resources, technical and managerial assistance for the prosecution of the work, business profession, trade or activity to enable Other Backward Class to develop economic conditions.

c. To enter in the agreement and seek assistance from the organization and the person of different fields for the agricultural production, commodities, material and production of machinery, manufacturing, assembling and supply such agricultural produce for the Other Backward Classes. To provide the services to enable the Other Backward Community to take over the contract and subcontract and assign these works to the Other Backward Community and to provide required services for the same.

d. To start and implement the welfare schemes for the Other Backward Classes and for the implementing the same; prepare the report and blue prints and collect required data.

e. To establish the companies, organizations and advisory boards or any other required institutions for implementing objectives of the corporation.

**Criteria To Beneficiaries :**

1. Beneficiaries should belong to Other Backward Classes.
2. Should be a domicile of Maharashtra state.
3. Age should be between 18 to 50 years.
4. Should not be a defaulter of any bank, corporation or any financial organization.
5. Beneficiaries from rural area should have an annual income in the limit of Rs. 40,000 and for urban area limit to Rs. 54,000.
6. Only one person per family can take the benefit of loan facility.
7. Beneficiary should have knowledge and experience of the occupation which is selected for loan.
8. Loan's terms and conditions are as per the corporation.

**Schemes :**




**1) Seed Loan Scheme :**

The corporation implements this scheme through leading banks. Under this scheme, the maximum loan amount is Rs. 5 Lakhs with 20 % share of state corporation at 6 % rate of interest; 75 % bank's share with 12-14 % rate of interest and 5 % beneficiary's share. The loan amount sanctioned by the corporation has to be repaid within 5 years.

**2) Micro Finance Scheme :**

Non-governmental organization which has established the Self-Help Groups (SHG) are granted loans up to Rs. 5 lakhs for disbursement to SHGs. The NGO is expected to distribute this loan to the members of the Other Backward Class, the upper limit per beneficiary is Rs. 30,000. Central corporation's contribution is 90 %, state Mahamandal's contribution is 5 % and NGO / beneficiaries contribution is 5 %. The loan has to be repaid within 48 months.

**3 )Mahila Samrudhi Scheme :**

The loan is sanctioned to SHG up to Rs 5 Lakhs for disbursement to it's 20 female members. The maximum limit per member is Rs. 30,000. The loan is granted to the members of SHG at 4 %. 95 % contribution from central corporation and 5 % contribution from state Mahamandal. The loan has to be repaid within 48 months.

**4) Swarnima Scheme :**

Central Corporation has introduced these schemes with the view of empowerment of the women. Under this scheme, women living below poverty line are sanctioned loans up to Rs. 75,000 for small activity, with the interest at 5 %. 95% contribution is from central corporation and 5 % contribution is from state Mahamandal and repayment period is 7 years.

**5) Direct Loan Scheme :**

The loan amount sanctioned is upto Rs. 3 Lakhs, out of which 85 % loan is sanctioned by the central corporation. 10% state Mahamandal and 5 % beneficiaries share. The rate of interest is 6% and to repay the loan within 5 years.

**6) Margin Money Scheme :**

The loan amount sanctioned is upto Rs. 5 Lakhs. 40 % share is by central corporation, 5 % by state corporation, 50 % by bank contribution and 5 % is

beneficiary contribution. 5 years is the repayment period. Mahamandal's charge 6 % rate of interest and bank charges as per their rates.

**Implementation of Scheme In Amravati City :**

**1) Seed Loan Scheme:**

**Table No.1**

**Seed Loan Scheme Beneficiaries with Total Seed Loan ( Year 2002-03 to 2011-2012)**

| Year | Number of Women Beneficiaries in Amravati city | Increase/ Decrease in Women Beneficiaries | Number of Women Beneficiaries in Amravati district ( Excluding Amravati city ) | Increase/ Decrease in Women Beneficiaries | Total Number of Women Beneficiaries (Including Amravati city ) | Total Seed Loan (Amravati city ) (Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|
| 2002-03 | 2 | ---- | 3 | ---- | 5 | 24,000 |
| | (40.00) | | (60.00) | | (100.00) | |
| 2003-04 | 0 | -2 | 3 | 0 | 3 | 0 |
| | (0.00) | | (100.00) | | (100.00) | |
| 2004-05 | 3 | 3 | 0 | -3 | 3 | 85,000 |
| | (100.00) | | (0.00) | | (100.00) | |
| 2005-06 | 0 | -3 | 2 | 2 | 2 | 0 |
| | (0.00) | | (100.00) | | (100.00) | |
| 2006-07 | 3 | 3 | 0 | -2 | 3 | 48,000 |
| | (100.00) | | (0.00) | | (100.00) | |
| 2007-08 | 4 | 1 | 1 | 1 | 5 | 39,000 |
| | (80.00) | | (20.00) | | (100.00) | |
| 2008-09 | 1 | -3 | 1 | 0 | 2 | 5,000 |
| | (50.00) | | (50.00) | | (100.00) | |
| 2009-10 | 3 | 2 | 3 | 2 | 6 | 34,000 |
| | (50.00) | | (50.00) | | (100.00) | |
| 2010-11 | 4 | 1 | 0 | -3 | 4 | 36,000 |
| | (100.00) | | (0.00) | | (100.00) | |
| 2011-12 | 2 | -2 | 0 | 0 | 2 | 40,000 |
| | (100.00) | | (0.00) | | (100.00) | |
| **Total** | **22** | | **13** | | **35** | **3,11,000** |
| | **(62.86)** | | **(37.14)** | | **(100.00)** | |

Though the Mahamandal was established on 23 rd April 1999 Seed Loan is considered from 2002-03 to 2011-12 (10 years). The total number of women beneficiaries in Amravati city were 22 (62.86%) and in Amravati district { except city } were 13 (37.14%), giving a total women beneficiaries { including city } were 35 (100 %). The total seed loan was Rs. 3,11,000.

This scheme had given opportunities to women beneficiaries by raising their standard of living in the society and also to support their families. By various medias such as pamphlets, newspapers; this scheme was successful to Amravati city. The other reason is due to rate of literacy according to census 2011 which is more in Amravati city. It has also given the financial help which is the main objective of this scheme. The Corporation help to motivate the women beneficiaries for selling their product in local market and helping them by giving them training. There is a difference of -13 ( 22 - 35 ) between Amravati city and Amravati district regarding women beneficiaries. The above scheme has given the benefits to women beneficiaries in Amravati city.

**2) Micro Finance Loan :**

Micro Finance Loan Scheme is considered from 2002-03 to 2011-12 i.e. for 10 years. The total number of women beneficiaries of Amravati city were 0 and the total number of women beneficiaries of Amravati district was 0. Hence Central's contribution as well as State's contribution was Rs. 0.

This scheme was not popular to the Amravati city as well as district for women beneficiaries. Proper guidance was not given by the Corporation to the beneficiaries. In other words no woman beneficiaries took the benefit of this scheme.

**3) Mahila Samrudhi Scheme :**

Mahila Samrudhi Loan Scheme is considered from 2002-03 to 2011-12 i.e. for 10 years. The total number of women beneficiaries of Amravati city were 0 and the total number of women beneficiaries of Amravati district was 0. Hence Central's contribution as well as State's contribution was Rs. 0.

The scheme introduced by the Central Government and State Government did not make it successful for the women beneficiaries. As the name suggest's no woman beneficiary from the Amravati city was approached to the Corporation though the scheme was meant for the benefit of the women only.

**4) Swarnima Scheme :**

Swarnima Loan Scheme is considered from 2002-03 to 2011-12 i.e. for 10 years. The total number of women beneficiaries of Amravati city were 38 (46.91%), total number of women beneficiaries of Amravati district excluding Amravati city were 43 (53.09 %) giving a total number of women beneficiaries including Amravati city were 81 (100 %). The total Central's contribution was Rs. 16,89,005, the State's contribution was Rs. 88,895 and the total loan sanctioned was Rs. 17,77,900.

This scheme had given opportunities to raise their standard of living in the society and also to support their

families. By various medias such as pamphlets, newspapers; this scheme was successful to Amravati city. But due to lack of funds from the year 2007-08 to 2011-12 no women beneficiaries took the benefit of this scheme.

**Table No. 2**

**Swarnima Scheme Beneficiaries with Total Central's Contribution, Total State's Contribution, Total Loan Sanction ( 2002-03 to 2011-2012)**

| Year | Number of Women Beneficiaries in Amravati city | Increase/ Decrease in Women Beneficiaries | Number of Women Beneficiaries in Amravati district ( Excluding Amravati city ) | Increase/ Decrease in Women Beneficiaries | Total Number of Women Beneficiaries (Including Amravati city ) | Total Central's Contri-bution (Amravati city) ( Rs. ) | Total State's Contri-bution (Amravati city) ( Rs. ) | Total Loan Sanction (Amravati city) ( Rs. ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2002-03 | 1 | ---- | 0 | ---- | 1 | 47,500 | 2,500 | 50,000 |
| | (100.00) | | (0.00) | | (100.00) | | | |
| 2003-04 | 14 | 13 | 18 | 18 | 32 | 6,55,500 | 34,500 | 6,90,000 |
| | (43.75) | | (56.25) | | (100.00) | | | |
| 2004-05 | 21 | 7 | 13 | -5 | 34 | 9,00,505 | 47,395 | 9,47,900 |
| | (61.76) | | (38.24) | | (100.00) | | | |
| 2005-06 | 1 | -20 | 4 | -9 | 5 | 38,000 | 2,000 | 40,000 |
| | (20.00) | | (80.00) | | (100.00) | | | |
| 2006-07 | 1 | 0 | 8 | 4 | 9 | 47,500 | 2,500 | 50,000 |
| | (11.11) | | (88.89) | | (100.00) | | | |
| **Total** | **38** | | **43** | | **81** | **16,89,005** | **88,895** | **17,77,900** |
| | **(46.91)** | | **(53.09)** | | **(100.00)** | | | |

**5) Direct Loan Scheme :**

Direct Loan Scheme is considered from 2002-03 to 2011-12 (10 years). The total number of women beneficiaries of Amravati city were 4 ( 30.77 % ) and the total number of women beneficiaries of Amravati district excluding city were 9 ( 69.23 % ), giving a total number of women beneficiaries including Amravati city were 13 ( 100 % ). The amount provided for 10 years by the Central's contribution was Rs. 5,15,000; the State's contribution was Rs. 55,000 and the total loan sanction was Rs. 5,70,000.

The motivation was given from the families to start their own business so that it is helpful for their own families in raising their standard of living, to educate their children and also to raise their financial and economical condition in the society. According to census 2011 the rate of literacy in Amravati city was more, then also

the women beneficiaries did not show interest and were ignored in Amravati city to take the benefit of this scheme. But due to shortage of funds during the year 2010-11 and 2011-12 no women beneficiaries took the benefit of this scheme in Amravati city and Amravati district.

**Table No. 3**

**Direct Loan Scheme Beneficiaries with Total Central's Contribution, Total State's Contribution and Total Loan Sanction ( 2002-03 to 2011-2012)**

| Year | Number of Women Bene-ficiaries in Amravati city | Increase/ Decrease in Women Bene-ficiaries | Number of Women Beneficiaries in Amravati district ( Excluding Amravati city ) | Increase/ Decrease in Women Beneficia ries | Total Number of Women Bene-ficiaries (Including Amravati city ) | Total Central's Contri-bution (Amravati city) (Rs.) | Total State's Contri-bution (Rs.) | Total Loan Sanction ( Amravati City ) (Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2002-03 | 0 | ---- | 0 | ---- | 0 | 0 | 0 | 0 |
| | (0.00) | | (0.00) | | (100.00) | | | |
| 2003-04 | 0 | 0 | 3 | 3 | 3 | 0 | 0 | 0 |
| | (0.00) | | (100.00) | | (100.00) | | | |
| 2004-05 | 1 | 1 | 0 | -3 | 1 | 90,000 | 5,000 | 95,000 |
| | (100.00) | | (0.00) | | (100.00) | | | |
| 2005-06 | 0 | -1 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 0 |
| | (0.00) | | (100.00) | | (100.00) | | | |
| 2006-07 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 0 |
| | (0.00) | | (100.00) | | (100.00) | | | |
| 2007-08 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 0 |
| | (0.00) | | (100.00) | | (100.00) | | | |
| 2008-09 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 0 |
| | (0.00) | | (100.00) | | (100.00) | | | |
| 2009-10 | 3 | 3 | 2 | 1 | 5 | 4,25,000 | 50,000 | 4,75,000 |
| | (60.00) | | (40.00) | | (100.00) | | | |
| **Total** | **4** | | **9** | | **13** | **5,15,000** | **55,000** | **5,70,000** |
| | **(30.77)** | | **(69.23)** | | **(100.00)** | | | |

### 6) Margin Money Scheme :

Margin Loan Scheme is considered from 2002-03 to 2011-12 i.e. for 10 years. The total number of women beneficiaries of Amravati city were 0 and of Amravati district were 0. Hence Central's as well as State's contribution was Rs. 0.

This scheme was not popular for

the women beneficiaries in Amravati city / district. It may be because, the beneficiaries were not aware of knowledge and experience while selecting a loan. No women beneficiaries took interest to take the loan for their betterment of their future life. No woman beneficiaries took the benefit of this scheme.

**Suggestions :**

Entrepreneurship means, an act of business ownership and business creation that empowers women economically by increasing their economic strength as well as position in a society. Those women who start or assist any business in its functioning are known as women entrepreneur. Challenging roles are being accepted by females, as they desire to be financially independent along with taking care of their families and loved ones.

Thus, today women are in a better position wherein women participation in the field of entrepreneurship is increasing at considerable rate, but efforts are to be taken in attitude change, conservation midest of society, less daring, risk taking abilities of women, lack of support and co-operation by the society members.

Thus, there are some suggestions which can make the schemes more attractive to the beneficiaries by the semi-government corporations.

1. Strength, weakness, opportunities and threats help the beneficiary to identify their business. It is important to recognize that some goals will need to be addressed with the long term strategy because they won't be able to meet them immediately. This could be because of resources, finance or time.
2. Training acquires all the knowledge and skills needed in their day to day tasks; performs at a faster rate and with efficiency increasing overall productivity of the business. They gain new tactics of overcoming challenges when they face them. There is no wastage of resources which may cause extra expenses.
3. The area and locality of the house depends a lot for opening a business. To choose a proper place is very important. Even though they are interested it becomes difficult for the beneficiaries to open the business because the house of the beneficiaries is in at interior place. So proper guidance and knowledge is must for the beneficiary.
4. The Mahamandal must provide the market for the beneficiary since with lot of competition they are unable to place their product in the market.

With the help of Mahamandal, the beneficiary must exhibit an exhibition so that the common man can take the benefit of the product at a concessional rate and in the exhibition introduction of Mahamandal can be done to each and every person who are visiting the exhibition.

5. Maintenance of daily records of income and expenditure by the beneficiary must be made compulsory by herself.
6. Bachat Gat must be introduced, where by the beneficiaries can take the benefit and the beneficiary can open their own business.
7. The Mahamandal must give the anudan in installments so that the beneficiaries are connected with the Mahamandal. Anudan and loan amount which is sanctioned must be increased from time to time so that the beneficiary can take more advantage of the schemes of the corporation.
8. Officers unit require specialized staff training. The control and supervision of collections require high cost. There is a lack of personal and professional recognition for collection. Collection had a reputation of being not very enjoyable and in some cultural contexts, quite negative. An officer unit distracts from promotion and analysis activities, especially during periods of expansion.
9. Before taking the help from the bank and Mahamandal, the beneficiary must think that they have to develop their business accordingly. When the loan is provided to them strictness must be maintained to use the money only for business and not for other purpose.
10. A good filing system will help the beneficiary follow up over due debts and know when the beneficiary accounts are due to be paid. This will help the beneficiary to manage the cash flow. A habit must be made by the beneficiary to maintain the documents at a proper time, at a proper date and proper place.
11. According to their family budget the beneficiary must do their own expenditure. Strictness must be maintained in the business, that at any circumstances they will not use profit in family requirements. If proper rules and regulations are maintained in the family's requirement then utilizing of the profit will not arise from the business.
12. Time management must be maintained for regularity. Proper co-ordination must be there between the beneficiary and customer in business. Regularity

is impossible without family's support. Transparency, honest with communication must be there in the business to maintain regularity.

13. Wholesaler can identify the market available to the retailer and utilize vendor booths supplied with brochures, outline and testimonials of the wholesaler's capabilities.
14. According to the location of the market, the cost of a product depends, so the beneficiary must properly think to purchase the product. According to the requirements, the beneficiary goes to the market with a proper list of the product so that it will be convenient for them to purchase the product.

**References :**


1. Kalbagh Chetana (1992) : "Women and Development", Discovery Publishing House, New Delhi.
2. Mohan Prem (2012) : "Women Empowerment through Micro-finance", Axis Book Private Limited, New Delhi - 110 002, I st Edition.
3. Rathiha R. (2011) : "Women Entrepreneurship in the Changing Scenario", Discovery Publishing, 4831 / 24, Darya Ganj, New Delhi - 110 002, 1st Edition.
4. Katole Prashant (2006) : "The Role of Various Schemes for the Financial Development to the Women in Amravati District - A Critical Study ".
5. Annual Report : Maharashtra Rajya Itar Magas Vargiya Vitta Ani Vikas Mahamandal


◆◆◆

(ग्रंथ परिचय)

# भारतीय कृषीक्षेत्र : दशा आणि दिशा

**लेखक : वर्षा गंगणे**

(प्रकाशक : साईज्योती प्रकाशन, नागपूर. किंमत ३२५/-, पृष्ठसंख्या २५३)

**गजानन भारती**
अर्थशास्त्र विभाग, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती.

विविध विषयांवर सातत्याने लिखाण करणाऱ्या डॉ. वर्षा गंगणे यांचे ''भारतीय कृषीक्षेत्र : दशा आणि दिशा'' हे महत्त्वपूर्ण पुस्तक २०१७ मध्ये प्रसिद्ध झाले. महत्त्वाची बाब ही की, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाच्या द्वारे दिला जाणारा २०१७ चा वसंतराव नाईक पुरस्कार त्यांच्या या पुस्तकाला प्राप्त झाला आहे. हा पुरस्कार शेती व शेती विषयक पूरक व्यवसाय लिखाणास दिला जातो. हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल प्रथमत: डॉ. वर्षा गंगणे यांचे अभिनंदन.

डॉ. वर्षा गंगणे यांनी विविध वृत्तपत्रांमधून या संबंधीत विषयांवर विविध लेख लिहिले होते. हे पुस्तक म्हणजे अशा लेखांचा संग्रह आहे. या पुस्तकात शेती संबंधीत विविध विषयांवर लिहिलेले एकूण ४६ लेख आहेत. हे लेख अर्थातच बरेच छोटे खानी आहेत. अपवादात्मक म्हणून काही लेख अन्य लेखांच्या तुलनेने थोडेसे मोठे झाले आहेत जसे कृषी अर्थशास्त्राचे बदलते स्वरूप हा लेख जवळपास १० पानांचा आहे. या लेखांवरून नजर फिरविली तर आपल्याला त्यात चर्चिलेल्या विषयांचा आवाका सहजच लक्षात येतो. कृषी क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेचा आधार, कृषी विकासाचे महत्त्व असे तात्विक विषयाला वाहिलेले लेख असले तरीही बहुसंख्य लेख हे शेती संबंधीत समस्यांशी निगडित आहेत. शेत मालाच्या किंमती आणि वास्तव हा महत्त्वपूर्ण विषय त्यांनी अत्यंत योग्य पद्धतीने आणि आपुलकीच्या दृष्टीने लिहिला आहे.

शेतमालाला योग्य भाव न मिळण्याची कारणे सांगून त्यांनी त्यावर जवळपास १५ उपाय सुचविले आहेत. शेतीक्षेत्रात पाणी व सिंचन हा महत्त्वाचा विषय मानला जातो. या विषयावर त्यांनी जवळपास सहा-सात लेख लिहिले आहेत. या विषयाचा विचार करतांना देशातील घटत जाणाऱ्या भूजलपातळीचा विचार एका लेखात केला असून त्याची विविध कारणेही त्यांनी सांगितली आहेत. महाराष्ट्रातील विविध महसूल विभागात घटत जाणाऱ्या भूजलपातळीची आकडेवारी व बाधित गावांची संख्या त्या नोंदवितात. भूजलपातळी वाढवण्याचेही उपाय त्यांनी सुचविले आहेत. देशामध्ये जर शेतकऱ्यांना चांगल्या प्रकारची शेती करावयाची असेल तर जल सुरक्षा कशी महत्त्वाची आहे यावरही त्यांनी स्वतंत्र लेख लिहिला आहे. शेतीक्षेत्राला शास्वत पाणी उपलब्ध व्हावे त्यासाठी पाण्याच्या समस्या कशा दूर करायच्या यावरही भर देतांना

मानवाला पिण्यासाठी पुरेशा प्रमाणात पाणी मिळाले पाहिजे हे त्या आवर्जून सांगतात.

गेल्या काही वर्षापासून शेतीतून पिके काढण्यासोबत फूलशेती, फळशेती, वनस्पतीची शेती, रोपवाटिका तयार करण्याची शेती, अशा प्रकारच्या विविध शेती प्रकारावर त्यांनी स्वतंत्र लेख लिहिले आहे. शेती आणि स्त्रिया यांचा संबंध घनिष्ठ आहे. परिणामत: स्त्रिया आणि शेती या लेखात त्यांनी शेतीच्या विकासात स्त्रियांचे महत्त्व सांगून स्त्री नाही तर शेती नाही अशी जाणीव वाचकांना करून दिली आहे. आपल्या देशात वनस्पती या आयुर्वेदामधील उपचारात महत्त्वपूर्ण मानल्या जातात. त्यांनी कोरफड, शतावरी, पुदिना, ब्राह्मी, तुळस अशा वनस्पतींची अत्यंत थोडक्यात माहिती देऊन त्यांचे उत्पादन कोरडवाहू शेतीत घेणे शक्य असल्याने त्यांचा शेतकऱ्यांनी अवलंब करावा असे सुचविले आहे. या क्षेत्रात कार्य करणाऱ्या वैद्यांशी संपर्क साधून कोणत्या वनस्पती तयार कराव्यात याचे ज्ञान जर तरूण वर्गाने मिळविले तर त्यांना भरपूर उत्पन्न होऊ शकेल असे त्यांनी सुचविले आहे.

वर्तमान काळामध्ये शाश्वत विकासाची कल्पना पुढे आली आहे. त्यातूनच लेखिकेने शाश्वत शेतीसाठी हा लेख दिला आहे. शाश्वत शेतीच्या संदर्भात नियमित पाणी पुरवठा, मातीचा पोत सुधारण्याची गरज, शेतीत संशोधन, हवामान विषयक सूचना, योग्य हमीभाव मिळणे, पीकपद्धतीत बदल अशा काही महत्त्वपूर्ण मुद्यांची चर्चा केली आहे.

डॉ. वर्षा गंगणे यांनी या पुस्तकात प्रसिद्ध केलेल्या सर्व निबंधाचा उल्लेख करणे शक्य नसले तरी शेती या क्षेत्राकडे पाहण्यांची त्यांची व्यापक आणि काहीशी भावनिक वृत्ती दिसून येते. शेतीक्षेत्र व त्याच्याशी संबंधित विविध प्रश्नांची त्यांनी जाण पुस्तक वाचत असतांना आपल्या लक्षात येते. भारतीय शेती व त्या अनुषंगाने शेतकरी यांचा विकास व्हावा, शेतीची दशा नष्ट होऊन शेती विकासाला योग्य दिशा द्यावी ही पुस्तक लिहिण्यामागे त्यांची असलेली भूमिका विशेष अधोरेखित करायला हवी, या लेखांमध्ये कृषीला कर्जाचा पुरवठा या विषयावर दोन-तीन लेख लेखिकेला सहजच लिहिता आले असते.

हे पुस्तक अत्यंत सोप्या भाषेत व सर्वसामान्यांना कळेल या पद्धतीने लिहितांना विषयाची शास्त्रीयता लेखिकेने टिकवून ठेवली आहे. हे पुस्तक लिहिल्याबद्दल व राज्य शासनाचा वसंतराव नाईक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल डॉ. वर्षा गंगणे यांचे पुन्हा अभिनंदन. पुढील काळात शेती क्षेत्राशी संबंधित तसेच अन्य क्षेत्रांशी संबंधित लिखाण त्यांच्या हातून होओ अशी इच्छा हे पुस्तक वाचल्यावर सर्व वाचक व्यक्त करतील.

◆◆◆

(ग्रंथ परिचय)

# फळ उत्पादनाचे अर्थशास्त्र

**लेखक : वनिता ज्ञा.चोरे**

(प्रकाशक : सेंटर फॉर एकॉनॉमिक अ‍ॅन्ड सोशल स्टडीज, अमरावती. किंमत ३००/–, पृष्ठसंख्या २०४)

**प्रतिभा एस.काळमेघ**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शिवशक्ती महाविद्यालय, बाभुळगांव, जि.यवतमाळ.

प्रस्तुत ग्रंथाची प्रस्तावना ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. दि.व्यं.जहागिरदार यांची असून पुस्तकात सात प्रकरणे आहेत. या पुस्तकात लेखिकेने विशेषत्वाने अमरावती जिल्ह्यातील फळ उत्पादनाचे अर्थशास्त्र अभ्यासले आहे.

कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेत जवळजवळ ६० प्रतिशत लोकांचा व्यवसाय शेती व शेतीवर आधारित उद्योग आहे. परंतु शेतीचा प्राण असणारे पाणी म्हणजे सिंचनव्यवस्था मात्र शेतीत नसल्यामुळे अमरावती जिल्ह्यात केवळ ८.१६ प्रतिशत क्षेत्र ओलिताखाली आहे. त्यामुळे अल्प उत्पादकतेच्या समस्येत तो अडकला असून कोरडवाहू शेतकरी आत्महत्येकडे वळतो आहे. अशा परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांचे पारंपरिक शेतीकडून फळउत्पादनाकडे वळणे आवश्यक वाटते. तसेच केवळ संत्रा पिकावर विसंबून न राहता बोर, पपई, आवळा, लिंबू, आंबा, केळी, सिताफळ, पेरू, इत्यादी फळपिकांचेही उत्पादन घेतल्यास ते शेतकऱ्यांसाठी लाभदायक ठरेल. शेती हे उदरनिर्वाहाचे साधन नसून तो व्यवसाय आहे. तेव्हा व्यापारक्षम, निर्यातक्षम, गुणवत्ताप्राप्त शेती उत्पादन करण्याची गरज आहे. याकडे लक्ष वेधले आहे. तसेच कृषी विकासाच्या व्युहरचनेत शेतीचे आधुनिकीकरण व सामाजिक संरचनेच्या तीन टप्प्यातील सुधारणांचा आढावा घेतला आहे. कोरडवाहू शेतीचा विकास, फलोत्पादन योजना, शेतीचे विविधीकरण या मुद्यांवर प्रकाश टाकला आहे.

संशोधनरूपी ग्रंथ पुस्तक स्वरूपात प्रकाशित करतांना त्यांनी संशोधन विषयाची गृहिते, उद्दीष्ट्ये, संशोधनाचे कार्यक्षेत्र, मर्यादा तसेच उपलब्ध साहित्याचा आढावा घेतांना १९९७ पासून या विषयांवरील विविध अभ्यासकांनी, तज्ज्ञांनी लिहिलेल्या ग्रंथाचा आढावा घेतला आहे. एकूणच शेतकरी कुटूंबातील जन्म, पालनपोषण झाल्यामुळे शेतकऱ्यांचे वास्तव लहानपाणापासून डोळ्यासमोर होते तेव्हा शेती आणि शेतीची निगडीत असणाऱ्या प्रश्नांचाच अभ्यास करण्याचा लेखिकेचा मानस प्रास्ताविक ह्या पहिल्या प्रकरणातून व्यक्त केलेला दिसतो.

संशोधन ग्रंथाच्या दुसऱ्या प्रकरणात फळ उत्पादन स्थिती विशद केली असून प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्र राज्यातील अमरावती महसूल विभागातील

आर्थिक स्थितीचे विश्लेषण करून अमरावती जिल्ह्यातील फळ उत्पादन स्थितीचे विवेचन केले आहे. तसेच फळबाग लागवड व विपणन व्यवस्था, प्रक्रिया, कलम, रोपांची निवड, लागवडीनंतर कलम रोपांची घ्यावयाची काळजी, पाणी पुरवठा, मशागत, खत व्यवस्थापन, पीक संरक्षण, काढणीत्तर व्यवस्थापन, बाजारपेठ व वाहतूक, कोरडवाहू फळबागांचे व्यवस्थापन, इत्यादी मुद्यांचा परामर्ष घेतला. तसेच महाराष्ट्रातील फळ उत्पादन स्थितीशी तुलना, महाराष्ट्राचे हवामानानुसार विभाग, महाराष्ट्रातील लागवडीखालील क्षेत्र, विदर्भातील फळ उत्पादन स्थितीशी तुलना, अमरावती महसूल विभागीय क्षेत्र, जिल्हानिहाय स्थिती, अमरावती महसूल विभागातील जिल्हानिहाय पिकांखालील निव्वळ क्षेत्र, इत्यादी मुद्यांचे सविस्तरपणे, अद्यावत आकडेवारीसह खुलासेवार तपशील मांडला आहे.

अमरावती जिल्ह्याचे फळ उत्पादनासंदर्भात विशेष अध्ययन करताना जिल्ह्याची यथोचित व योग्य ओळख करून दिली आहे. अमरावती जिल्ह्यातील फळ उत्पादनाची स्थिती मांडतांना जिल्ह्यातील १४ तालुक्याचे तालुकानिहाय एकूण भौगोलिक क्षेत्र, लागवडीखालील क्षेत्र तसेच फळपिकांखालील क्षेत्र इत्यादीचा अभ्यास करतांना तक्त्यांचा आधार घेवून आकडेवारीसह मांडणी केली आहे. राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत फळनिहाय तालुकानिहाय झालेली लागवड तक्त्याद्वारे स्पष्ट केली आहे. या सर्व आकडेवारीवरून विदर्भामध्ये अमरावती जिल्ह्यात फळलागवडीला विशेषत्वाने वाव असल्याने राज्य व केंद्र शासनाच्या विविध अभियानांचा लाभ घेवून फळ लागवडीला प्राधान्य देवून परंपरागत शेतीऐवजी व्यापारक्षम शेती करावी व आर्थिक उन्नतीची कास धरावी अशी अपेक्षा व आशावाद लेखिकेने दुसऱ्या प्रकरणातून व्यक्त केला आहे.

ग्रंथाच्या तिसऱ्या प्रकरणात फळ उत्पादनाचे अर्थशास्त्र हा अभ्यास विषय असल्याने उत्पादनाशी निगडीत अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणजे उत्पादन व्यय मापनावर भर दिला आहे. महाराष्ट्रात फळ उत्पादनाचे स्वरूप भिन्न आहे. प्रत्येक जिल्ह्यात उत्पादित होणाऱ्या फळ प्रकारात भिन्नता आहे. कोरडवाहू जमिनीत कोरडवाहू फळझाडे जसे आंबा, काजू, सिताफळ, आवळा, बोर, जांभूळ तर, सिंचनाची व्यवस्था असल्यास द्राक्षे, डाळींब, केळी, लिंबू, पपई, चिकू, नारळ, सुपारी इत्यादीची लागवड होते. अमरावती जिल्ह्यात कोरडवाहू फळपिक लागवडीला भरपूर वाव आहे.

**फळ उत्पादन व्यय घटकांचे निर्धारण :**

अमरावती जिल्ह्यातील फळ उत्पादकाने उत्पादन व्ययाचे मापन लागवड पूर्व व्यय, रोपांवरील व्यय, लागवडीचा चालू व्यय, विक्री व्यय या चार भागात केले आहे. तसेच लेखिकेने अमरावती जिल्ह्यातील १४ पैकी ७ तालुक्यातील फळ उत्पादन व्ययाचे मापन केले आहे. त्यात अचलपूर, अमरावती, अंजनगांव सुर्जी, चांदूरबाजार, मोर्शी, नांदगांव खंडेश्वर, तिवसा या तालुक्याचा समावेश आहे. उत्पादन व्ययाचे मापन करतांना फळपिकांखालील क्षेत्र, दर हेक्टरी, उत्पादन व्यय (घटक रचनेनुसार) पाच वर्षाचा सरासरी व्यय विचारात घेतला आहे. तसेच फळ उत्पादकांनी रोपांवरील व्यय, लागवड पूर्व व्यय, लागवडीचा

चालू व्यय, विक्री व्यय यांचे अध्ययन करून २००४-०५ ते २००८-०९ मध्ये तो कसा बदलत गेला याचे संपूर्ण विश्लेषण या प्रकरणामध्ये केले आहे.

फळपिकांवरील उत्पादन व्यय या महत्त्वपूर्ण घटकाचे अभ्यास प्रमाणेच फळ उत्पादन प्राप्तीचे विवेचनही तितकेच महत्त्वाचे ठरते. हे विवेचन ग्रंथाच्या चवथ्या प्रकरणात केले आहे. फळनिहाय व तालुकानिहाय प्राप्तीचे अध्ययन करून दर हेक्टरी फळ उत्पादकाला होणारी प्राप्ती व उत्पादनातील आधिक्याचे विश्लेषण सदर प्रकरणात आहे. प्राप्तीचे अध्ययन करताना विविध पिकांखालील क्षेत्र, फळपिकाची दर हेक्टरी प्राप्ती, तालुकानिहाय फळपिकांची दर हेक्टरी प्राप्तीतील भिन्नता, तालुकानिहाय विविध फळपिकांवरील आधिक्य व तुटीचे विश्लेषण तालुकानिहाय केले आहे. विशेष बाब म्हणजे सर्वच तालुक्यात फळ उत्पादकांना विविध फळपिकांवर आधिक्य प्राप्त झाले आहे. त्या आधिक्याचे प्रमाण मात्र कमी-जास्त आहेत. कारण जमिनीच्या सुपिकता, सिंचन सुविधा व शासकीय पद्धतीने लागवड यामुळे आधिक्यात तालुकानिहाय भिन्नता निदर्शनास येत असल्याचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

विपणन या पाचव्या प्रकरणात फळ उत्पादनाचा, विपणनाचे महत्व, कार्य यांचे विवेचन आहे. तसेच फळ उत्पादनातील विपणन रचना व विपणन व्यवस्थेतील साखळी अभ्यासली आहे. विपणन व्यवस्थेच्या कार्यक्षमते संदर्भातील तिनही निकषांचे विवेचन केले आहे. या निकषांपैकी कार्यक्षमता निर्धारित करणारा किंमत फैलाव हा निकष वापरून अमरावती जिल्ह्यातील फळ विपणन कार्यक्षमता ठरविली आहे. तसेच विपणन व्यवस्थेतील विविध घटकांकडून मिळालेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे किंमत फैलावाचे सविस्तर विवेचन केले आहे. विपणनाची कार्यक्षमता आणि किंमत फैलाव. कार्यक्षमता आणि कल्याण, कार्यक्षमता आणि कृषी उत्पादन (फळ उत्पादन) इत्यादी घटकांचे सविस्तर विवेचन या प्रकरणात केले आहे.

अमरावती जिल्ह्यातील ठोक व किरकोळ विक्रेत्यांची सर्वसाधारण माहिती, जिल्ह्यातील ठोक विक्रेत्यांच्या व्यवसायांसबंधीची माहिती, किरकोळ विक्रेत्यांची सरासरी खरेदी-विक्री किंमत, तफावतीचे स्वरूप व कारणे, फळांच्या किंमत फैलावाचे मापन, तालुकानिहाय विशिष्ट फळांच्या बाबतीत किंमत फैलाव, फळ विपणनाची कार्यक्षमता व किंमत फैलाव इत्यादी बाबींचा सविस्तर अभ्यास करण्यात आला. त्यावरून फळात एकूण विपणन व्यय घटविणे व त्याद्वारे विपणनाची कार्यक्षमता वाढविणे शक्य आहे असा आशावादही लेखिकेने या प्रकरणातून व्यक्त केलेला आहे.

फळ उत्पादन विषयक शासकीय धोरण या सहाव्या प्रकरणात फळ उत्पादनासंदर्भात शासकीय धोरणाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. विशेषत्वाने फळ उत्पादनासंदर्भातील शासकीय धोरणाची आवश्यकता, कृषी आराखड्यातील अंतर्गत व बाह्य, केंद्र व राज्य पुरस्कृत योजना, शासकीय रोजगार हमी योजनेतंर्गत फलोत्पादन विकास योजना, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान या अनुषंगाने अमरावती जिल्ह्यातील रोजगार हमी योजना व राष्ट्रीय

फलोत्पादन योजनांचा सविस्तर आढावा घेतला असून कृषीविषयक पतधोरण, परतफेड पद्धती यांचेही अध्ययन करण्यात आले आहे.

१९९१ च्या नवीन आर्थिक धोरणानंतर संपुआ सरकारने शेतकऱ्यांसाठी २००४ मध्ये राष्ट्रीय कृषी आयोगाची नियुक्त केली. आयोगाने केलेल्या शिफारशींना कृषी विकासाची दुसरी हरित क्रांति म्हणून संबोधले आहे. कृषी विकासासाठी आयोगाने पाच सूत्री कार्यक्रम लागू करण्याचा सल्ला दिला. त्यातील भूमी स्वास्थ्य सुधार कार्यक्रम, जलसंवर्धन योजना, ऋण सुधार योजना, संशोधन, वैज्ञानिक स्तरावर पिक संरक्षण, किंमत फैलाव शक्य तेवढा कमी करणे इत्यादी बाबींचा ऊहापोह देखील सहाव्या प्रकरणातून करण्यात आला.

प्रस्तुत ग्रंथाच्या सातव्या प्रकरणात फळ उत्पादनामध्ये उत्पादन ते विपणनापर्यंत अनेक समस्या उद्‌भवतात त्या समस्यांचे तात्विक विश्लेषण करून समस्यांवर उपाययोजना सुचविल्या आहेत.

**फळ उत्पादनातील समस्या :**

फळ उत्पादनातील समस्यांमध्ये फळ लागवडीपूर्वी नियोजनाचा अभाव, सुनियोजित व्यवस्थापनाची कमतरता, ठिंबक सिंचन तंत्रज्ञानाच्या माहितीचा अभाव, सिंचनाची अपूरी सुविधा, कुंपणाच्या सोयींचा अभाव, तण नियंत्रणाचा अभाव, नैसर्गिक घटकांमुळे होणारे नुकसान, तसेच फळ उत्पादकांच्या अनेक समस्या असतात. त्यात माती परीक्षणाचा अभाव, जातिवंत रोप व कलमांच्या उपलब्धतेबाबत शंका, साठवण सुविधांचा अभाव, अयोग्य कृषी पतपुरवठा धोरण, फळपिकांच्या निर्यातीची समस्या तसेच विपणनातील समस्या व इतर अनेक समस्यांचा समावेश होतो. त्याचे सविस्तर विवेचन केले आहे आणि समस्यांवर विविध उपाययोजनाही सुचविल्या आहेत.

**फळ उत्पादन समस्यांवरील उपाय :**

पपई व केळी वगळता बहुतांश फळझाडे दीर्घकाळ टिकणारी असतात. तेव्हा दीर्घकाळचा विचार करून नियोजन करावे लागते व फळउत्पादनातील समस्यांवर मात करावी लागते. फळ उत्पादन समस्यांवर एकूण २१ मुद्यांचे आधारे उपाय सुचविण्यात आले आहे. त्यामध्ये योग्य नियोजन, ठिंबक सिंचन पद्धतीचा वापर, कुंपणाची आवश्यकता, फळ गळती रोखणे, एकात्मिक कीड व्यवस्थापन, श्रमिकांचा कार्यक्षम वापर इत्यादींचा समावेश आहे.

**फळबाग उत्पादकांच्या समस्यांवरील उपाय :**

यामध्ये शास्त्रीय पद्धतीने फळबाग लागवड, उन्हाळ्यात फळझाडांचे संरक्षण, रासायनिक खतांचा वाजवी वापर, काढणीत्तर व्यवस्थापनाला महत्त्व, फळ संग्रहण सुविधा, अनुदान वाटप, फळ प्रक्रिया उद्योग सुरू करणे इत्यादी उपायांचे प्रतिपादन आहे.

**विपणनातील समस्यांवरील उपाय :**

नियंत्रित बाजारपेठेमध्ये सुधारणा, किंमतीमध्ये स्थैर्य राखणे, कृषीमूल्य धोरण, वाहतूक व्यय इत्यादी उपायांचा समावेश होतो.

**अन्य उपाय :**

यामध्ये फळपिकांवरील क्षेत्रात वाढ, संस्थात्मक सुधारणांवर भर, संघटित होण्याची आवश्यकता, वीजपुरवठा नियमित करणे, वरील उपायांसोबतच फळांच्या साठवणूकीसाठी शीतगृहाची

निर्मिती फळ उत्पादन क्षेत्रात करणे व फळांवरील प्रक्रिया उद्योग उभारणे महत्त्वाचे असल्याचे वाटते.

वरील उपायांद्वारे महाराष्ट्रात तसेच अमरावती जिल्ह्यात फळ उत्पादनात वाढ होत आहे. परंतु परंपरागत पीक पद्धतीला पर्याय म्हणून फळशेती महत्त्वाची ठरते. फळ उत्पादनामुळे शेतीचे अर्थशास्त्र सुधारून ग्रामविकास व पर्यायाने राष्ट्रविकास होऊन शेती व शेतकऱ्यांची स्थिती सुधारेल व ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक बळकट होईल असा आशावाद लेखिकेने या ग्रंथाच्या शेवटच्या प्रकरणात व्यक्त केला असून तो आशावाद अगदी सत्य आहे असे मला वाटते. फळ उत्पादन शेती प्रणेते मा. शरदचंद्र पवार यांनी समृद्ध पश्चिम महाराष्ट्रामध्ये जी क्रांति घडवून आणली त्यावरून लेखिकेने विदर्भात सुद्धा फळउत्पादनासाठी मोठा वाव असल्याचे आपल्या अभ्यासातून स्पष्ट केले आहे. शेवटच्या प्रकरणात समस्या व उपाययोजना स्पष्ट करतांना समस्येच्या आधारावर केलेल्या शिफारशी फळ उत्पादक शेतकरी, शासन आणि व्यापारी यांचे दृष्टीने महत्त्वपूर्ण असल्याचे दिसून येते. फळ उत्पादनाचे अर्थशास्त्र फळ उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिपस्तंभासारखे दिशादर्शक व मार्गदर्शक ठरेल यात शंका नाही असे वाटते.

पुस्तकांची संदर्भसूची संशोधन विषयाशी संबंधीत संदर्भग्रथांनी, अहवाल व लेखांनी तसेच विषयांशी संबंधित आंतरजातीय संकेतस्थळांनी समृद्ध आहे. त्यामुळेच अभ्यासपूर्ण असा फळ उत्पादनाचे अर्थशास्त्र हा संदर्भग्रंथ लिहिल्या गेला आहे. त्याबद्दल डॉ. वनिता चोरे यांचे हार्दिक अभिनंदन !

◆◆◆

**गो.सी.टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदूर बाजार, जि.अमरावती येथे संपन्न झालेल्या .....**

# विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४२ व्या वार्षिक अधिवेशनाचा वृत्तांत (२०१७-१८)

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे ४२ वे वार्षिक अधिवेशन दि. २७ व २८ जानेवारी २०१८ (शनिवार व रविवार) रोजी गो.सी.टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदूरबाजार, जि.अमरावती येथे संपन्न झाले. उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्ष गो.सी.टोम्पे महाविद्यालय सार्वजनिक ट्रस्टचे सचिव मा. श्री. भाष्करराव टोम्पे होते. ४२ व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. जनार्दन काकडे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तुकूम, जि.चंद्रपूर होते. सुरवातीला प्राचार्य डॉ. राजेंद्र रामटेके यांनी स्वागतपर भाषण केले. विदर्भ अर्थशास्त्र परिषदे विषयी सविस्तर माहिती परिषदेच्या कार्याध्यक्षा डॉ. अंजली कुळकर्णी यांनी दिली. अधिवेशनाचे रितसर उद्घाटन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्र-कुलगुरू मा.डॉ. राजेश जयपूर यांनी केले. या कार्यक्रमाला विशेष अतिथी ॲड. अरूणजी नेटके, विदर्भ प्रांत संघटन मंत्री, नागपूर उपस्थित होते. तसेच श्री. संजय बनारसे, कार्यकारी संपादक, दै.विदर्भ मतदार, परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. प्रशांत काटोले, परिषदेचे सचिव डॉ. राजेश चव्हाण व सचिव डॉ. गणेश मायवाडे उपस्थित होते. उद्घाटन सोहळ्याचे सूत्र संचालन प्रा.डॉ. शिंदे यांनी केले तर प्रास्ताविक स्थानिक कार्यवाहक डॉ. संजय कोठारी यांनी केले. मान्यवरांच्या उपस्थितीत अधिवेशनानिमित्त स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. उद्घाटनपर भाषण मा. प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर यांनी केले. ४२ व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष मा.डॉ. जे.एम.काकडे यांनी 'विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या - एक दृष्टीक्षेप' या विषयावर अभ्यासपूर्ण अध्यक्षीय भाषण केले. उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्ष मा.श्री.भाष्करराव टोम्पे यांनी मार्गदर्शनपर भाषण केले. तर आभार प्रदर्शन परिषदेचे सचिव डॉ. राजेश चव्हाण यांनी केले. व शेवटी पसायदान होऊन उद्घाटन कार्यक्रम संपन्न झाला.

भोजनावकाशानंतर अधिवेशनाच्या पहिल्या सत्रामध्ये 'बाजार संरचना, सैद्धांतिक विवेचन आणि अनुभव' या विषयावरील सत्राचे अध्यक्ष प्रा.डॉ.जे.एम.काकडे, सूत्र संचालक प्रा.अशिष महातळे, अहवाल लेखनाचे कार्य प्रा.डॉ.चौधरी मॅडम यांनी केले. या विषयावर प्रा.डॉ. प्रशांत हरमकर, डॉ. सिद्धार्थ मेश्राम, डॉ. सुरेश जगताप यांनी शोध निबंध सादर केलेत. इतर सदस्यांनी चर्चेत सहभाग घेतला.

चहापानानंतर दुसऱ्या सत्रात 'भारतातील व्यापारी बँकांची बुडीत कर्ज ( एन.पी.ए.) समस्या, आव्हाने व उपाय' या विषयावरील सत्राचे अध्यक्ष डॉ. जे.एम.काकडे होते. सूत्रसंचालनाची डॉ. कुमुदिनी जोगी, तर वृत्त संकलनाची प्रा.दिपाली पडोळे यांनी जबाबदारी पार पाडली. या विषयावर एकूण १४

संशोधकांनी आपले शोधनिबंध सादर केले. त्यानंतर यावर चर्चा होऊन विषयाची सांगता झाली.

अधिवेशनाच्या निमित्त्याने घेण्यात येणारे नाणेकर-पिंपरकर स्मृती व्याख्यानमालेचे वक्ते प्रा.डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांनी 'रशियन राज्य क्रांतीची १०० वर्षे' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.जे.एम.काकडे होते, प्रास्तविक डॉ. आर.वाय.माहोरे यांनी केले तर सूत्र संचालन प्रा.डॉ.राजेश चव्हाण यांनी केले.

पहिल्या दिवशी संध्याकाळी ६.०० वाजता विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा डॉ.जे.एम.काकडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. आमसभेच्या सुरूवातीला दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे कामकाज सुरू झाले. मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम केले. मागील आर्थिक वर्षाचा परिषदेचा व अर्थमीमांसाचा हिशोब सादर करण्यात आले व त्यास मान्यता देण्यात आली. पुढील ४३ व्या वार्षिक अधिवेशनाकरिता १) भांडवलशाहीच्या जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा. २)भारतातील सार्वजनिक क्षेत्राची यथार्थता ३)विदर्भातील बांधकाम व्यवसाय-शासकीय व खाजगी क्षेत्रातील विकास (जिल्हानिहाय)हे तीन विषय निश्चित करण्यात आले.

४३ व्या वार्षिक अधिवेशनाचे स्थळ भिवापूर महाविद्यालय, भिवापूर, जि.नागपूर येथे निश्चित करण्यात आले. ४३ व्या वार्षिक अधिवेशनाकरिता अध्यक्ष म्हणून डॉ. आर.बी.भांडवलकर यांची व उपाध्यक्ष डॉ. मनिष कायरकर यांची अविरोध निवड करण्यात आले. पुढील तीन वर्षांसाठी अमरावती विभागासाठी डॉ. राजेश चव्हाण व नागपूर विभागातून डॉ. विठ्ठल घिनमिने यांची बिनविरोध निवड झाली.

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रामध्ये आर्थिक ग्रंथातील विचार विश्व ह्या उपक्रमाचे सहावे पुष्प डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी दादाभाई नौरोजी लिखीत 'Poverty and UnBritish Rule in India' या पुस्तकावर अतिशय अभ्यासपूर्ण भाषण दिले. या सत्राचे अध्यक्ष डॉ. जे.एम.काकडे होते तर प्रास्तविक डॉ. अंजली कुळकर्णी यांनी केले. सूत्र संचालन डॉ. संजय कोठारी यांनी केले.

दुसऱ्या दिवशी दुसऱ्या सत्रात 'विदर्भाचा औद्योगिक विकास (जिल्हा निहाय) समस्या, अडचणी व उपाय' या विषयावरील सत्राचे अध्यक्ष प्रा.डॉ.जे.एम.काकडे, वृत्त संकलन डॉ. दिलीप महाजन यांनी केले. या विषयावर एकूण ५ शोध निबंध सादर झालेत, तसेच या विषयावर सखोल चर्चा होवून अध्यक्षीय भाषणानंतर हे सत्र संपन्न झाले.

अधिवेशनाच्या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. राजेंद्र रामटेके होते. प्रमुख उपस्थिती मा.डॉ.जे.एम.काकडे तसेच संस्थेचे सदस्य प्रा.डॉ. विजूभाऊ टोम्पे, कार्याध्यक्ष डॉ. अंजली कुळकर्णी, सचिव डॉ. राजेश चव्हाण, सचिव डॉ. गणेश मायवाडे, स्थानिक कार्यवाहक डॉ. संजय कोठारी उपस्थित होते. या कार्यक्रमात पीएच.डी. प्राप्त आणि विशेष प्राविण्य प्राप्त करणाऱ्या परिषदेच्या सदस्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. अधिवेशनात सादर झालेल्या उत्कृष्ट शोध निबंधास परिषदेतर्फे डॉ. श्रीनिवास खांदेवाले व डॉ. दि.व्यं.जहागिरदार प्रोत्साहन पर रोख पारितोषिक डॉ. सिद्धार्थ मेश्राम यांना देण्यात आले. तर स्व. मोतीरामजी हनवंते स्मृती पारितोषिक डॉ. करमसिंग राजपूत यांना देण्यात आले. स्व.डॉ. श्री.आ.देशपांडे स्मृती पारितोषिक

अर्थमीमांसा पत्रिकेतील उत्कृष्ट लेखास प्रा.डॉ. धीरज कदम व प्रा.डॉ. प्रशांत हरमकर यांना विभागून देण्यात आले.

परिषदेच्या वतीने प्राचार्य मा.डॉ. राजेंद्र रामटेके व डॉ. संजय कोठारी यांचा शाल व श्रीफळ देवून यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी परिषदेच्या प्रतिनिधींनी दोन दिवसीय आयोजित अधिवेशनाच्या उत्तम आयोजनाबाबत आपले समाधान व्यक्त केले. विदर्भातील अर्थशास्त्र अभ्यासक, विद्यार्थी, पत्रकार व कार्यकारी मंडळ तसेच प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष ज्यांचे सहकार्य अधिवेशनासाठी लाभले अशा सर्वांचे परिषदेच्या वतीने आभार मानण्यात आले. त्यानंतर परिषदेचे अध्यक्ष प्रा.डॉ.जे.एम.काकडे यांनी अधिवेशनाचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**राजेश चव्हाण** **गणेश मायवाडे**

सचिव, विदर्भ अर्थशास्त्र परिषद

◆◆◆

## कमळाबाई व्यंकटेश जहागिरदार जन्मशताब्दी स्मृति परिसंवाद (२०१७-१८) (वर्ष ४ थे)

विदर्भ अर्थशास्त्र परिषद, कौटिल्य ज्ञान प्रबोधिनी, अमरावती आणि नारायण काळे स्मृती मॉडेल, कारंजा (घाटगे), जि. वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने कमळाबाई व्यंकटेश जहागिरदार जन्मशताब्दी स्मृति परिसंवाद दि. १३ जानेवारी २०१८ रोजी आयोजित केल्या गेला. सदर परिसंवादाचे हे ४ थे वर्ष होते.

'जी.एस्.टी. : स्वरूप व परिणाम' या विषयावरील परिसंवादाचे अध्यक्ष डॉ. जनार्दन काकडे होते. परिसंवादात डॉ. वैशाली देशमुख (अमरावती), डॉ. प्राची देशपांडे (नागपूर) आणि डॉ कपिल चांद्रायण, सदस्य विदर्भ वैधानिक विकास मंडळ यांनी सहभाग घेतला होता. वक्त्यांनी जी.एस्.टी. संबंधातील महत्त्वाच्या पैलूंवर शास्त्रीय पद्धतीने प्रकाश टाकून या विषयाचे महत्त्व व परिणामकारता स्पष्ट केली. सदर कार्यक्रमास विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि प्राध्यापकांची उल्लेखनीय उपस्थिती होती. कार्यक्रमास विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या कार्याध्यक्षा डॉ. अंजली कुळकर्णी, सचिव डॉ. राजेश चव्हाण (अमरावती विभाग), डॉ गणेश मायवाडे (नागपूर विभाग) आणि कौटिल्य ज्ञान प्रबोधनीचे संचालक डॉ. दि.व्यं.जहागिरदार आणि नारायण काळे मॉडेल कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजय धनवटे, डॉ. हरमकर, डॉ. चोरे, डॉ. रायभोग उपस्थित होते. हा परिसंवाद यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व कर्मचारी बंधूंनी विशेष प्रयत्न केलेत हे नमूद करावे लागेल.